CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, ११ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २८१ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निसर्ग पंचमहाभूते ही पृथ्वीची मूलतत्त्वे आहेत. त्याला खराब करू नका. त्यांना मित्र माना, त्यांच्याशी दुर्व्यवहार करू नका. पृथ्वीला माता मानले तर सुखी राहाल. मालक झाले तर दुःखी व्हाल. नेहमी समाजाचा विचार केला तर आनंदी राहाल आणि व्यक्तिगत विचार केला तर दुःखी राहाल.

**- मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## विनम्र अभिवादन



माँ शारदा यांचा तिथीनुसार आज जन्मदिन

# पंडित नेहरूंनी केली देशातील पहिली मतचोरी

### निवडणूक सुधारणेवरील चर्चेत अमित शाह यांचा घणाघात






◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

काँग्रेस नेते आज मतचोरीचा आरोप करत असले तरी देशात पहिली मतचोरी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी केली, तर दुसरी श्रीमती इंदिरा गांधी यांची होती, असा घणाघाती हल्ला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज चढवला.

निवडणूक सुधारणा आणि एसआयआरवर लोकसभेत झालेल्या दोन दिवसांच्या वादळी चर्चेला उत्तर देतांना अमित शाह यांनी नेहरु गांधी घराणे तसेच काँग्रेसच्या निवडणूक जिंकण्याच्या अनैतिक शैलीची अंडीपिल्ली बाहेर काढली. अमित शाह पुराव्यानिशी काँग्रेसचे वस्त्रहरण करत असल्यामुळे विरोधकांनी त्यांच्या भाषणात वारंवार अडथळा आणण्याचा प्रयत्न केला, पण तो अपयशी ठरत असल्यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी सभात्याग केला. काँग्रेसच्या सभात्यागानंतरही अमित शाह यांनी आपले भाषण पूर्ण केले.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवीन पंतप्रधान कोण होईल, याचा निर्णय देशभरातील प्रदेश काँग्रेस अध्यक्षांना घ्यायचा होता, याकडे लक्ष वेधत शाह म्हणाले की, २८ प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या बाजूने मतदान केले, तर फक्त दोघांनी नेहरुंच्या बाजूने तरीही नेहरु देशाचे पहिले पंतप्रधान झाले.

दुसरी मतचोरी अनैतिक मार्गाने निवडणूक जिंकण्याची होती. इंदिरा गांधी रायबरेलीत निवडणूक जिंकल्या. त्या निवडणुकीला राजनारायण यांनी न्यायालयात आव्हान दिले. इंदिरा गांधींनी अनैतिक मार्गाने निवडणूक जिंकली, असा निर्णय न्यायालयाने दिला, पण हा निर्णय अवैध ठरवण्यासाठी देशाच्या पंतप्रधानांविरुध्द देशातील कोणत्याही न्यायालयात कोणताही खटला चालवता येणार नाही, अशी घटनादुरुस्ती संसदेत करण्यात आली. त्यामुळे पहिला विशेषाधिकार पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधींनी स्वतःसाठी घेतला. तिसरी मतचोरी सर्वोच्च न्यायालयातील तीन ज्येष्ठ न्यायमूर्तींना डावलून चौथ्या स्थानावरील न्यायमूर्तीना सरन्यायाधीश बनवून करण्यात आली, याठिकाणी योग्यता डावलण्यात आली, असा आरोप शाह यांनी केला. ◀(तभा वृत्तसेवा)

### देशाचा पंतप्रधान, गृहमंत्री संघाच्या विचारधारेचा

≫ देशातील संवैधानिक संस्थावर संघाच्या लोकांनी कब्जा केला, असा आरोप राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात केला होता, हा आरोप ठामपणे फेटाळून लावतांना अमित शाह म्हणाले की, देशाचे पंतप्रधान आणि देशाचे गृहमंत्री रा. स्व. संघाच्या विचारधारेचे आहेत. संघाच्या विचारधारेच्या व्यक्तीला कोणत्याही मोठ्या पदावर नियुक्त करता येत नाही, असा देशात काही कायदा आहे का? संघाचे स्वयंसेवक असल्याचा आम्हाला अभिमान आहे. ■

### एसआयआर हे मतदारयादीचे शुद्धीकरण

≫ एसआयआर मतदारयादीचे शुद्धीकरण आहे, निवडणुकीचे पावित्र्य कायम राखण्याचा प्रयत्न आहे, याकडे लक्ष वेधत शाह म्हणाले की, निवडणुका ज्या मतदार यादीच्या आधारावर होतात, ती मतदारयादीच सदोष असेल तर निवडणुका पवित्र कशा राहतील? मतदारयादीत जे काही गैरप्रकार होते, ते एसआयआरच्या माध्यमातून दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. देशात मतचोरीचे खोटे नॅरेटिव्ह तयार करत जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप शाह यांनी केला. ■

# ई-वाहनांना टोलमाफीचा निर्णय आठ दिवसांत घ्या

### • राहुल नार्वेकर यांचा निर्देश • घेतलेला टोल परत करा




◆ **नागपूर १० डिसेंबर**

राज्य सरकारचे ई वाहन धोरण आल्यानंतरही ई- वाहनांना टोल लावल्या जात आहे. तसेच ई वाहन घेण्याबाबत आपण जनतेला सांगत असतानाही वेगवान चार्जिंग सुविधा अत्यंत कमी असल्याने रांगेत उभे करावी लागते. त्यामुळे राज्य सरकारने तात्काळ ई-वाहनांना लावला जाणारा टोल माफीसंदर्भात आठ दिवसांच्या आत अमलबजावणी करावी. वेगवान चार्जिंग व्हावी यासाठी जागोजागी सुविधा उभ्या कराव्या असे निर्देश विधानसभेचे उपाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राज्य सरकारला दिले.

विधानसभेत शंकर जगताप यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करून राज्य सरकारने इ वाहन संदर्भात धोरण जाहीर केल्यानंतरही टोल वसुल केली जात असल्याची तक्रार सभागृहात केली. काँग्रेस नेते आमदार नाना पटोले यांनीही यात सहभागी घेऊन राज्य सरकारचे धोरण असतानाही टोल वसुली का केली जात आहे? असा सवाल उपस्थित करून टोल नाक्यावर मोठ्या प्रमाणात दादागिरी करत असल्याचेही यावेळी त्यांनी निदर्शनास आणून दिले.

यावर उत्तर देतांना मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, ई वाहनांना टोल माफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्याबाबत धोरणही लागू केले असून अटल सेतू,समृद्धी महामार्ग आणि मुंबई पुणे महामार्ग यावर टोल माफी देण्यात आल्याचे यावेळी मंत्री दादा भुसे यांनी सांगितले. त्याचबरोबर टोल माफिच्या कार्यप्रणालीत वाहनांचे नंबर यायला उशीत होत असल्याची कबुली यावेळी दिली. मात्र, याबाबत सभागृहाच्या भावना लक्षात घेता अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हस्तक्षेप केला. वसूल केलेला टोल आठ दिवसांत परत करण्याचा निर्देश त्यांनी दिला. ◀(तभा वृत्तसेवा)

### ‘लाडकी बहीण’ बंद होणार नाही : शिंदे



≫ लाडकी बहीण योजना ही सरकारची लोकाभिमुख आणि जनकल्याणकारी योजना आहे. ती कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. सकारात्मक भावनेने आम्ही योजना सुरू केली, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य सुनील प्रभू, जयंत पाटील, नाना पटोले, हारून शेख यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात एका लक्षवेधी सूचनेद्वारे विचारणा केली असता, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उत्तर दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आचारसंहितेच्या काळातही लाभार्थींना अडथळा येऊ नये म्हणून आगाऊ निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. लाभार्थी बहिणींनी सरकारच्या कामावर विश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात जनादेश दिला. त्यामुळे ही योजना कमी करणे किंवा बंद करणे तर दूरच, आम्ही ज्या-ज्या योजना घोषित केल्या आहेत, त्या योग्य वेळी पूर्ण करू. ■

## महत्त्वाचे

### मणिपूरमध्ये दोन बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरमध्ये सुरक्षा दलांनी खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपाखाली बंदी घातलेल्या संघटनांच्या दोन बंडखोरांना अटक केली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील लंगोल लाइमनई भागातून बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (पीडब्ल्यूजी) एका ३० वर्षीय बंडखोराला अटक करण्यात आली. आरोपी हा बिष्णुपूर जिल्ह्यातील तोपोकपी मायाई लीकाई येथील रहिवासी आहे. सोमवारी तेंग्नौपाल जिल्ह्यातील मोरेह येथून बंदी घातलेल्या केवायकेएलच्या (ओ) एका सदस्याला अटक करण्यात आली.मंगळवारी चुराचंदपूर जिल्ह्यातील हेंगकापकोट गावात झालेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी एक सुधारित मोर्टार, दोन बॉम्ब आणि २७ रिकामे शस्त्रे जप्त केली, असे त्यांनी सांगितले. दोन वर्षांपूर्वी वांशिक हिंसाचार सुरू झाल्यापासून मणिपूरमध्ये शोध मोहीम राबविण्यात येत आहे. मे २०२३ पासून मेतेई व कुकी-झो गटांमधील वांशिक हिंसाचारात २६० हून अधिक लोक मारले गेले व हजारो बेघर झाले आहेत.

# भारत-अमेरिकेत ऊर्जा, संरक्षण सहकार्यावर चर्चा

### उपपरराष्ट्रमंत्री ॲलिसन हूकर, विक्रम मिस्री यांच्यात बैठक



**नवी दिल्ली, १० डिसेंबर**

अमेरिकेच्या राजकीय व्यवहार उपपरराष्ट्रमंत्री ॲलिसन हूकर यांनी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान, अंतराळ आणि पुरवठा साखळी यासारख्या क्षेत्रात भारत-अमेरिका सहकार्य आणखी दृढ करण्यावर चर्चा केली. दोन्ही बाजूंनी फेब्रुवारीमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलेल्या दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यावर लक्ष केंद्रित केले. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, धोरणात्मक आणि आर्थिक सहकार्य मजबूत करण्यासाठी हूकर पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी त्यांनी परराष्ट्र सचिव मिस्री यांची भेट घेतली आणि द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली.

या बैठकीत व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, नागरी अणु सहकार्य, महत्त्वपूर्ण खनिजे आणि पुरवठा साखळी तसेच ट्रस्ट उपक्रमावर सविस्तर चर्चा झाली. दोन्ही बाजूंनी मुक्त, खुल्या इंडोपॅसिफिकसाठी त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**५०० अब्ज डॉलर्सपर्यंत व्यापारवाढीचे लक्ष्य**

दोन्ही देशांनी २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य देखील ठेवले आहे. अमेरिकन दूतावासाच्या बैठकीसंदर्भात माहिती देताना म्हटले की, संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान, अंतराळ आणि विश्वासार्ह पुरवठा साखळी यासारख्या क्षेत्रात भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी चर्चा झाला. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात अमेरिकेत फेब्रुवारीमध्ये झालेली चर्चा आणि दोन्ही नेत्यांनी दिलेल्या निर्णयांवर ठोस पावले उचलण्याची गरज दोन्ही देशांनी व्यक्त केली.

## ईडीची बारामती, इंदापुरात छापेमारी

**नवी दिल्ली, १० डिसेंबर**

गुंतवणूकदारांची १०० कोटींपेक्षा जास्त फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या दुग्धशाळा आणि कृषी कंपनीविरुद्ध मनी लॉण्ड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने महाराष्ट्रात छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बारामतीतील दोन, इंदापूरमधील एक तसेच पुणे शहरातील दोन ठिकाणी विद्यानंतर डेअरी प्रा. लि. आणि विद्यानंद ॲग्रो फीड प्रा. लि.चे प्रवर्तक आनंद सतीश लोखंडे आणि काही व्यावसायिकांच्या मालकीच्या ठिकाणी बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार छापे टाकण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. लोखंडे आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी त्यांच्या कंपन्यांद्वारे निष्पाप गुंतवणूकदारांना फसवले, असा आरोप आहे.

# पार्थ पवारांना पोलिस वाचवताहेत् का?

• मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल
• पुणे जमीन घोटाळा प्रकरण



**मुंबई, १० डिसेंबर**

जमीन व्यवहाराच्या एफआयआरमध्ये नाव न घेता आणि केवळ इतर व्यक्तींची चौकशी करून पोलिस उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना वाचवत आहेत का, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी केला.

या प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी करताना न्या. माधव जामदार यांच्या एकलपीठाने सरकारी वकिलांना हा सवाल केला. उपमुख्यमंत्र्यांच्या मुलाला संरक्षण देऊन पोलिस केवळ इतरांची चौकशी करीत आहेत का, असा प्रश्न न्या. जामदार यांनी एफआयआरमध्ये पार्थ पवार यांचे नाव नसल्याचे लक्षात घेऊन विचारला. या प्रकरणाचा तपास करणारे पोलिस कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करतील, असे सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी सांगितले.

पुण्यातील मुंढवा परिसरातील ४० एकर जमिनीची ३०० कोटी रुपयांना अमेडिया एंटरप्रायजेस एलएलपीला विक्री करण्यात आली. या कंपनीत पार्थ पवार भागीदार आहेत. ही जमीन सरकारी असून, विकता येत नाही, हे लक्षात आल्यावर चौकशी सुरू झाल. २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क भरण्यापासूनही या कंपनीला सूट देण्यात आली होती. नोंदणी संयुक्त महानिरीक्षकांच्या अध्येक्षतेखालील समितीने दिग्विजय पाटील, शीतल तेजवानी आणि उपनिबंधक तारू यांच्यावर आरोपपत्र दाखल केले होते.

# अमेरिकेकडून ८५ हजार नागरिकांचे व्हिसा रद्द





**वॉशिंग्टन, १० डिसेंबर**

डोनाल्ड ट्रम्प यांनी राट्राध्यक्षांचा पदावर आल्यानंतर अमेरिकेच्या इमिग्रेशन नियमांत आमूलाग्र बदल केले आहेत. याचा फटका अमेरिकेत शिक्षण व इतर कारणांसाठी जाणाऱ्या नागरिकांना बसला आहे. अमेरिकेच्या इमिग्रेशन विभागाने जारी केलेल्या अहवालानुसार जानेवारी ते नोव्हेंबर या ११ महिन्यांच्या कालावधीत ८५ हजार व्हिसा रद्द करण्यात आल्याची माहिती जारी केली.

चोरी, हल्ले, दहशतवादी गटांना पाठिंबा या कारणांमुळे व्हिसा रद्द केल्याचे अहवालात म्हटले आहे. अहवालानुसार रद्द केलेल्या एकूण व्हिसांपैकी ८ हजार व्हिसा विद्यार्थ्यांचे होते. दारू पिऊन वाहन चालवणे, चोरी आणि हल्ला यांसारख्या प्रकरणात त्यांचा समावेश असल्याचे चौकशीत समोर आल्याने कारवाई करण्यात आली. दहशतवादाच्या समर्थनाशी संबंधित आणि इतर गंभीर कारणांमुळेही इतर व्हिसा रद्द करण्यात आले. गाझा संघर्षाशी संबंधित निदर्शनांमध्ये सहभागी झालेल्या हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले. आतापर्यंत ५५ लाख परदेशी नागरिकांचे व्हिसा तपासण्यात आले आहे आणि ही मोहीम सुरूच राहणार असून जानेवारीपर्यंत रद्द करण्यात आलेल्या व्हिसाची संख्या वाढू शकते.

२०२५ मध्ये व्हिसा रद्द करण्याच्या जवळजवळ निम्म्या प्रकरणांमध्ये दारू पिऊन वाहन चालवणे, चोरी व मारामारी यांसारखे मुख्य गुन्हे कारणीभूत ठरले आहेत. अधिकाऱ्याने उर्वरित प्रकरणांचा तपशील दिलेला नाही; मात्र व्हिसाची मुदत संपणे, दहशतवादाला समर्थन आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील कारवायांमध्ये सहभाग ही व्हिसा रद्द होण्याची इतर कारणे आहेत. उदाहरणार्थ- ऑक्टोबरमध्ये कन्झर्वेटिव्ह कार्यकर्ते चार्ली कर्क यांच्या हत्येचा आनंद साजरा केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तींचे व्हिसा रद्द करण्यात आले होते. तसेच, गाझा संघर्षाशी संबंधित निदर्शनांमध्ये सहभागी झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांवरही अधिक कठोर तपासणी सुरू झाली आहे.



# बिबट्याच्या वेशात आमदार विधानभवनात!

## तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**नागपूर, दि.१० डिसेंबर -**

राज्यात बिबट्यांचे मानवी वस्तीवरील हल्ले दिवसोदिवस वाढत चालले आहेत. त्यामुळे केवळ पश्चिम महाराष्ट्रच नव्हे तर मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातही त्याच्या आगमनामुळे नागरिकामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

हिवाळी अधिवेशन सुरु असताना नागपूरातही बुधवारी सकाळी त्याने मानवी वस्तीत प्रवेश करून उच्छाद घातला आहे. त्यामुळे या गंभीर मुद्दावर सरकारने ठोस पावले उचालवीत यासाठी ठिकठिकाणी जनआंदोलन उभारले जात आहे. त्यामुळे याकडे सरकारचे लक्ष वेधले जावे, यासाठी महायुतीच्या एका आमदाराने बुधवारी चक्क बिबट्याचा वेश व मुखवटा परिधान करून विधान भवनात प्रवेश केला. त्यांचा हा अवतार आज चर्चेचा विषय बनला. शिवसेना शिंदे गटाचे मंचरचे आ. शरद सोनवणे



बिबट्याबनून त्यावर तातडीने उपाय योजना राबविण्याची मागणी केली.

बिबट्यांचे मानवी वस्तीवरील हल्यात अनेक लहान मुलांना जीव गमवावा लागला आहे. तर कित्येकजण जखमी झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः जुन्नर तालुका, अहिल्यानगर, सोलापूर, नाशिक, धुळे, मुंबई नजकीचा भाग, मराठवाडा आणि विदर्भातील नागपूर परिसरात बिबट्या, वाघाची दहशत पसरली आहे. बिबट्याचे हल्ले वाढलेले असतानाही रोजच्या कारवाई व्यतिरिक्त ढोस उपाय योजना होत




नसल्याने जुन्नरचे आ. शरद सोनवणे हे बिबट्याचा वेष परिधान करूनच विधानसभेत दाखल झाले. त्यांनी हिवाळी अधिवेशनात या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन केले. त्यांच्या या पेहरावांची आणि तितकीच त्यांच्या मुद्दाची नागपूरमध्ये तुफान चर्चा सुरू आहे.

नागपूरच्या वेशीवर बिबट्या पोहचला आहे. नागपूरच्या सीमेवरील भागात बिबटे आले आहेत. राज्यात ९-१० हजार बिबट्यांची संख्या आहे असे सांगून आ. सोनवणे म्हणाले,. जुन्नर तालुक्यात ५५ लोकं गेल्या तीन महिन्यात बिबट्यांच्या हल्ल्यात मृत पावले आहेत. ट्यांना पकडायचे सोडून सरकार महिलांना, शेतकऱ्यांना, मुलाबाळांना काटरे लोखंडी पट्टा मानेला लावण्याचा सल्ला देत आहे. आमची मुलं अंगणात नाही. रस्त्यावर दिसत नाही. शाळेमध्ये जात नाही. घराभोवती तारेचं कुंपण करुन त्यात करंट सोडून आम्हाला आता बसण्याची वेळ आली आहे. मला असं वाटतं की असं अनेक उपाय करण्यात काय हाशील. त्यावर तोडगा काढा अशी मागणी त्यांनी केली.

### रेस्क्यू ऑपेरशन राबवा

यावेळी शरद सोनवणे यांनी राज्यात रेस्क्यू ऑपरेशन राबविण्याची विनंती केली. राज्यात दोन हजार बिबटे राहतील असं रेस्क्यू सेंटर येत्या तीन महिन्यात तयार करा. एक हजार मादी बिबट्या, नर बिबट्या वेगळे करा. त्यामुळे नसबंदीचा विषय मिटेल. हे हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी सरकारने दोन रेस्क्यू सेंटर तातडीने जुन्नर तालुक्यात सुरू करावेत. एक अहिल्यानगरमध्ये करावे. आपल्याला बिबट्यासाठी मायक्रो ऑपरेशन करावं लागेल.

### राज्य आपत्ती घोषीत करा

शेळ्या सोडून काही होणार नाही. कारण शेळ्या जंगलात जातील. पण बिबटे तर आता ऊसात आणि आमच्या घराजवळ आले आहेत. त्यामुळे जे सचिव मुंबईत एसी रुममध्ये संरक्षणतात राहतात. त्यांना ग्रामीण भागातील परिस्थिती माहिती नाही. त्यांना जनतेच्या अडचणी माहिती नाही. तीन, सहा महिन्यांच्या बाळांची काळजी घेण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. बिबटे आता रात्रीच नाही तर दिवसा सुद्धा महिला-पुरूषांवर हल्ले करत आहेत. त्यामुळे बिबट्यांचे हल्ले हे राज्य आपत्ती घोषीत करा अशी मोठी आणि महत्त्वाची मागणी शरद सोनवणे यांनी केली. तातडीने मुख्यमंत्र्यांनी याविषयीची घोषणा करावी. यापुढे एकही शेतकऱ्याचा, त्यांच्या मुलाबाळांचा बळी आम्हाला मान्य नाही, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

बिबट्या हा शेड्यूल्ड एकचा प्राणी नाही. मयताच्या कुटुंबाला २५ लाख रुपये मदत देण्यापेक्षा व्यक्ती वाचवा. अशी मागणी त्यांनी केली.

# छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे भव्य पुतळा उभारणार : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

लोकसभेतील एका लेखी उत्तरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावाला नकार दर्शविल्याचा उल्लेख काही सदस्यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे उत्तर जुना आराखडा लक्षात घेऊन लोकसभेत देण्यात आल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक हे आपले अभिमानाचे स्थान आहे. याठिकाणी पुतळा उभारण्याची मागणी पूर्वीही करण्यात आली होती.



त्यावेळी या संदर्भातील आराखडा तयार असल्याचे सांगण्यात आले होते.

मात्र अलीकडे लोकसभेत आलेले उत्तर हे जुन्या आराखड्याशी संबंधित असल्याचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी स्वतः स्पष्ट केले असल्याचे सांगून त्यांनी सांगितले की, नवीन आराखड्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव असून त्याच्या अंतिम मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. नवीन आराखडा मंजूर झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर अत्यंत भव्य असा पुतळा उभारला जाणार आहे. लोकसभेत आलेले उत्तर हे केवळ जुन्या आराखड्यावर आधारित असल्याने गैरसमज निर्माण झाला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ ते समाधी स्थळापर्यंत नवीन रस्ता निर्मितीस मान्यता : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे पुणे जिल्ह्यातील बलिदान स्थळ तुळापूर (ता. हवेली) व समाधी स्थळ मौजे वढू बुद्रुक (ता. शिरूर) दरम्यान नवीन रस्त्याची निर्मिती व भीमा नदीवरील पुलास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

संभाजी महाराज महाराष्ट्राचे दैवत आहे. त्यांचे बलिदान स्थळ असलेल्या तुळापूर आणि समाधीस्थळ असलेल्या वढू बुद्रुक येथील विकास आराखडा राबविताना ग्रामस्थांच्या सूचना लक्षात घ्याव्यात, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार ज्ञानेश्वर कटके उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान आणि समाधीस्थळाला नमन करण्यासाठी तुळापूर आणि वढू बुद्रुक




येथे मोठ्या प्रमाणावर नागरिक येत आहेत. त्यामुळे तुळापूर-वढू बु. रस्ता भीमा नदीवरील पुलाद्वारे जोडण्यात यावा. सध्या १४ किलोमीटरचा रस्ता असून नागरिकांना तुळापूरहून वढू बुद्रुक येथे येण्यासाठी ३० ते ४० मिनिटांचा कालावधी लागतो. भीमा नदीवरील पूल केल्याने हा रस्ता साडेसहा किलोमीटरचा होईल. त्यामुळे दोन्ही स्थळांमधील अंतर कमी होऊन नागरिकांचा वेळ वाचेल. भीमा नदीवरील हा पूल व्हिवींग गॅलरीसह असावा. पुलाची रचना छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील इतिहासाची आठवण करून देणारी असावी. पूल दर्जेदार निर्मित करून नदीच्या घाटाचे कामही इतिहासाची आठवण करून देणारे असावे. नदी घाट आणि पुलावर प्रकाश योजना आणि सौंदर्यीकरण दर्जेदार असण्याबरोबर या ठिकाणी गाईडना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना संपूर्ण ऐतिहासिक संदर्भांची माहिती असावी. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासाची आठवण येथे येणाऱ्या प्रत्येकाला व्हावी, अशा पद्धतीने विकास कामे करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, भीमा नदीवरील पुलाची रुंदी वाहतुकीला पर्याप्त असावी. पूल आणि व्हिविंग गॅलरी येथे येणाऱ्या प्रत्येकाने बघावी, अशा पद्धतीने निर्मित करावी. प्रस्तावित तुळापूर ते वढू बुद्रुक रस्त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करावी. छत्रपती संभाजी महाराजांवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाला येथे महाराजांचा इतिहास जाणून घेण्यासाठी पुन्हा येण्याची इच्छा होईल, अशा पद्धतीने विकास करावा. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय आदी उपस्थित होते. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी बैठकीत सादरीकरण केले. दूरदृश्य प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार उपस्थित होते.

### थोडक्यात विकास आराखडा

स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या तुळापूर बलिदान स्थळी संग्रहालय, ८२ आसनी क्षमतेचा १० डी शो सभागृह, प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, ३५० मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृह यांची कामे सुरू आहेत. समाधी स्थळ वढू बु येथे संग्रहालय, प्रशासकीय इमारत, स्मरणिका दुकाने, प्रवेशद्वार, १२० मीटर लांबीचा नदी घाट, वाहनतळ, शौचालय व उपहारगृहाची कामे सुरू आहेत. तुळापूर येथे भीमा नदीवरील पुलावर १२ मीटर रुंदीची व्हिविंग गॅलरी असणार. तसेच तुळापूर आणि वढू बुद्रुक येथे १०० फूट उंच हिंदवी स्वराज्य ध्वज उभारण्याची योजना.

# जलसंधारण विभागातील प्रकल्प तक्रारींची एसआयटी मार्फत चौकशी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

नागपूर, : जलसंधारण विभागांतर्गत राज्यात विविध प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या प्रकल्पांमधील काही प्रकल्पांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानुसार या प्रकरणाशी संबंधित विभागातील अधिकारी सुनील कुशिरे यांची वाल्मी या संस्थेत बदली करण्यात आली असून २००८ ते २०१४ या कालावधीतील प्रकल्पांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरू असल्याची माहिती जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधान परिषदेत दिली.

यासंदर्भात विधान परिषद सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येईल आणि त्याचा



अहवाल दोन महिन्यात सादर केला जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

अॅड. अनिल परब यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील, शशिकांत शिंदे आदींनी सहभाग घेतला. याबाबत माहिती देताना जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले, मे. वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने निविदा भरताना वाहनाची खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आरसी बुक दाखल केलेली होती. विभागामार्फत रत्नागिरी शहर पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. सद्यस्थितीत पोलीस तपासाअंती कोर्टात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे. या कंपनीच्या २००८ ते २०१४ या कालावधीतील राज्यातील प्रकल्पांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु आहे. या कंपनीला मंजूर करण्यात आलेल्या मौजे सारंगवाडी, ता. चिखली, जि. बुलढाणा संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजनांच्या प्रकल्पाची कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग, अकोला यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

# स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या बातम्यात निवडणूक आयोगाचे चिन्ह वापरु नका

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १० डिसेंबर**

राज्य निवडणूक आयोग आणि भारत निवडणूक अयोग ही दोन स्वतंत्र संस्था आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांकडून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाशी संबंधित चिन्हे वापरू नयेत, अशा सूचना मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी प्रसारमाध्यमाना केल्या आहेत.

त्याबाबत त्यांच्या कार्यालयाने मंगळवारी दिलेल्या प्रसिद्धीपत्रात म्हटले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संबंधी वृतांमध्ये इमारतींची दृश्ये किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या छायाचित्रांचा वापर केल्याचे काही प्रकरणे दिसून आली आहेत. वास्तविक संसदीय, विधानमंडळ तसेच राष्ट्रपतीउपराष्ट्रपती निवडणुका घेण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची असून राज्यात या कामकाजासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सध्या महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय अधिकारी एस. चोक्कलिंगम कार्यरत आहेत.

दुसरीकडे, संविधानातील अनुच्छेद २४३ व २४३ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन, निर्देशन आणि नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयुक्त पदावर निवृत्त प्रधान सचिव दिनेश वाघमारे कार्यरत आहेत. दोन्ही आयोगांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी व स्वतंत्र असल्याने स्थानिक स्वराज्य निवडणुकांशी संबंधित बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह, अधिकारी, इमारती अथवा तत्सम दृश्यांचा वापर करणे चुकीचे आहे.

# शासकीय कार्यालयांत यूडीआयडी कार्डची सक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालये व विभागांमध्ये युनिक डिसॅबिलिटी आयडी (यूडीआयडी) कार्ड सादर करणे ९ ऑक्टोबर २०२५ पासून सक्तीचे करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय सर्व विभागांना कळविण्यात आला आहे.

आरक्षण, पदोन्नती, विविध शासकीय सवलती यासाठी यूडीआयडी कार्ड अनिवार्य असून, जानेवारी २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांना कागदपत्रांची पडताळणी सादर करणे आवश्यक असल्याची माहिती इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभा सदस्य बापू पठारे, बबनराव लोणीकर, सुनील प्रभू, विजय वडेट्टीवार, विक्रम पाचपुते, हेमंत उगले यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र संदर्भात प्रश्न उपस्थित केला, या प्रश्नास उत्तर देताना ते बोलत होते.राज्यात काही ठिकाणी बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचे प्रकार आढळल्याने त्यावर मोठी कारवाई सुरू आहे. सातारा जिल्ह्यात ५९८ पैकी ७८ जण, पुण्यात ४२८ मधील ४६ जण, लातूरमध्ये २६ जण तर यवतमाळमध्ये २१ कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. नंदुरबारमध्येही दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे.

# झेडपी, महापालिका निवडणुका महायुती एकत्रच लढणार : चंद्रशेखर बावनकुळे



**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

जिल्हा परिषदा, महापालिका निवडणुकांमध्ये महायुतीची एकजूट कायम राहणार असून, आम्ही ५१ टक्के मतांचा आकडा गाठून विजय मिळवण्याचे ध्येय ठेवले असून, या निवडणुका महायुती एकत्रच लढणार,'' अशी महत्वपूर्ण घोषणा राज्याचे महसूलमंत्री व स्थानिक स्वराज्य संस्था भाजपा निवडणूक प्रभारी बावनकुळे यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे आणि यांची एक बैठक झाली. त्याबाबत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, ''जिल्हा पातळीवरील सर्व नेत्यांना स्थानिक स्तरावर महायुतीची बांधणी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### मुंबईसाठी चार प्लस चारचे सूत्र

मुंबई महानगरपालिकेसाठी देखील महायुती सज्ज झाली आहे. शिवसेनेने ९० ते १०० जागांची मागणी केली असली तरी, जागावाटपाचा निर्णय तांत्रिक बाबी तपासून घेतला जाईल. यासाठी भाजपचे आणि शिवसेनेचे प्रत्येकी चार पदाधिकारी तसेच महायुतीचे प्रतिनिधी यांची समिती एकत्र बसून चर्चा करेल. जिथे मतभेद होतील, तिथे वरिष्ठ नेते तोडगा काढतील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. तसेच, मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय फडणवीस, शिंदे आणि अजित पवार हे तिघे मिळून घेतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागील निवडणुकांमध्ये काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये मतभेद झाले होते, मात्र ते आता पूर्णपणे दूर झाले आहेत. आमच्यात मनभेद नव्हते, केवळ निवडणूकनिहाय मतभेद होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# विरोधकांचा कॅश बॉम्ब अन् देवाभाऊंचा लाडक्या बहिणीवरून घरचा आहेर

**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

रणांगणात लढण्यासाठी विरोधकांकडे सेनापती (विरोधी पक्षनेता) नसल्याने अधिवेशनातील लढाई पूर्णपणे एकतर्फी होईल, अशी सत्ताधाऱ्यांना वाटत असलेली आशा दुसऱ्याच दिवशी पूर्णपणे फोल ठरली. पाशवी बहुमतामुळे महायुतीच्या मंत्र्याबरोबरच आमदार, पदाधिकाऱ्यांच्या वर्तनात आलेला निर्ढावलेपणा आता त्यांना अडचणीचा ठरणार असल्याची उदाहरणे वारंवार समोर येत आहेत. अलिबागचे आ. महेंद्र दळवी यांचा नोटाच्या बंडला समवेतचा कथित व्हिडीओचा कॅश बॉम्ब आणि सत्ताधाऱ्याकडून एखाद्या म्हणीप्रमाणे लाडकी बहिणीचा वारंवार केल्या जाणाऱ्या उल्लेखामुळे दस्तरखूद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त होऊन स्वतःच्या आमदाराला उघडपणी केलेली दरडावणी दुसऱ्या दिवशी चर्चेची बाब ठरली.






पावसाळी अधिवेशनाअखेरीस राज्याचे समाजकल्याण मंत्री व शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांच्या टॉवेल गुंडाळून नोटांनी भरलेली बॅग घेऊन बसलेल्या फोटोमुळे मोठी खळबळ उडाली होती. यावेळी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंगळवारी सकाळीच एक्सवर नोटांची भरगच्च बंडले घेऊन बसलेल्या एका व्यक्तीचा फोटो शेअर करीत मोठा कॅश बॉम्ब फोडला. कोणत्याही आमदाराचे नाव न घेता त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हा बंडलबाज कोण?, अशी विचारणा केली होती. त्यावर व्हिडीओतील व्यक्तीच्या शरीरयष्टी व पेहरावावरून अलिबागचे आमदार महेंद दळवी यांनी स्वतः च हा मी नसून एआय च्या माध्यमातून मॉब करून मला अडकवले जात असल्याचा आणि त्यामागे महायुतीतील एका पक्षाकडून सुपारी दिली गेली असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे एकीकडे महायुतीत सर्वकाही आलबेल असल्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री वारंवार सांगत असलेतरी प्रत्यक्षात अंतर्गत त्यांच्यात बरेच फाटत चालले असल्याचे समोर आले आहे. उरणचे आ. महेंद्र थोरवे यांनी तर यामागे खा. सुनील तटकरे यांचाच हात असल्याचे सांगून वादाची ठिणगी आणखी भडकवली आहे. त्यामुळे आगामी काळात रायगड जिल्ह्यात झेडपी आणि अन्य निवडणुकात राष्ट्रवादीचे तटकरे विरोधात शिंदेच्या सेनेची लढाई आणखी पुढचे टोक गाठणार आहे. या कॅशबॉम्बची दिवसभर चर्चा रंगलीच शिवाय विधान परिषदेत शरद पवार गटाचे आ. शशिकांत शिंदे यांनी उपस्थित करीत सत्ताधाऱ्याकडून निवडणुकीत केल्या जात असलेल्या पैश्याच्या वापराबद्दल हल्लाबोल केला. प्रत्येक गोष्टीत लाडकी बहीण आणू नका, लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका, अन्यथा घरी बसावे लागेल, असा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला. त्यामुळे आपल्या भागातील अवैध दारुविक्रीचा मुद्दा सभागृहात पोटतिडकीने मांडणाऱ्या पवाराची अवस्था आ बैल मुझे मार अशी झाली. त्यांनी लाडक्या बहिणींची सगळ्यात मोठी समस्या अवैध दारु असल्याचे सांगितले. विधानसभा अध्यक्षांनी निर्देश देऊनही कारवाई झाली नाही, असे सांगणाऱ्या आ. पवार यांच्यासकट सर्व सत्ताधाऱ्यांना चपराक बसली आहे.

# राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ६५ वसतिगृहे सुरु : मुख्यमंत्री

## मुलींच्या वसतिगृहातील सुरक्षाव्यवस्थेत वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १० डिसेंबर-**

इतर मागास प्रवर्गाच्या (ओबीसी) विद्यार्थ्यांसाठी राज्यात ६५ नवी वसतिगृहे सुरू करण्याचे काम इतर मागास बहुजन कल्याण विभागाने पूर्ण केले असून या उपक्रमाचे श्रेय मंत्री अतुल सावे यांना दिले पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य मनिषा चौधरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या वसतिगृहासंदर्भात आपण दहा-बारा वर्षे चर्चा करत होतो, परंतु प्रश्न काही पुढे जात नव्हता. मंत्री अतुल सावे यांना हा विभाग मिळाल्यानंतर मी त्यांना विनंती केली की प्रत्येक वसतिगृहासाठी जागा शोधा आणि त्या ठिकाणी व्यवस्था उभ्या केल्याचा आनंद असून आज ६५ वसतीगृह सुरू झाली आहेत. भाड्याच्या इमारतीत वसतिगृहे न चालवता प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र जागा असावी, या उद्दिष्टाने जागा शोधण्याचे काम सुरू ठेवण्यात आले असून राज्यातील बहुतांश



जिल्ह्यांमध्ये जागा निश्चित झाल्या आहेत. महसूल विभागाकडून पुणे, जालना, बुलढाणा, भंडारा, वर्धा, गडचिरोली, रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जमीन प्रत्यार्पित झाली आहे. तसेच इतर विविध विभागांकडून हस्तांतरित झालेल्या जागांमध्ये सोलापूर, सांगली, धुळे, धाराशिव, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, चंद्रपूर, गोंदिया येथेही वसतिगृहांसाठी जमीन उपलब्ध झाली आहे. नागपूर, कोल्हापूर, सातारा, नाशिक, जळगाव, नंदुरबार, लातूर, नांदेड, हिंगोली, बीड, परभणी, सिंधुदुर्ग, पालघर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर या जिल्ह्यात जमीन हस्तांतरण प्रक्रिया सुरु असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री सावे म्हणाले, सर्व आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सहा महिन्यांत संपूर्ण अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# रोहिंगे देशाच्या सुरक्षेसाठी धोका

## ४४ माजी न्यायमूर्तींचे जाहीर पत्र, सरन्यायाधीशांच्या टिप्पणीचे समर्थन

◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

रोहिंग्या स्थलांतरितांच्या मुद्यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केलेली टिप्पणी योग्यच आहे. बेकायदेशीर स्थलांतरित लोक देशाच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहेत. रोहिंगे घुसखोरच असून, त्यांच्याविरुद्ध सुरू असलेली मोहीम न्यायपालिकेची बदनामी करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या ४४ माजी न्यायमूर्तींनी जाहीर पत्रातून केला आहे.



रोहिंग्यांना निर्वासितांचा दर्जा देण्यावर सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याला रेड कार्पेट टाकून त्यांचे स्वागत करायचे का, असा प्रश्न विचारला होता. त्यांच्या टिप्पणीचा समाज माध्यमांवर विविध पद्धतीने अर्थ काढण्याचा प्रकार सुरू आहे. याची दखल घेत ४४ माजी न्यायमूर्तींनी बुधवारी एक पत्र जारी करून सरन्यायाधीशांच्या टिप्पणींबद्दल करण्यात येणाऱ्या विकृतीकरणाला विरोध दर्शविला. माजी न्यायमूर्तींनी जाहीर पत्रात म्हटले की, रोहिंग्या भारतीय कायद्यानुसार निर्वासित मानले जात नाहीत. भारतातील बहुतांश रोहिंगे अवैध मार्गाने आले आहेत आणि केवळ दावा केल्याने त्यांना निर्वासितांचा दर्जा मिळत नाही. भारत १९५१ च्या संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित कराराचा सदस्य नाही. आपली कर्तव्ये संविधान आणि भारतीय कायदे ठरवतात, कोणतेही आंतरराष्ट्रीय करार नाहीत. अवैध मार्गाने आलेल्या लोकांना आधार, रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे कशी मिळाली ? हा प्रकार देशासाठी धोकादायक आहे. त्यामुळे न्यायालयाच्या देखरेखीत एक विशेष तपास पथक स्थापन करणे आवश्यक आहे, जेणेकरून असे दस्तऐवज कोणी जारी केले, कोण यात सहभागी आहे हे उघड व्हायला हवे.

(वृत्तसंस्था)

### ...तर न्यायापालिकेचे स्वातंत्र्य येणार धोक्यात

म्यानमारमध्येही रोहिंग्यांच्या नागरिकत्वावरून वाद आहे. त्यामुळे भारतातही न्यायालयाने कायदेशीर तथ्यांच्या आधारावरच निर्णय घ्यावा. न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेला अमानवीय म्हणणे हे सरन्यायाधीश आणि न्यायालय या दोघांवरही अन्याय आहे. जर प्रत्येक कायदेशीर प्रश्नावर न्यायालयाला पक्षपाती म्हटले गेले, तर न्यायपालिकेचे स्वातंत्र्य धोक्यात येईल.

### आरोप करणाऱ्यांनी राजकीय अजेंडा चालवू नये

माजी न्यायमूर्तींनी पत्रात म्हटले की, आम्ही सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीश यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त करतो. न्यायालयाच्या मतांना चुकीच्या पद्धतीने मांडणाऱ्या लोकांचा आम्ही निषेध करतो. भारताचे संविधान मानवता आणि सतर्कता या दोन्हीची मागणी करते. न्यायालयाने या दोन्हीचे पालन केले आहे आणि त्याला पाठिंबा द्यावा, बदनाम करू नये.

### मिळालेल्या कागदपत्रांवर चिंता

सरन्यायाधीशांनी कोणत्याही व्यक्तीला, मग तो नागरिक असो वा परदेशी, भारतीय भूमीवर छळ, जबरदस्तीने बेपत्ता किंवा अमानुष वागणूक दिली जाऊ शकत नाही, असेही सुनावणीत म्हटले होते, मात्र टीका करणाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले. बेकायदेशीर स्थलांतरितांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि इतर कागदपत्रे कशी मिळाली याबद्दलही निवेदनात चिंता व्यक्त केली आहे.

# २०३० पर्यंत भारतात ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

**अॅमेझॉनने दर्शवली कटिबद्धता**

जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत आपली उपस्थिती दुप्पट करताना अॅमेझॉनने पुढील पाच वर्षांत भारतात ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. व्यापारापासून ते क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत (एआय) व्यवसाय वाढवण्यासाठी ही गुंतवणूक केली जाणार आहे.

२०३० पर्यंत भारतात डेटा सेंटर्स, एआय आणि क्लाऊड पायाभूतसाठी मायक्रोसॉफ्टने १७.५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे वचन दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अॅमेझॉनने या गुंतवणुकीबाबत कटिबद्धता दर्शवली आहे. यापूर्वी गुगलने पुढील पाच वर्षांत एआय डेटा सेंटर्स बांधण्यासाठी १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे वचन दिले होते.

२०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रात केलेल्या गुंतवणुकीमुळे भारतात अतिरिक्त १० लाख नोकऱ्या निर्माण होण्यास मदत होईल, असे अॅमेझॉनने म्हटले आहे.

वॉलमार्ट समर्थित फ्लिपकार्ट तसेच अब्जाधीश मुकेश अंबानींसारख्या भारतीय दिग्गज कंपन्यांशी आणि इटरनल लि. च्या ब्लिंक्ट, स्विगी लि.च्या इन्स्टामार्ट आणि झेप्टोसारख्या डिलिव्हरी कंपन्यांसोबत स्पर्धा करण्यासाठी अॅमेझॉन गुंतवणूक वाढवत आहे. २०१० पासून अॅमेझॉनने भारतात ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे.२०२३ मध्ये या कंपनीने २६ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक जाहीर केली होती.

> लाखो भारतीयांसाठी एआयच्या प्रवेशाचा मार्ग सुकर करीत असताना, भारताच्या विकासासाठी उत्प्रेरक म्हणून काम करीत राहण्यास आम्हाला उत्सुकता आहे.
>
> **अमित अग्रवाल**
> भारतातील अॅमेझॉनचे प्रमुख

या नवीन गुंतवणुकीमुळे भारतातील विक्रेत्यांची निर्यात २०३० पर्यंत २० अब्ज अमेरिकी डॉलर्सवरून ८० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्यास मदत होईल. या गुंतवणुकी भारताच्या राष्ट्रीय प्राधान्यांशी धोरणात्मकदृष्ट्या जुळलेल्या आहेत आणि त्या एआय क्षमतांचा विस्तार, लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा वाढवणे, लघु व्यवसाय वाढीला पाठिंबा देणे आणि रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करतील, असे कंपनीने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मीरसह हिमाचल आणि उत्तराखंड राज्यांमध्ये शीतलहर आली आहे. नदी,नाले आणि नळातील पाणीही गोठले आहे. तापमान शून्याखाली गेल्याने उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात नीती खोऱ्यातील हा वाहणारा धबधबा असा थांबला आहे

### ‘मी नाईट क्लबचा केवळ भागीदार’

**नवी दिल्ली** : गोव्यातील रोमीओ लेन नाईट क्लबचा मी केवळ भागीदार आहे. अपघाताविषयी मला काही माहिती नाही, अशी माहिती दिल्ली येथून अटक करण्यात आलेला अजय गुप्ताने दिली आहे. ६ डिसेंबरला या नाईट क्लबमध्ये आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेपासून पोलिस अजयला शोधत होते. चौकशीपासून वाचविण्यासाठी तो लजपत नगर येथील एका खासगी रुग्णालयात भर्ती झाला होता.

# वंदे मातरम् आपल्या अस्मितेची प्रार्थना

## सभापती सी. पी. राधाकृष्णन् यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, १० डिसेंबर**

वंदे मारतरम् हे गीत आपली अस्मिता, एकता आणि सामूहिक भविष्याची प्रार्थना आहे, असे प्रतिपादन राज्यसभेचे सभापती सीपी राधाकृष्णन यांनी म्हटले आहे.

आपल्या देशावर परकीयांचे राज्य असताना बकिमचंद्र चटर्जी यांनी वंदे मातरम् हे गीत लिहिले आहे. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांच्या हृदयाचा हे गीत आवाज म्हणून लोकप्रिय ठरले. धर्म, भाषा आणि भौगोलिक सीमा पार करीत या गीताने मातृभूमीवर प्रेम करणाऱ्यांना एकत्र आणले. स्वातंत्र्यासाठी लढणारे कित्येक देशभक्त वंदे मातरम् म्हणत हसत हसत फासावर चढले. या गीताच्या माध्यमातून



आपण बलिदान केलेल्या स्वातंत्र्यवीरांचे स्मरण करतो. आणि स्वातंत्र्य हे आपल्याला सहज नव्हे तर राष्ट्रावर असलेले नितांत प्रेम आणि लढा यामुळे मिळाले, असे सभापती म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, स्वातंत्र्य सैनिकांनी वंदे मातरम् गीताला प्रत्येक घर, विद्यालय आणि आंदोलनात पोहचविले. देशासाठी लढणाऱ्या वीरांनी परकीयांचे अत्याचार हसत हसत सहन केले. स्वातंत्र्याच्या भावनेसमोर परकीय साम्राज्यही टिकले नाही. वंदे मातरम् गीताचे १५० वे वर्ष साजरे करताना स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या देशभक्तांना मी अभिवादन करतो, असे सभापती सीपी राधाकृष्णन म्हणाले.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### नीलम कोठारी विमानात पडली बेशुद्ध



१९८० ते १९९० च्या दशकातील अभिनेत्री नीलम कोठारे अलिकडेच विमान प्रवासात बेशुद्ध पडली. टोरंटो ते मुंबई प्रवास करीत असताना जेवण केल्यावर काही वेळातच बेशुद्ध झाले, असे तिने सांगितले. मात्र, त्यावेळी विमानातील एकाही कर्मचाऱ्याने मदत केली नसल्याचा आरोप केला. टोरंटो ते मुंबईच्या विमान प्रवासात माझ्यासोबत जे घडले, त्यामुळे मी खूप निराश झाल्याचे तिने सांगितले. माझे विमान नऊ तासांपेक्षा जास्त उशिरा आले होते. विमानात जेवण केल्यानंतर मी आजारी पडले आणि नंतर बेशुद्ध झाले. एका सहृदय प्रवाशाने मला मदत केली. पण, विमानातील चालक दलाच्या सदस्यांनी मदत सोडा साधी विचारपूसही केली नाही. विमान कंपनीच्या कस्टमर सर्व्हिसचाही वाईट अनुभव आला. तिथून काहीच उत्तर मिळाले नसल्याचा दावा नीलमने केला आहे. नीलमने ३० पेक्षा जास्त चित्रपटांत काम केले आहे. चित्रपटांपासून दूर झाल्यानंतर ज्वेलरीचा व्यवसाय सुरू केला आहे.

### तमन्ना भाटिया साकारणार अभिनेत्री जयश्रीची भूमिका

चित्रपट निर्माता व्ही. शांताराम यांच्या जीवनावर आधारित ‘व्ही. शांताराम’ या बायोपिकचे चित्रीकरण सुरू झाले आहे. या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी शांताराम यांची भूमिका साकारत आहेत. शांताराम हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध चित्रपट निर्माता, समाजसुधारक आणि कलाकार होते. या चित्रपटात अभिनेत्री तमन्ना भाटिया शांताराम यांची पत्नी आणि प्रसिद्ध अभिनेत्री जयश्री यांच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाशी संबंधित नवीन पोस्टर नुकतेच समोर आले आहे. यात तमन्ना गुलाबी रंगाच्या नऊवारी साडीत दिसत आहे. तिचा ‘लूक’ जुन्या काळाची आठवण करून देतो. जयश्री भारतीय सिनेमातील एक प्रसिद्ध अभिनेत्री आणि गायिका होत्या. तमन्ना भाटियाने तिच्या भूमिकेबद्दल सांगितले, ही भूमिका साकारणे एक मोठी जबाबदारी आहे. भारतीय सिनेमासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या काळाचा जयश्री काळाचा भाग होत्या. त्यांनी कामात जी शालीनता आणि प्रतिष्ठ दाखवली, ती प्रेरणादायी आहे.



### रेखा वागतेय् जया बच्चनप्रमाणे



अभिनेत्री रेखा नेहमीच आपल्या शैली आणि अंदाजामुळे चर्चेत असते. पण, यावेळी रेखा एका चाहत्यामुळे चर्चेत आली आहे. खरे तर, रेखा अलिकडेच मुंबई विमानतळावर दिसली. यावेळी तिच्यासोबत तिची व्यवस्थापक फरजानाही होती. एका क्लिपमध्ये रेखा कॅज्युअल लूकमध्ये विमानतळाबाहेर पडताना दिसत आहेत. तिने पांढऱ्या टॉपसोबत काळी पँट आणि श्रग घातला होता. रेखाला समोर पाहून एक महिला चाहती सेल्फी घेण्यासाठी फोन घेऊन तिच्या जवळ पोहोचली. त्या महिला चाहतीला सेल्फी देण्यास नकार दिला सोबतच धक्का देऊन रेखा निघून गेली. नंतर ती वेगाने बाहेर पडत असल्याचे दिसून आले. समाज माध्यमांवर यावर प्रतिक्रिया उमटल्या आहेत. एकाने तिची तुलना जया बच्चनसोबत करीत तिला जया बच्चन २.९ म्हटले.

### नऊ सायबर गुन्हेगारांना अटक

◆ **जामतारा, १० डिसेंबर**

झारखंडच्या जामतारा व देवघर जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपाखाली नऊ जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. गुप्त माहितीच्या आधारे, पोलिस पथकाने मंगळवारी जामतारा येथील हिरापूर येथील एका प्राथमिक शाळेजवळ छापा टाकला व ऑनलाइन फसवणुकीत सहभागी असलेल्या पाच सायबर गुन्हेगारांना अटक केली, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

त्यांच्या ताब्यातून बारा सिम कार्ड व नऊ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. अटक केलेल्या गुन्हेगारांनी आर्थिक व्यवहार सुलभ करणाऱ्या ॲप्सद्वारे लोकांची वैयक्तिक व गोपनीय माहिती मिळवण्यात यश मिळवले आणि नंतर ऑनलाइन पद्धतीने त्यांची फसवणूक केली, असे पोलिसांनी सांगितले. त्यांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने ओडिशा, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि झारखंड होते. अटक केलेल्यांपैकी एकावर फेब्रुवारी २०२४ मध्ये सायबर गुन्ह्यांचा आरोप ठेवण्यात आला होता.

(वृत्तसंस्था)

# नायजेरियन लष्कराच्या गोळीबारात १४ महिला ठार

## आंदोलन करणाऱ्यांवर कारवाई, २२ नागरिक जखमी

◆ **अबुजा, १० डिसेंबर**

नायजेरियाच्या ईशान्य अदामावा राज्यात जातीय भेदभावाविरोधात आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर लष्कराने गोळीबार केला. यात १४ महिलांचा मृत्यू झाला असून, २२ पेक्षा अधिक नागरिक जखमी आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, ईशान्य नायजेरियातील अदामावा राज्यात जातीय भेदभावाविरोधात मोर्चा काढण्यात आला. लामुर्डे परिसरात तैनात असलेल्या लष्कराच्या जवानांनी मोर्चा अडवला. त्यामुळे आंदोलक संतप्त झाले आणि त्यांनी काही जवानांना मारहाण केली. वादाचे रुपांतर संघर्षात झाले आणि सुरक्षा दलाने थेट आंदोलकांवर गोळीबार केला. यात १४ महिलांचा मृत्यू झाला असून २२ पेक्षा अधिक जखमींवर उपचार सुरू आहे. पीडितांच्या कुटुंबियांच्या मते,



स्थानिक समुदायांमध्ये सुरू असलेल्या हिंसक संघर्ष आणि लष्कराच्या दुर्लक्षाच्या आरोपांविरुद्ध महिला निषेध करत होत्या. तथापि, नायजेरियन लष्कराने आरोप फेटाळताना म्हटले की, निदर्शकांवर सुरक्षा दलाने नव्हे, तर स्थानिक सशस्त्र गटांने केलेल्या हल्ल्यात या नागरिकांचा मृत्यू झाला. या घटनेवर आंतरराष्ट्रीय ॲम्नेस्टी संघटनेचे नायजेरियातील संचालक इसा सनुसी यांनी संताप व्यक्त केला आणि म्हटले की, ही घटना लष्कराकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे ज्वलंत उदाहरण आहे. संयुक्त राष्ट्रांनी या प्रकरणाची दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. नायजेरियन सुरक्षा दलांवर यापूर्वीही अशाच प्रकारच्या कृतींचा आरोप करण्यात आला आहे. २०२० मध्ये, लागोसमध्ये पोलिसांच्या क्रूरतेविरुद्धच्या निदर्शनांमध्ये, लष्करावर नरसंहार केल्याचा आरोप करण्यात आला होता.

(वृत्तसंस्था)

# भारत विमान कंपन्यांसाठी आव्हानात्मक : आयएटीए

## इंडिगोपुढे निर्माण झालेली स्थिती तात्पुरती

◆ **जीनेव्हा, १० डिसेंबर**

भारत हा ऐतिहासिकदृष्ट्या विमान कंपन्यांसाठी आव्हानात्मक बाजारपेठ राहिला आहे. त्यात एक उत्तम बाजारपेठ बनण्यासाठी सर्व घटक आहेत आणि सध्या उद्‌भवलेल्या काही समस्या तात्पुरत्या आहेत, असे मत आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटना अर्थात् आयएटीएचे प्रमुख विली वॉल्श यांनी व्यक्त केले.

लक्षणीय वाढीची क्षमता आणि वाढत्या हवाई वाहतुकीच्या मागणीमुळे, भारतीय विमान कंपन्या क्षमता वाढवण्याचा विचार करीत आहेत आणि १५०० पेक्षा जास्त विमानांची ऑर्डर देण्यात आली आहे तसेच आणखी विमानतळेही सेवेत येत आहेत. विमानतळ पायाभूत सुविधांमध्ये आणि विमान कंपन्यांनी अतिरिक्त विमानांमध्ये केलेल्या गुंतवणुकीचे स्वागत करताना वॉल्श म्हणाले की, भारताची देशांतर्गत बाजारपेठ २०२० च्या तुलनेत २०२५ मध्ये ३२ टक्क्यांनी वाढली आहे. भारतीय देशांतर्गत बाजारपेठेत प्रवासी किलोमीटरच्या महसुलाच्या बाबतीत एक तृतियांशपेक्षा जास्त वाढ झाली आहे. ती वाढ आव्हानांशिवाय होत नाही. भारताने ती वाढ सुलभ केली आहे. हे एक उत्तम उदाहरण आहे. भारत सर्वांत रोमांचक बाजारपेठांपैकी एक आहे, असे वॉल्श म्हणाले.

भारतीय बाजारपेठेत येणाऱ्या काही समस्या तात्पुरत्या आहेत, असे वॉल्श यांनी इंडिगोच्या उड्डाणातील व्यत्यय आणि इतर आव्हानांच्या पृष्ठभूमीवर सांगितले. वॉल्श हे आयएटीएचे महासंचालक आहेत. जवळपास ३६० विमान कंपन्यांचा समावेश असलेला हा गट असून, जागतिक हवाई वाहतुकीच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त वाटा याच्या सदस्य कंपन्या उचलतात. एअर इंडिया, इंडिगो आणि स्पाईसजेट या गटाचे सदस्य आहेत.

(वृत्तसंस्था)

# मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी

## ऑस्ट्रेलियात नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू, उल्लंघन झाल्यास कंपन्यांना ५० लाखांपर्यंत दंड

◆ **सिडनी, १० डिसेंबर**

ऑस्ट्रेलियात १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना समाज माध्यम वापरास बंदी घालणाऱ्या कायद्याची बुधवारपासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास आणि निश्चित वयोगटातील मुलांनी समाज माध्यमाचा वापर केल्याचे उघड झाल्यास समाज माध्यम कंपनीला ५० लाखापर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. किशोरवयीनांना समाज माध्यम वापरावर बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया जगातील पहिला देश ठरला आहे.

ऑस्ट्रेलियन संसदेत नोव्हेंबर २०२४ मध्ये एक कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्याने ऑस्ट्रेलियन ऑनलाइन सुरक्षा कायदा, २०२१ मध्ये सुधारणा केली आणि १६ वर्षांखालील मुलांद्वारे समाज माध्यम वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी, या कायद्याने १६ वर्षांखालील मुलांना केवळ काही विशिष्ट समाज माध्यम प्लॅटफॉर्म वापरण्यात बंदी घातली होती. तथापि, नवीन कायद्यानुसार, १६ वर्षांखालील मुलांसाठी सर्व समाज माध्यम प्रवेश प्रतिबंधित करण्यात आला. बुधवार, १० डिसेंबरपासून नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. कायद्यानुसार, १६ वर्षांखालील मुलांना खाते तयार करण्यापासून रोखण्यात अयशस्वी झाल्यास समाज माध्यम कंपन्यांना ५० लाखापर्यंत दंड होऊ शकतो. संसदेत कायदा पारित झाल्यानंतर सरकारने कंपन्यांना अशा प्रणाली तयार करण्याचे आदेश दिले होते जे मुलांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर खाते तयार करण्यापासून रोखतील. यासाठी एक वर्षांचा वेळ देण्यात आला. आरोग्य आणि शैक्षणिक उद्देशांसाठी सेवा देणाऱ्या मेसेजिंग आणि गेमिंग प्लॅटफॉर्मना या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

(वृत्तसंस्था)





### कोणत्या प्लॅटफॉर्मवर घातली बंदी?

ऑस्ट्रेलियन सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, किशोरवयीन मुलांसाठी बंदी घालण्यात आलेल्या समाज माध्यम प्लेटफॉर्ममध्ये मेटा कंपनीचे फेसबुक आणि इंस्टाग्राम तसेच एक्स, स्नॅपचॅट, रेडिट आणि टिकटॉक यांचा समावेश आहे. गुगलचे युट्यूब प्रतिबंधित यादीत टाकण्यात आले होते, तथापि तज्ज्ञांनी यावर आक्षेप घेतल्यानंतर आणि शैक्षणिक वापरासाठी युट्युब महत्त्वाचे असल्याचे लक्षात आणून दिल्यानंतर यादीतून युट्युबला वगळण्यात आले.

### अधिकारांचे रक्षण करण्यासाठी निर्णय



ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथोनी अल्बानीज यांनी सांगितले की, नकारात्मक प्रभावापासून आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी नवीन कायदा लागू करण्यात आला. समाज माध्यमांच्या वापरामुळे मुलांवर नकारात्मक परिणाम होतो आणि त्यांच्या क्षमतांना दिशा देण्यासाठी समाज माध्यम वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारच्या निर्णयाला ७७ टक्के लोकांनी पाठिंबा दिला.

### चार पोलिसांचा अपघातात मृत्यू

◆ **सागर, १० डिसेंबर**

मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यात बुधवारी कंटेनर ट्रकला झालेल्या अपघातात मोरेना येथील बॉम्ब शोध पथकातील चार पोलिसांचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. सागर जिल्ह्यातील बांद्री व माल्थोन दरम्यान राष्ट्रीय महामार्ग ४४ वर पहाटे ४ वाजता हा अपघात घडला.

बॉम्ब शोधक आणि निकामी पथकाच्या कर्मचाऱ्यांना घेऊन जाणारे वाहन महामार्गाच्या चुकीच्या बाजूला उभ्या असलेल्या कंटेनर ट्रकला समोरासमोर धडकले. धडक इतकी जोरदार होती की पोलिसांच्या वाहनाचे मोठे नुकसान झाले. यात चार कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. कॉन्स्टेबल प्रद्युमन दीक्षित, कॉन्स्टेबल अमन कौरव, चालक परमलाल तोमर, सर्वजण मोरेना येथील रहिवासी आणि भिंड येथील रहिवासी डॉग मास्टर विनोद शर्मा, अशी त्यांची ओळख पटली आहे.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# मानव-वन्यजीव संघर्ष शमवा होऽऽ!

एकाच दिवशी तीन महिलांवर हल्ला करून वाघाने त्यांना ठार केले. त्यात एकाच कुटुंबातील सासू-सुनेचा समावेश होता. लगेच पुढच्या तीन दिवसांत वन्यजीवांनी अन्य तीन महिलांच्या नरडीचा घोट घेतला. त्यातल्या एकीला तर वाघाने चक्क तिच्या पतीदेखत फरफटत नेले आणि काही क्षणांत ठार केले. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही व मूल तालुक्याच्या या घटना काही महिन्यांपूर्वीच घडलेल्या. त्यापूर्वी, चंद्रपूर महानगरानजीक दुर्गापूर परिसरातून खेळणाऱ्या मुलाला बिबट्याने उचलून नेले आणि त्याचा जीव घेतला. त्याच काळात महाऔष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीत शिरून वाघाने चक्क आईच्या हातचे पोर उचलून नेले. काय वाटले असेल त्या माउलीला! या साऱ्या घटना ऐकताना, वाचताना नेहमीच्या वाटत असल्या तरी त्यामागचे दु:ख फार मोठे आहे हे समजून घ्या. कोणतेही संवेदनशील मन हळहळल्याशिवाय राहणार नाही अशा या घटना राज्याच्या एका कोपऱ्यात, चंद्रपूर जिल्ह्यात घडल्या; नव्हे अजूनही घडत आहेत. जेथे म्हणून जंगल आहे त्या गडचिरोली, नागपूर, नाशिक, अहिल्यानगर आणि पुण्यातही हे घडत आहे. आम्ही जंगलाशेजारी राहतो, रान व त्यातल्या जीवांना आपल्या पोरासारखे जपतो, हा काय आमचा दोष आहे?, असा प्रश्न सांत्वन करायला गेलेल्यांना विचारला जातो, तेव्हा त्यांच्या हाती निरुत्तर होण्यापलीकडे काहीच उरत नाही. राज्यातील ३५.२१ टक्के जंगल असलेल्या या भागाची व येथे वास्तव्य करणाऱ्या गावकऱ्यांची ही शोकांतिका आहे. जंगल जपण्याची जबाबदारी केवळ आमचीच आहे का, हा त्यांचा प्रश्न तेवढाच स्वाभाविक आणि अंतर्मुख करणारा आहे.

हाच प्रश्न मंगळवारी राज्याच्या हिवाळी अधिवेशनात बराच गाजला. वाघ व बिबटे मानवी वस्तीत शिरत असून, त्यांच्या हल्ल्यात अनेकांचे जीव जात आहेत. दुसरीकडे गावात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आहे. नागरिकांना वस्त्यांमध्ये फिरणे कठीण झाले आहे, अशी व्यथा सर्वपक्षीय आमदारांनी मांडली आणि या संवेदनशील प्रश्नावर ठोस उपाययोजनेची मागणी केली. गेल्या पाच वर्षांत झालेल्या वाघांच्या हल्ल्यांत तब्बल २५० जणांचा, तर बिबट्यांच्या हल्ल्यांत ८७ आणि रानडुकरे, कोल्हे, अस्वल, तडस, लांडगा आदींच्या हल्ल्यांत एकूण ३७७ जणांचा राज्यात बळी गेला आहे. धक्कादायक व तेवढीच चिंतेची बाब म्हणजे, गेल्या दहा महिन्यांत वाघ व बिबट्यांनी तब्बल ४७ जणांचे जीव घेतले आहेत. ही केवळ वनविभागाची आकडेवारी आहे. जगात फक्त १४ देशांत वाघ आहे. त्यातले ५० टक्के वाघ एकट्या भारतात असून, त्यातही विदर्भ वाघांची संख्या देशात अग्रेसर आहे. आपल्या उपराजधानीला वाघाच्या राजधानीचा दर्जा आहे. चंद्रपूर जिल्हा तर वाघाचे माहेरघरच आहे. देखण्या, रुबाबदार अशा वाघाच्या भूमीत राहण्याचा गर्व अनुभवत असताना, सोबतीला मानव-वन्यजीव संघर्षाच्या गंभीर समस्येचे ओझेही हाच परिसर वाहतो आहे. सद्य:स्थितीत पेटलेला हा संघर्ष शमवा होऽऽ अशी आर्त हाक येथील गावागावांतून ऐकू येत आहे. ही हाक विधिमंडळापर्यंत पोहोचली हे बरे झाले. कारण 'वाघ व बिबट्याच्या हल्ल्यात गावकऱ्यांचा मृत्यू' अशा बातम्यांबद्दलची संवेदनाच एव्हाना बोथट होत चालली होती. खरे तर, अशा हल्ल्यांत ज्यांच्या घरचा जीव जातो, त्यांच्या दु:खाची कल्पना करणे अवघड असते. कुणाची आई आपल्या चिमुकल्यांना सोडून गेली. तर कुणाच्या डोक्यावरचे बापाचे छत्रच नाहीसे झाले आहे. गावकऱ्यांचे जीवनच जंगलाशी जुळले असताना त्यांनी जंगलात जाऊ नये म्हणून आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी त्यांची मूलभूत गरज भागवली का? या प्रश्नाचे उत्तर त्यांना अपेक्षित होते. तो विषय विधिमंडळात आला. जानेवारी महिन्यात 'वाईल्डकॉन-२०२५' ही भारतातील पहिली परिषद चंद्रपुरात झाली. मानव-वन्यजीव संघर्ष हा या परिषदेचा विषय होता. 'संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यप्राण्यांच्या संख्येवरील नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' असे गोंडस नाव देऊन या परिषदेत दोन दिवस चर्चासत्र रंगले. देश-विदेशातून आलेल्या तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्याचा मार्ग निघेल, अशी आशा व्यक्त केली गेली. यापूर्वी या पद्धतीचे प्रयत्न झालेच नाहीत, असेही नाही. पण आजवर अशा प्रयत्नांतून या गंभीर प्रश्नावर उपाययोजना झाल्याचे ऐकिवात नाही. खरे तर, अशा परिषदा आणि संमेलनांतून या समस्येचा मार्ग सापडेल ही भ्रामक कल्पना आहे. प्रत्यक्ष कृतीशिवाय मार्ग सापडणारही नाही. मध्यंतरी वाघ गावाजवळ आला की गावकऱ्यांना लगेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर सावधगिरीच्या सूचना देणारे तंत्रज्ञान विकसित केले गेले आणि ते ताडोबात वापरले गेले. या उपक्रमाचे कौतुक खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा त्यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून केले. पण त्याचा प्रत्यक्ष किती लाभ झाला याची आकडेवारी अद्याप वनविभागाने जाहीर केली नाही. घटना घडल्या की, संबंधित वाघ-बिबट्याला शोधायचे, त्यांना बेशुद्ध करून जेरबंद करायचे एवढाच काय तो या समस्येवरचा उपाय आहे, असे समजणे भविष्यातली मोठी चूक ठरेल. समस्येचे मूळ शोधून त्यावर ठोस उपाय शोधले गेले पाहिजेत.

वाघाचे बछडे मोठे झाले की ते स्वत:चे साम्राज्य उभे करतात. त्यासाठी त्यांना सीमोल्लंघन करावे लागते. अशावेळी त्यांना 'कॉरिडॉर' हवा आहे. मात्र तो कोळसा खाणी व महामार्गांच्या जाळ्यांमुळे बाधित आहे. त्यावर उपाय म्हणून 'ओव्हर पास वे' असले तरी ते मोठ्या संख्येत प्रस्तावित आणि प्रलंबित आहे. ते आधी पूर्ण केले पाहिजे. जेथे वाघ, बिबटे मोठ्या प्रमाणात आहेत अशा जंगलातून त्यांचे स्थलांतरण करणे हाही एक चांगला उपाय आहे. तसा प्रयत्न ताडोबा प्रकल्पातून होतही आहे. नागझिरा अभयारण्य, सह्याद्री व ओडिशाच्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पात ताडोबाच्या वाघिणींना यशस्वीरीत्या पाठवले गेले आहे. पुढेही असे प्रयत्न होत राहावेत. वाघ व बिबट्यांना जंगलातच पुरेसे खाद्यान्न मिळावे म्हणून तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढणे, त्यासाठी त्यांचे खाद्य असलेल्या स्थानिक गवताच्या प्रजाती जपणे, त्या वाढवणे ही कामे युद्धपातळीवर झाली पाहिजेत. उन्हाळ्यात वन्यजीवांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळावे याची तरतूद आधीच केली पाहिजे. वाघ, बिबट, हरिण किंवा अन्य वन्यजीवांचा सकस व आवडता आहार कोणता, हे जाणून घेण्यासाठी 'नॅशनल सेंटर फॉर बॉयोलॉजिकल सायन्सेस' या संस्थेच्या माध्यमातून 'डीएनए मेटाबार कोडिंग' पद्धतीने शोधकार्य सुरू केले आहे. त्याच्या निकषानुसार गवताच्या बाहेरच्या प्रजाती काढून २ ते ३ हजार हेक्टरमध्ये स्थानिक व दर्जेदार गवताचे रोपण आणि संवर्धन करण्याचे काम ताडोबात होते आहे. असे केले नाही तर हरणांची संख्या कमी होईल, असे गंभीर संकेत या शोधातून मिळाले आहेत. शिवाय ग्रामस्थांचे जंगलावरचे अवलंबन कमी करण्यासाठी इंधन पुरवठा करणे, तेंदुपत्ता संकलनाच्या काळात त्यांना संरक्षण देणे, जंगलाच्या सीमेवर सौर ऊर्जा कुंपण उभारणे, विशेषतः बिबट प्रवण क्षेत्रांतील घरे, गोठे, शाळा यांच्याभोवती कुंपण उभारणे, आवश्यक असल्यास बकऱ्या जंगलात सोडणे; जे वनमंत्र्यांनी विधिमंडळात कबूलही केले आहे; अशा साऱ्या उपाययोजना तातडीने केल्या पाहिजेत. वाघ, बिबटे, आणि भटक्या कुत्र्यांचा मानवी वस्तीतील वाढता धोका ही एक धगधगती सामाजिक-नैसर्गिक आपत्ती ठरू पाहत आहे. नैसर्गिक अधिवासाचा संकोच आणि मानवी वस्तीची वाढ या दोन पातळ्यांवरील संघर्षातून निर्माण झालेली ही समस्या आहे. वाघ-बिबट्याच्या हल्ल्याइतकाच गंभीर, किंबहुना रोजच्या जगण्याला भेडसावणारा प्रश्न म्हणजे भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर, कामावर जाणाऱ्या महिलांवर आणि वृद्धांवर भटके कुत्रे हल्ले करीत आहेत. या कुत्र्यांच्या चाव्यामुळे रेबीजचा धोका असून, अनेक सरकारी रुग्णालयात रेबीजच्या लसीचा तुटवडा असल्याने गरीब रुग्णांना जीव गमवावा लागल्याची उदाहरणेही समोर आली आहेत. भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांची नसबंदी आणि लसीकरण करण्याची मोहीम युद्धपातळीवर राबवणे आवश्यक आहे. शिवाय, शहरांतील कचरा व्यवस्थापन सुधारणे गरजेचे आहे जेणेकरून भटक्या कुत्र्यांसाठी अन्न उपलब्ध होणार नाही. पाळीव कुत्र्यांसाठी रेबीज लस आणि परवाना अनिवार्य करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंड आकारणेही आवश्यक होऊन बसले आहे. या समस्येवर राजकीय इच्छाशक्तीने आणि लोकसहभागाने तोडगा काढणे काळाची गरज आहे. अन्यथा, हा संघर्ष अनेक निष्पाप जीवांचे बळी घेत राहील.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# सह्ही स्मार्ट कॅलेंडरची

पूर्वी डिसेंबर महिना आला की डायऱ्या आणि कालदर्शिक (कॅलेंडर) आणणे अनिवार्य असायचे. घरोघरी स्वयंपाकघरात फ्रिजशेजारी भिंतीवर कॅलेंडर विराजमान होत असे. या कॅलेंडरवर अनेक सांसारिक गोष्टी लिहिल्या जात असत. साखर संपली, दूध, वाणसामान भरले, वाढदिवस, विवाहदिवस दिलेले आहेर, प्रवास तारखा, उपवास अशा अनेक गोष्टींची नोंद असे. नंतर त्यात पंचांगही आले. मुहूर्त, दिन विशेष अशा अनेक गोष्टी महिन्याच्या मागील पानावर वा उजवीकडील जागेत लिहिल्या जात असत. महत्त्वाचे सण कधी आहेत, गोरज मुहूर्त कुठले अशी इत्थंभूत माहिती कालदर्शिकेत असे. कॅलेंडर हे मराठी कुटुंबातील एक सदस्य असे. स्वयंपाकघरात त्याची हक्काची जागा असे. माझी आजी जुने कॅलेंडर न काढता त्यावरच नवीन वर्षाचे लावत असे. 'असे का' असे विचारताच, दूधवाले, कामाच्या बायांशी चर्चा (वाद) करताना मदत मिळते, कारण त्यावर खाडे, कमी जास्त अशा अनेक उपयुक्त गोष्टी लिहिलेल्या असत. अनेकदा मी आजीला रात्री कॅलेंडर्स वाचून कागदावर विशेष नोंदी लिहिताना पहिले. हे तू काय करते आहेस असे विचारता 'तुला कळणार नाही' असे उत्तर मिळायचे. आता गोष्टी वेगाने बदलत आहेत. या सर्व बाबी मोबाईल ॲपवर आहेत. मोबाईलचा आणखी एक फायदा म्हणजे तो सतत तुमच्याजवळ असतो. त्यामुळे तुम्हाला कुठेही माहिती मिळते.

आजच्या वेगवान जगात वेळ व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. कॅलेंडर हे वेळेचे नियोजन करण्याचे मुख्य साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र वेगाने विकसित होत आहे आणि त्याचा कॅलेंडर आणि वेळ व्यवस्थापनावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे आपले दैनंदिन जीवन, काम आणि सामाजिक नियोजन करण्याच्या पद्धतीत मोठे बदल होत आहेत. त्यासाठी एआय टूल्स कॅलेंडर एआय, गुगल असिस्टंट, क्लॉकवाईज, शेड्युल एआय अशी अनेक लोकप्रिय कॅलेंडर्स उपलब्ध आहेत. त्याचबरोबर आपले चॅटबॉट्सही मदत करतात. तुमच्या कॅलेंडरमध्ये अपॉईंटमेंट्स आणि मीटिंग्ज हाताने लिहायचे दिवस आता इतिहासजमा झाले. एआय-सक्षम वैयक्तिक सहायक आता सूत्रे हाती घेत आहेत, तुमचे वेळापत्रक व्यवस्थापित करण्याचा ते एक संपूर्ण सखोल दूरगामी मार्ग देतात. नैसर्गिक भाषा प्रक्रिया क्षमतांनी सुसज्ज असलेले हे सहायक वापरकर्त्यांना त्यांच्या



कॅलेंडरशी संभाषणात्मक संवाद साधण्याची परवानगी देतात. तुमच्या व्हर्च्युअल सहायकाला तुमच्या आगामी कार्यक्रमांबद्दल फक्त सांगा किंवा तुमच्या दिवसाचा सारांश विचारा आणि ते उर्वरित काम हाताळेल. या तंत्रज्ञानाचा वापर करणारे कॅलेंडर ॲप तुमच्या ऐतिहासिक वेळापत्रकांचे विश्लेषण करू शकतात, कमाल उत्पादकता तास ओळखू शकतात आणि बैठकीच्या सोयीस्कर वेळा सुचवू शकतात. स्थान, उपस्थितांची उपलब्धता आणि निकड यासारख्या घटकांचा विचार करून एआयचालित वेळापत्रक तुमचे कॅलेंडर तुमच्या अद्वितीय कार्यप्रवाहाशी सुसंगत असल्याचे सुनिश्चित करते. आयुष्य अप्रत्याशित असते आणि योजना अनेकदा बदलतात. कधी पाऊस पडतो, लोकांची विमाने चुकतात, काही वेळा लोक आजारी पडतात. अशा वेळी आपल्याला वेळापत्रक बदलावे लागते आणि त्यात अनेक घटक आणि व्यक्ती सहभागी असतात. एआय कालदर्शन ॲप्स गतिमान पुनर्नियोजन क्षमता सादर करत आहेत, ज्या अनपेक्षित परिस्थितीशी पटकन जुळवून घेऊ शकतात. शेवटच्या क्षणी बैठक रद्द करणे असो किंवा प्राधान्यक्रमांमध्ये अचानक बदल असो, तुमचे कॅलेंडर मानवी हस्तक्षेपाशिवाय स्वयंचलितपणे समायोजित करू शकते आणि पर्यायी दिवस, स्थान व वेळ सुचवू शकते. ही तुमचे वेळापत्रक लवचीक आणि रिअल-टाईम बदलांना प्रतिसाद देणारे राहील, हे बघते. शेवटी अंतिम निर्णय तुमचा असतो. तुम्ही अनुमोदन दिले की पुढची कारवाई तात्काळ पार पडते. एआयमुळे कॅलेंडर केवळ साध्या नोंदी ठेवण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट आणि कार्यक्षम बनले आहे. एआय-आधारित कॅलेंडर आता उपलब्ध वेळेनुसार, प्राधान्यानुसार आणि इतर मीटिंगनुसार आपोआप भेटीगाठी (अपॉईंटमेंट्स) आणि कामे शेड्यूल करू शकतात. उदाहरणार्थ, कॅलेंडरमध्ये एकाच वेळी दोन मीटिंग येत असतील, तर एआय तुम्हाला सर्वोत्तम वेळ सुचवेल किंवा दोन्हीपैकी कोणती महत्त्वाची आहे हे ठरवून त्यानुसार नियोजन करेल.

एआय यंत्रणा वापरणाऱ्याच्या कामाचा पॅटर्न शिकते आणि त्यानुसार वेळेचे नियोजन करते. यामुळे कोणत्या कामासाठी किती वेळ लागतो, कोणता वेळ तुमच्यासाठी सर्वांत उत्पादक आहे, हे समजायला मदत होते. यामुळे अनावश्यक वेळ वाया जाण्यापासून वाचतो आणि उत्पादकता वाढते. केवळ मीटिंगची वेळ लक्षात ठेवण्याऐवजी एआय मीटिंगच्या तयारीसाठी आवश्यक असलेली माहिती, उपस्थित राहणाऱ्या लोकांची माहिती आणि इतर संबंधित तपशील पाठवू शकते. उदाहरणार्थ, प्रवासाची आवश्यकता असेल तर ते वाहतुकीच्या स्थितीबद्दलही माहिती देईल. एका मीटिंगनंतर लगेच दुसरी मीटिंग वेगळ्या ठिकाणी असेल, तर एआय दोन्ही ठिकाणांमधील प्रवासासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्यास मदत करते; जेणेकरून तुम्ही वेळेवर पोहोचू शकता. गुगल असिस्टंट किंवा सिरी आता कॅलेंडरशी अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकतात. या माध्यमांना आवाजाद्वारे मीटिंग सेट करायला सांगता येते, एखाद्या इव्हेंटबद्दल विचारता येते किंवा दिवसाचे वेळापत्रक बदलण्यास सांगता येते. एआय ॲप्स पाश्चिमात्य संस्कृतीचे पालन करत असल्याने शुभ, अशुभ, काळ-वेळ, मुहूर्त अशा बाबी नसतात. अनेक जण अमावास्येला महत्त्वाची कुठलीही गोष्ट करत नाहीत. त्यासाठी तुम्हाला पारंपरिक पंचांग पाहावे लागेल. पण आता चांगली बातमी म्हणजे ज्योतिषीही ऑनलाईन झाले आहेत. मराठी भाषेत उपलब्ध असलेल्या काही भारतीय पंचांग ॲप्समध्ये मराठी कॅलेंडर - पंचांग, हिंदू कॅलेंडर-द्रिक पंचांग आणि सनातन पंचांग यांचा समावेश आहे. या ॲप्समध्ये तुम्हाला दैनिक पंचांग, तिथी, नक्षत्र, शुभ-अशुभ वेळ तसेच मराठी सणांची माहिती मिळेल. एखाद्या भारतीय उद्योगाने एआय कॅलेंडर पंचांगासकट विकसित केले तर त्यालाही भारतात चांगली संधी आहे. जे काम पूर्वी खाजगी सचिव करत असत, ते आता एआय कॅलेंडर टूल्स प्रभावीपणे करतात. काळानुसार बदल घडले, माणसे बदलली, विचार बदलले. आता अनेक घरांमध्ये कालदर्शिका नसते (कारण गरज संपली), काही घरांमध्ये उपचार म्हणून कॅलेंडर असते पण त्यावर पूर्वीसारखे लिखाण नसते. कालाय तस्मै नमः.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पाचशे कोटींच्या आरोपाचा बॉम्ब

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मतचोरीच्या मुद्द्यावरून भाजप आणि निवडणूक आयोगावर सातत्याने आरोप करत असताना त्यांच्या पक्षाच्या पंजाबमधील एका नेत्याने काँग्रेस नेतृत्वावर आरोप करत खळबळ उडवली. पंजाब प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले नवज्योतसिंग सिद्धू यांच्या पत्नी आणि काँग्रेस नेत्या नवज्योत कौर यांनी हा आरोप केला. नवज्योतसिंग सिद्धू पंजाबच्या राजकारणात कधी परतणार, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, काँग्रेस पक्ष त्यांना मुख्यमंत्रिपदाचा अधिकृत उमेदवार जाहीर करेल, तेव्हाच ते राजकारणात परततील, असे उत्तर नवज्योत कौर यांनी दिले. मात्र त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत, तर पंजाबचा मुख्यमंत्री होण्यासाठी ५०० कोटी रुपयांची सुटकेस पाहिजे. अशी सुटकेस दिल्याशिवाय काँग्रेस पक्षात कोणतेच पद मिळू शकत नाही, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. आम्हाला काँग्रेस पक्षातून कोणी पैसे मागितले नाही, मात्र जो ५०० कोटी रुपये देऊ शकतो, तोच काँग्रेसकडून पंजाबचा मुख्यमंत्री होऊ शकतो. मात्र आमच्याजवळ एवढे पैसे नाही. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्री होऊ शकत नाही, असा खुलासाही त्यांनी केला. या आरोपांमुळे पंजाब प्रदेश काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी समोर आली आहे.

विशेष म्हणजे २०२७ मध्ये पंजाब विधानसभेची निवडणूक असल्यामुळे नवज्योत कौर यांच्या आरोपांना राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दुसरे म्हणजे पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांची भेट घेऊन आल्यानंतर नवज्योत कौर यांनी हा आरोप केला. त्यामुळे त्याचे गांभीर्य आणखी वाढले. नॅशनल हेरल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यासह अनेकांवर दुसरा एफआयआर दाखल झालेला असताना नवज्योत कौर यांनी असा आरोप करत काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेर करत आरसा दाखवला, असे म्हणायला हरकत नाही.

नवज्योत कौर यांच्या या आरोपानंतर काँग्रेस पक्षाने त्यांना निलंबित केले आहे. निलंबनाची कारवाई केल्याबद्दल नवज्योत कौर यांनी पंजाब प्रदेश काँग्रेस अध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग यांच्यावरही भ्रष्टाचाराचे आरोप करत हल्ला चढवला. नवज्योत कौर यांच्या निलंबनावर, त्यांना काँग्रेस पक्षात खरे बोलण्याची शिक्षा मिळाली, अशी बोचरी प्रतिक्रिया भाजपा प्रवक्ते शहजाद हुसेन यांनी व्यक्त केली. नवज्योत कौर यांनी नाव घेऊन हा आरोप केला नसला तरी काँग्रेसच्या नेतृत्वाला, एकूणच काँग्रेसची संस्कृती आणि कार्यपद्धतीला आरोपीच्या पिंजऱ्यात



उभे केले आहे, असे म्हणावे लागेल. एकप्रकारे काँग्रेस पक्षातील संस्थात्मक भ्रष्टाचाराचे पितळ त्यांनी उघडे पाडले. काँग्रेस पक्षातील नेते आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, यात शंका नाही. काँग्रेसमध्ये पदांचा बाजार चालतो, पैसे घेऊन पदे विकली जातात, असा आरोप याआधी अनेकांनी केला आहे. त्या आरोपांना नवज्योत कौर यांच्या ताज्या विधानामुळे एकप्रकारे दुजोरा मिळाला आहे. विशेष म्हणजे पंजाबच्या राजकारणात नवज्योतसिंग सिद्धू आणि त्यांच्या पत्नी नवज्योत कौर यांचे वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे त्यांचे आरोप उडवून लावता येणार नाही. त्यांचे आरोप पंजाबमधील काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाबाबत असले तरी काँग्रेस पक्षाची एकूणच संस्कृती पाहता त्याची व्याप्ती राष्ट्रीय स्वरूपाची राहू शकते. नवज्योत कौर यांच्या आरोपानंतर काँग्रेस पक्षावर तुटून पडण्याची आप आणि भाजपाला आयती संधीच मिळाली.

२०२७ मध्ये पंजाबच्या विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे या आरोपांचे गंभीर पडसाद उमटणे स्वाभाविक आहे. पंजाबसारख्या तुलनेत छोट्या राज्यात मुख्यमंत्रिपद ५०० कोटी रुपयांत विकले जात असेल तर अन्य मोठ्या राज्यांत विशेषत: कर्नाटकमध्ये त्या पदाची किंमत किती असेल, अशी चर्चा सुरू होणे स्वाभाविक आहे. काँग्रेसशासित अन्य एका राज्यात मुख्यमंत्रिपदाची किंमत ३५० कोटी रुपये असल्याचा आरोप एका भाजपा नेत्याने केला आहे. नवज्योतसिंग सिद्धू यांनी क्रिकेटमधून संन्यास घेतल्यानंतर राजकारणात प्रवेश केला. २००४ ची निवडणूक त्यांनी भाजपाच्या तिकिटावर अमृतसरमधून लढवली आणि जिंकली. राजकारणात येण्याच्या आधी सिद्धू भारताच्या कसोटी क्रिकेट संघात होते. १९८८ मध्ये सिद्धू आपल्या एका मित्रासह पातियाळाच्या बाजारात गेले असता, तेथे गाडीच्या पार्किंगवरून त्यांचा एका व्यक्तीशी वाद झाला. यात वादात सिद्धू यांनी केलेल्या मारहाणीमुळे त्या व्यक्तीचे नंतर रुग्णालयात निधन झाले. सिद्धू खासदार झाल्यानंतर हा खटला पुन्हा सुरू करण्यात आला. सदोष मनुष्यवधाच्या या प्रकरणात त्यांना सत्र न्यायालयाने तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. उच्च न्यायालयानेही ही शिक्षा कायम केली. तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाल्यामुळे सिद्धू यांना खासदारकीचा राजीनामा द्यावा लागला. सिद्धू यांनी या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने ही शिक्षा कमी करत एक वर्षावर आणली. एवढेच नाही तर त्यांना निवडणूक लढवण्याची परवानगी दिली. २००७ मध्ये अमृतसरमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत सिद्धू विजयी झाले. २००९ मध्ये सिद्धू पुन्हा अमृतसरमधून भाजपाचे उमेदवार म्हणून विजयी झाले. २०१६ मध्ये सिद्धू यांनी भाजपाचा राजीनामा देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आपण जन्मजात काँग्रेसी असल्याचा दावा त्यांनी तेव्हा केला होता. पंजाबमधील काँग्रेसच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. २०२१ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाने त्यांची प्रदेश काँग्रेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. २०२० ची पंजाब विधानसभेची निवडणूक काँग्रेसने सिद्धू यांच्या नेतृत्वात लढवली. या निवडणुकीत त्यांचा तर पराभव झाला, पण राज्यात काँग्रेसचेही पानिपत झाले. त्यामुळे सिद्धू यांना प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. तेव्हापासून ते राजकारणातून दूर फेकले गेले. कपिल शर्माच्या लॉफ्टर शोमध्ये ते गेल्या काही वर्षांपासून परीक्षक म्हणून काम करत टाईमपास करत आहे. पत्नी नवज्योत कौर यांच्या ५०० कोटींच्या आरोपामुळे सिद्धू पंजाबच्या राजकारणाचा केंद्रबिंदू झाले आहेत. त्यांच्या पत्नी नवज्योत कौर २०१२ मध्ये अमृतसर पूर्व विधानसभा मतादरसंघातून काँग्रेसच्या उमेदवार म्हणून निवडणूक जिंकल्या. पक्षाच्या संसदीय सचिव म्हणून त्यांनी काम केले. त्यामुळे त्यांचा आरोप दुर्लक्ष करण्यासारखा नाही. कौर यांच्या आरोपामुळे पंजाबमध्ये काँग्रेसतर्फे आतापर्यंत जे मुख्यमंत्री झाले, त्यांनी काँग्रेस नेतृत्वाला ५०० कोटी रुपयांची सुटकेस पोहोचवली होती, अशी शंका घ्यायला जागा आहे. तसे झाले असेल तर कौर यांनी आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ याचे भक्कम पुरावे द्यायला पाहिजे. काँग्रेसच्या नेतृत्वानेही त्यांच्या आरोपांची चौकशी करत आपले 'हात' भ्रष्टाचाराने बरबटलेले नाहीत, हे सिद्ध केले पाहिजे. अन्यथा नवज्योत कौर यांच्या आरोपात निश्चितच तथ्य आहे, असे पंजाबच्या जनतेला वाटेल.

९८८१७१७८१७

## वेध

**नीलेश जोशी**

# कुटुंबात निकोप संवाद आवश्यक

समाजात घडणाऱ्या काही घटना मन अस्वस्थ करणाऱ्या असतात. आपले पारंपरिक मूल्य, कुटुंब व्यवस्था यात गतीने होत असलेल्या बदलांची पुन्हा चिंतन करण्याची गरज असल्याची आठवण हे प्रसंग करून देतात. अकोला शहरातील खदान परिसरात राहणारा १४ वर्षीय मुलगा ११ नोव्हेंबरला घरून कुणालाही न सांगता निघून गेला. पोलिसांनी अक्षरशः २०० सीसीटीव्ही फुटेज तपासले. ७ जिल्ह्यांत दीड हजार किलोमीटरपर्यंतचा प्रवास करून दीडशे ते दोनशे जणांना विचारपूस केली आणि त्यानंतर या मुलाचा शोध लागला. पोलिसांनी २१ दिवस केलेल्या शोधमोहिमेचा शेवट सुखकारक होता. १४ वर्षीय बालक त्याच्या कुटुंबात परतल्यानंतर त्याच्या आणि कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील संमिश्र भाव बरेच काही सांगत होते. तर दुसरी घटना उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या शाळेतील. या शाळेत १३ वर्षीय विद्यार्थिनीला शाळेतीलच वरच्या वर्गात असणारा विशिष्ट समाजाचा मुलगा त्रास देत होता. या संदर्भातील तक्रार तिने कुटुंबीयांकडे केली होती. कुटुंबीयांनी देखील या संदर्भातील माहिती शाळेत दिली. पण अचानक तिने आत्महत्येचा मार्ग स्वीकारत जीवन संपविले. या दोन्ही घटना कुटुंबातील मोकळा संवाद कमी झाल्याची उदाहरणे आहेत. दुर्दैवाने अशा घटना, प्रसंग केवळ अपवाद नसल्याने अधिक चिंतेची बाब आहे.



भौतिक प्रगती गतीने होत आहे. त्यातच गेल्या काही दशकात जग जवळ आले असे म्हटले जाते. मोबाईल आणि समाजमाध्यमांचा अंमल सतत वाढता आहे. या बदलांचे काही अंशी चांगले परिणाम असले तरी व्यक्ती-व्यक्तींमधील संवाद कमी होत असल्याचा दुष्परिणाम चिंताजनक आहे. त्यातच आता कुटुंबातील संवादही कमी झाल्याचे दिसून येते. खरं म्हणजे कुटुंबातील संवाद म्हणजे केवळ मौखिक होणारा संवाद नव्हे. तर मौखिक संवादाशिवाय अमौखिक संवाद, भावनिक संवाद देखील महत्त्वाचा असतो आणि असा संवाद ही प्रत्येक कुटुंबात सहज होणारी बाब होती. पण आता अगदी सहज होणाऱ्या संवादाची जागा समाज माध्यमाने व्यापली आहे. संवादाऐवजी लहान असो की मोठा तो सतत मोबाईलमध्ये गुंतून पडला आहे. 'घरात सर्वच असतात पण एकमेकांपासून दूर' अशी निर्माण झालेली स्थिती अनेक प्रश्न उत्पन्न करते. जिथे संवादच खुंटला असेल तिथे संस्कारांची रुजवण तरी कशी होईल. व्यक्ती निर्माणासाठी आवश्यक असलेली कुटुंबातील बलस्थाने कमकुवत होणे हे समाज स्वास्थ्यासाठी धोकादायक आहे. म्हणून वेळीच सावध होण्याची आणि योग्य उपाययोजनांची आवश्यकता ओळखली पाहिजे. खरं म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया हा कुटुंब व्यवस्थेवर भक्कम उभा आहे. त्यातही संयुक्त कुटुंबपद्धती हे तर आपले वैशिष्ट्यच. पण कालौघात संयुक्त असलेले कुटुंब चौकोनी तर आता त्रिकोणी झाले आहे. कुटुंब व्यवस्थेतून जीवनमूल्यांची रुजवण, नकळत होणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. कुटुंबातील अनेक छोट्या-मोठ्या रूढी-परंपरा संस्कार देणाऱ्या असतात. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. पण समाजमाध्यमांमुळे कुटुंबामधील घटत असलेला निकोप संवाद अनेक समस्यांचे मूळ आहे. म्हणूनच कुटुंब व्यवस्था बळकट व्हावी यासाठी भजन, भोजन, भाषा, भूषा, भवन आणि भ्रमण या उपाययोजना करण्याचे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटना करीत आहेत. घरातील सर्वांनी एकत्र बसून रोज किंवा आठवड्यातून दोन वेळा तरी भोजन करावे ज्यावेळी टीव्ही, मोबाईल आदी दूर ठेवून गप्पा मारत भोजनाचा आस्वाद घ्यावा, असे म्हटले आहे. याचा मुख्य उद्देशच निकोप संवाद व्हावा असा म्हणावा लागेल. कुटुंबात निकोप आणि निर्भय संवाद झाला असता तर कदाचित अकोल्यात आत्महत्या केलेल्या 'त्या' मुलीचा जीव वाचला असता.

९४२२८६२४८४

## आजचे संघगीत-६९

गुरुवार, ११ डिसेंबर २०२५

### संघ माझा चांगला गाव समदा रंगला

संघ माझा चांगला गाव समदा रंगला
चंग आम्ही बांधला, भेदभाव संपला ॥धृ.॥

मोकळ्या या मैदानावर वारा वाहे झुळझुळ
पावलांच्या तालावर लेझिम वाजे खुळखुळ
खराखुरा खेळ खेळू, शत्रु करू खिळखिळा ॥१॥

आट्यापाट्या हुतूतूच्या आंखल्या या पाट्या
उठाबशा जोर काढून फिरवू या लाठ्या
जुलूमाला खो देऊन संघ वाढू लागला ॥२॥

उडीसंगं चकाकतं जंबियाचं पातं
तलवारीचे वार कसे, निघती तोलात
सरसावुनी भिडविती, रोखलेला भाला ॥३॥

गावकरी कामधंदे, हातचे सोडून
शाखेवरी धाव घेती बोलणी ऐकून
संघगाणी गावयाचा, छंद त्यांना लागला ॥४॥

हिंदुस्थान हिंदूंचा भगवा झेंडा त्यांचा
म्होरक्याचं ऐकायाचं संघ सेवकांचा
बघा बघा गाव सारा आला प्रार्थनेला ॥५॥

## वाचक पत्रे

### पथदिव्यांच्या वेळा बदलेल का?

हिवाळ्याच्या दिवसांत दिवस बराच उशिराने उजाडतो आणि तिकडे लवकर मावळतोही. प्रशासनाकडे पथदिवे निश्चित वेळेत सुरू व बंद करण्याची व्यवस्था आहे. तरी बऱ्याच ठिकाणी रस्ते दिवसाच्या उजेडातही जळताना दिसतात. याकडे ना प्रशासनाचे लक्ष असते, ना पौर्णिमेला काही वेळ लाईट बंद ठेवण्याचे आवाहन करणाऱ्या सामाजिक संस्थांचे. सकाळी ५.३० ला पथदिवे बंद केले जातात तेव्हा आसमंतात बराच काळोख असतो. हा काळोख साधारणपणे जानेवारीच्या अखेरीसपर्यंत असतो. तेव्हा प्रशासनाला विनंती आहे की सकाळी पथदिवे बंद करण्याची वेळ किमान वीस मिनिटांनी वाढवावी.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### वाहतूक कोंडीचा चाकरमान्यांना त्रास

नागपुरात सध्या मेट्रोचे काम सुरू असल्याने अनेक ठिकाणचे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीची कोंडी हा एक ज्वलंत प्रश्न सध्या नागपूर तथा आसपासच्या परिसरात नोकरीकरिता ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना सतावतो आहे. एकतर मेट्रोचे काम आणि त्यातल्या त्यात अनेक ठिकाणचे रस्ते बंद करण्यात आल्याने लहान वाहने वाटेल तिथून आपली जागा शोधतात. त्यामुळे एकाच रस्त्यावर सर्व वाहने आल्याने अनेकदा वाहतुकीची कोंडी होते आहे. परिणामी, अगदी सकाळीच घरून निघणाऱ्या चाकरमान्यांना रात्री परतताना दीड ते दोन तास रोजच उशीर होत असल्याने, त्यांचे हाल होत आहे. कुटुंबाला सुद्धा द्यायला त्यांच्याजवळ वेळ नसल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येतो आहे.

वाहतुकीची ही कोंडी सोडविण्यासाठी एकतर रस्त्यांच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण हटवायला हवे. तसेच, आडवी तिडवी वाहने चालवून ट्रॅफिक जाम करणाऱ्या लहान वाहनधारकांवर जबर कारवाई करण्यात यावी. एकतर बर्डीवरील पुलावरून बसेस वाहतूक बंद केल्याने खाली सिग्नलवर ताटकळत राहावे लागते. चाकरमान्यांच्या संतापाचा विचार करता संबंधित खात्याने वाहतूक कोंडी सोडवायला हवी.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### वेदमूर्ती देवव्रत रेखे यांचे अभिनंदन!

१९ वर्षीय देवव्रत यांनी दररोज ४ तास असे सलग ५० दिवसांत केलेले २००० वेदमंत्रांचे दंडक्रम पारायण ही एक ऐतिहासिक घटना आहे. दंडक्रम पद्धतीने स्वर, लय आणि उच्चार यांचा अचूक समतोल सांभाळून, श्वासावर नियंत्रण ठेवून वेदांचे पारायण करताना एक जरी चूक झाली तरी पारायण व्यर्थ जाते असे सांगितले जाते. विशेष म्हणजे देवव्रत यांनी ही कठोर साधना कुठली उपाधी मिळवण्यासाठी केलेली नाही; तर विश्व कल्याण आणि वेदांचे रक्षण हे त्यामागील प्रयोजन आहे. देवव्रत यांच्या या अद्वितीय कामगिरीबद्दल त्यांना दंडक्रम विक्रमादित्य ही उपाधी मिळाल्यानंतर त्यांनी, मी अजून पूर्ण एक पाऊल सुद्धा टाकलेले नाही, असे नम्रपणे सांगितले. देवव्रत यांच्या या अहंशून्य स्थितीतून समाजाला खूप शिकण्यासारखे आहे. वेदांमधील ज्ञान पुढील पिढीपर्यंत जाण्यासाठी ते मुखोद्गत करण्याची परंपरा जपली पाहिजे, मौखिक ज्ञान हे अविनाशी आहे. हल्ले, आक्रमणे, आगी लावणे, यापासून मौखिक ज्ञान अबाधित राहते. देवव्रत यांचे दंडक्रम पारायण हे अभिमानास्पद, कौतुकास्पद आणि विशेषत: झेन झीसाठी प्रेरणादायी आहे!

**छाया मिराशी**/पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# एककमान पुलाखालून दुचाकी व स्कूल वाहतूक करणाऱ्या गाड्यांनाच परवानगी द्या

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

शहर व कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा भैय्या चौक-मरीआई चौक-दादरा पूल पाडल्यानंतर, खमितकर अपार्टमेंट येथील एककमान पुलाखालून येणाऱ्या गाड्या आहेत. त्याठिकानाहून फक्त दुचाकी वाहन व स्कूल वाहतूक करणाऱ्या गाड्यांनाच परवानगी देण्यात यावी विद्यार्थी वेळेवर आपल्या शाळेत पोहोचतील अशी मागणी एकात्मता बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिराळकर यांनी निवेदनाद्वारे वाहतुक शाखेकडे निवेदनाद्वारे केली आहे.एककमान हा वाहतुकीसाठी अत्यंत लहान पूल असून, वाहतुकीचा खोळंबा होणार नाही याची दक्षता प्रशासनांनी घ्यावी. चारचाकी वाहनांसाठी ५४ मीटर रस्ता थेट पुणा नाका-संभाजी महाराज चौक मार्गे निघतो. त्यामुळे चारचाकी वाहनांना एककमानकडून जाण्या-येण्यास प्रतिबंध लावणे गरजेचे आहे. खमितकर अपार्टमेंट व शेटे वास्तीजवळ वाहतूक शाखेचे दोन वाहतूक नियंत्रण पोलिस कर्मचारी येथे असणे गरजेचे असल्याचे निवेदन देताच तात्काळ वाहतूक नियंत्रण कक्षाचे पीआय रवींद्रनाथ भंडारे यांनी पाहणी केली आणि तत्काळ अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन दिले.

---


## मध्य रेल्वे

सोलापूर विभाग

**ई-टेंडर सूचना**

डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेतः- त्यांच्यासह कामाचे नाव परिसरः मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील पादचारी भुयारी मार्गांच्या तरतूदीशी संबंधित सिग्नलिंग कामे.

निविदा क्रमांकः SUR-N-T-2025-26-29 कामाची अंदाजे किंमतः रु. 4,71,33,197.49 निविदेची किंमत फॉर्मः शून्य बयाणा रक्कम जमा करायची आहेः रु. 3,85,700 पूर्ण कामाचा कालावधीः 12 महिने निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 29.12.2025 15.30 वाजल्यानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/ जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाधारकांना कंपनीच्या नावासह वर्ग डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (ईएमडी) चे पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा कागदपत्रात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम एस अँड टी शाखा,**
**सी.आर. सोलापूर**

Apex-083

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे


---

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ८१९४२०४९ | मालमत्ता तारण कर्ज | १. सागर दादासो कुलकर्णी<br>२. दादासाहेब दत्तात्रय कुलकर्णी | २९.११.२०२५ | रुपये ८,४२,६२०.०६/- |

**मालमत्तेचा पत्ताः** अकलूज सी.टी.एस. क्रमांक ७४/अ मधील बिगर-कृषी मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल क्षेत्रफळ ७०५.४० चौ. मीटर श्री. दादासाहेब दत्तात्रय कुलकर्णी पैकी क्षेत्रफळ ११२.५ चौ. मीटर अकलूज नगरपरिषद मिलकट क्रमांक १३६, अकलूज येथे स्थित, अकलूज नगरपरिषदेच्या स्थानिक हद्दीत, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि पूर्वेकडे अशी सीमाः श्री. जमील महंमद शेख यांची मालमत्ता सर्वेक्षण क्रमांक ७४/अ पश्चिमेकडेः श्री. बगळे यांची मालमत्ता सर्वेक्षण क्रमांक ७४/अ च्या भागात उत्तरः रस्ता दक्षिणः रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : ११/१२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोंकांस विशेषतः जिजामाता नगर, मुरारजी पेठ, सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील जिजामाता नगर, कल्पना टॉकिजच्या शेजारी, मुरारजी पेठ सोलापूर येथील झोपडी नं.४ ज्याचे क्षेत्र १५ × १५ चौ. फुट जागेत चोहोबाजूंनी पत्र्याचे शेड व वर पन्हाळी पत्रे घातलेली एक मोठी खोली असून सदर खोली ही आमचे अशिल श्रीमती. विजया प्रकाश सुरवसे यांचे मयत पती कै. प्रकाश दत्तात्रय सुरवसे, रा. झोपडी क्रं. ४, जिजामाता नगर, कल्पना टॉकिजच्या शेजारी, मुरारजी पेठ, सोलापूर यांचे नांवे सो.म.पा. च्या रेकॉर्डला नोंद असून तशी टॅक्स पावतीवर त्यांचे नांवाची नोंद असलेली झोपडी नं.४ व मिळकत नं. ०५०५४०५०६३ ही आहे. परंतु आमचे अशिलाचे पती प्रकाश दत्तात्रय सुरवसे यांचे दिनांक : १५/१०/२०१७ रोजी सिव्हीज हॉस्पिटल सोलापूर येथे हृदयविकाराच्या अॅटॅकमुळे निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांची कायदेशीर धर्मपत्नी आमचे अशिल श्रीमती. विजया प्रकाश सुरवसे या असून सदर जागेस त्या कायदेशीर वारसदार पत्नी म्हणून असल्याने त्यांनी सदर सो.म.पा.च्या रेकॉर्डला त्यांचे पती कै. प्रकाश दत्तात्रय सुरवसे यांचे नांव कमी करुन त्यांच्या नांवाची म्हणजेच श्रीमती. विजया प्रकाश सुरवसे या नांवाची नोंद होवून तशी टॅक्स आकारणी त्यांचे नांव मिळणेकामी सो.म.पा. कडे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सबब सदर वर नमुद झोपडी नं.४, जिजामाता नगर, कल्पना टॉकिजच्या समोर, मुरारजी पेठ, सोलापूर या जागेवर कोणाचे हक्क, हितसंबंध, वारसा, बक्षिस, पोटगी, टाच, गहाण, दान, वा इतर कोणत्याही प्रकारेच हक्क अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आंत सबळ पुराव्यानिशी कागदपत्रानिशी खालील पत्यावर संपर्क साधावा. सदर मुदतीत कोणाची, कसल्याही प्रकारची हरकत वा तकार न आल्यास सदर जागेस आमचे अशिल त्यांच्या नांवाची म्हणजेच श्रीमती. विजया प्रकाश सुरवसे या नावाची सो.म.पा.च्या रेकॉर्डला नोंद करुन घेतील. मग त्यानंतर कोणाचीही हरकत, वा तकार कली/घेतली जाणार नाही. याची या जाहीर नोटीसीने नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीखः १०/१२/२०२५.

सही/-
अशिल
**श्रीमती. विजया प्रकाश सुरवसे**

सही/-
**ॲड. भागवत आर. पवार**
बी.ए.ऑनर्स एलएल.बी
रा. सर्व्हे नं. ५२२/२/३/४ वसंत विहार
जवळ स्वराज विहार, पुणे नाका,
सोलापूर - १ मो. ९८६०८०४५२०

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर व सोलापूर शहर व जिल्हयातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ३३९/३४२/१/ब यातील ''दत्त विहार'' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या वसाहती मधील प्लॉट नं. १७७ याचे एकूण क्षेत्र २०१.४४ चौरस मिटर व प्लॉट नं. १७८ याचे एकूण क्षेत्र १४०.१७ चौरस मिटर असे दोन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्र ३४१.६१ चौरस मिटर इतके आहे. सदर दोन्ही प्लॉटची चतुःसिमा :-

| | प्लॉट नं. १७७ | प्लॉट नं. १७८ |
|---|---|---|
| पूर्वेस :- | प्लॉट नं. १९५ | प्लॉट नं. १९५ |
| दक्षिणेस :- | ले-आऊट रस्ता | प्लॉट नं. १७७ |
| पश्चिमेस :- | ले-आऊट रस्ता | ले-आऊट रस्ता |
| उत्तरेस :- | प्लॉट नं. १७८ | प्लॉट नं. १७९ |

येणेप्रमाणे वर्णन करण्यात आलेली सदर मिळकत ही विद्यमान मालक श्री. ज्योतीनाथ वासुदेव संकपाळ रा. फ्लॅट नं. २, अमीता अपार्टमेंट टिळकवाडी, नाशिक यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खुषखरेदीने विकण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कमही स्विकारलेली झालेला आहे.

सदर वर नमूद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलाना दिली आहे. आमचे अशिल लवकरच नमूद मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करुन घेणार आहेत. तथापी ज्या कोणाचाही या मिळकतीत करार, मदार, साठेखत, दान, गहाण, टाच, लिज, बक्षिस, पोटगी, बोजा, विल्हेवाट, वाटणीपत्र, मृत्यूपत्र या अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हक्क अथवा हितसबंध असल्यास अथवा कोर्ट केसेस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसाचे आत खालील पत्यावर भेटून, कागदोपत्री पुरावा देवून लेखी हरकत द्यावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरुन रजिस्टर खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार वर नमूद मिळकतीवर अगर आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये व कोणास कळविले नाही असे होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. दिनांक- १०/१२/२०२५

**सही/-**
अशिल ॲडव्होकेट
**ॲड. अश्विन भि. बनसोडे**
मो.नं. ९८२२७१७६०१/८१७७९५८७७४

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

अशोक भगवान खटके वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १११/२०२५ | ३) औदुंबर भगवान खटके, वय-४९, धंदा-शेती, रा. गोसावी वस्ती, वेणेगाव, ता. माढा जि. सोलापूर | ४,०६,५३६ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ याची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

आत्माराम हरीदास यादव वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ८९/२०२५ | २) आझाद खाजाभाई शेख, वय-४३, धंदा-स्टेशनरी, रा. चव्हाणवाडी रोड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर | ४३,९६६ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ याची नोटीस पत्त्यावर मिळून आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

बाळासाहेब उत्तम नाळे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०४/२०२५ | १) बाळासाहेब उत्तम नाळे, वय-५०, धंदा-शेती, रा. वेणेगाव कंपनी पेट्रोल पंप, ता. माढा जि. सोलापूर | ४,३४,६३६ | २६/१२/२०२५ |
| २ | १०४/२०२५ | २) हिरालाल शांतीलाल घोडके, वय-६६, धंदा-शेती, रा. शुक्रवार पेठ, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | ४,३४,६३६ | २६/१२/२०२५ |
| ३ | १०४/२०२५ | ३) नवनाथ अंकुश नवले, वय-३६, धंदा-शेती, रा. वेणेगाव, ता. माढा जि. सोलापूर | ४,३४,६३६ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ याची नोटीस अपूर्ण पत्ता व प्रवादी नं. २ याची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ३ याची नोटीस घेण्यास नकार** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

राहूल दिलीप कोठारी वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ९०/२०२५ | १) राहूल दिलीप कोठारी, वय-४७, धंदा-किराणा शॉप, रा. मारवाडी पेठ, पोस्ट ऑफिसजवळ, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | १,१९,६३३ | २६/१२/२०२५ |
| २ | ९०/२०२५ | २) धन्यकुमार रामचंद्र लाकुळे, वय-५६, धंदा-मजुरी, रा. शुक्रवार पेठ, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | १,१९,६३३ | २६/१२/२०२५ |
| ३ | ९०/२०२५ | ३) संतोष मनीलाल शहा, वय-५८, धंदा-किराणा शॉप, रा. साईराज मंगल कार्यालय इंदापूर रोड, टेंभूर्णी, ता. माढा जि. सोलापूर | १,१९,६३३ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ ते ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

शांतीलाल भारत कुटे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०६/२०२५ | २) बाळासाहेब प्रल्हाद बागवाले, वय-५२, धंदा-शेती, रा. बागवाले वस्ती, बेंबळे रोड, टेंभूर्णी ता. माळशिरस जि. सोलापूर | ३,६२,९४८ | २६/१२/२०२५ |
| २ | १०६/२०२५ | ३) हनुमंत नरहरी कुटे, वय-५१, धंदा-शेती, रा. बेंबळे रोड, टेंभूर्णी, ता. माढा, जि. सोलापूर | ३,६२,९४८ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ याची नोटीस पत्त्यावर नाही व प्रवादी नं. ३ याची नोटीस घेण्यास नकार** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

संतोष कल्याण मोटे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०३/२०२५ | २) सागर दादासाहेब घोडके, वय-३७, धंदा-नोकरी, रा. ४७/७३, टेंभूर्णी ता. माढा, जि. सोलापूर | १,२५,३६८ | २६/१२/२०२५ |
| २ | १०३/२०२५ | ३) समाधान संजय बहीरट, वय-२८, धंदा-शेती, रा. नाळे वस्ती, बायपास रोड, टेंभूर्णी, ता. माढा जि. सोलापूर | १,२५,३६८ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ ते ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ व ३ याची नोटीस अपूर्ण पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

सुरेखा वाघनाथ गवळी वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ११४/२०२५ | ३) मंगेश विठ्ठल जाधव, वय-४२, धंदा-पानशॉप, रा. लोकरे वस्ती, शिराळ (टें), ता. माढा, जि. सोलापूर | ४४,९०९ | २६/१२/२०२५ |
| २ | ११४/२०२५ | ४) विलास दिलीप लोंढे, वय-४१, धंदा-फोटोग्राफी, रा. भीमानगर, ता. माढा, जि. सोलापूर | ४४,९०९ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ याची नोटीस अपूर्ण पत्ता व प्रतिवादी नं. ४ याची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

सागर सतिश कुटे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०२/२०२५ | २) नंदाबाई संतोष कुटे, वय-३१, धंदा-शेती, रा. गट नं.२, महाळुंग, ता. माळशिरस जि. सोलापूर | २,६२,९९९ | २६/१२/२०२५ |
| २ | १०२/२०२५ | ३) बंडू नामदेव कांबळे, वय-४४, धंदा-सेंट्रींग काम, रा. खांडेकरवाडी महुद ता. पंढरपूर, जि. सोलापूर | २,६२,९९९ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ याची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही व प्रवादी नं. ४ याची नोटीस अपूरा पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

अमोल भारत चौधरी वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०८/२०२५ | २) चंद्रशेखर पोपट थोरात, वय-४७, धंदा-सलून दुकान, रा. भवानीनगर, टेंभूर्णी, ता. माढा जि. सोलापूर | ३,६६,६६० | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ याची नोटीस अपूर्ण पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

अमोल सुभाष केचे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १०७/२०२५ | ३) अंकुश ज्ञानदेव आतकर, वय-५४, धंदा-नोकरी, रा. बारलोणी गावठाण, ता. माढा जि. सोलापूर | २,४२,१९२ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

चांगदेव सोमनाथ लोखंडे वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ११५/२०२५ | २) मोहन रामचंद्र कुटे, वय-५१, धंदा-शेती, रा. आहेरगाव, ता. माढा जि. सोलापूर | ६९,५१२ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ याची नोटीस सदर इसम पत्त्यावर मिळून आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

---

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

महेश पमराज महाडिक वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ९१/२०२५ | २) सोमनाथ पमराज महाडिक, वय-३९, धंदा-इलेक्ट्रीक शॉप, रा. ६४/ब, तळेकर वस्ती, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | ३,४०,५०८ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक 0३/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाला कांस्यपदक



**चेन्नई :** बुधवारी येथे झालेल्या तिसऱ्या स्थानाच्या प्ले-ऑफ सामन्यात अर्जेंटिनावर ४-२ असा रोमांचक विजय मिळवून भारताने कनिष्ठ पुरुषांच्या संघाने एफआयएच हॉकी ज्युनियर विश्वचषक २०२५ मध्ये कांस्यपदक मिळवले. भारताची वाईट सुरुवात सुरूच राहिली. तिसऱ्या चरणात ०-२ ने पिछाडीवर राहिल्यानंतर यजमान संघाने अंतिम चरणात जोरदार मुसंडी मारली. पेनॉल्टी कॉर्नरवरून दोन जलद गोल केले. त्यानंतर शारदा नंद तिवारीने तीन मिनिटांपेक्षा कमी वेळात पेनॉल्टी स्ट्रोकमध्ये रूपांतरित करून संस्मरणीय विजय मिळवला. त्यानंतर अनमोल एक्काने पेनॉल्टी कॉर्नरवरून आणखी एक गोल केला.

### ओडिशा मास्टर्स बॅडमिंटन मध्ये उन्नती, तन्वी, किरणची आगेकूच

**कटक :** भारताच्या युवा संघाने ओडिशा मास्टर्स २०२५ बॅडमिंटन स्पर्धेत पहिल्या दिवशी प्रभावी विजय आणि मोठे उलटफेर केले. रौनक चौहान, इशाराणी बरुआ व तस्नीम मीरच्या प्रमुख उपस्थितीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उन्नती हुडा, तन्वी शर्मा, किरण जॉर्जनेही आत्मविश्वासाने पुढील फेरीत प्रवेश केला.

रौनक चौहानने ६४ मिनिटांत हाँगकाँग चीनच्या तिसऱ्या मानांकित खेळाडूला २१-१७, २१-१९ असे पराभूत केले. रौनकचा सामना आता त्याच्याच संघमित्र वरुण कपूरशी होईल. वरुणने ५६ मिनिटांत युएईच्या भरत लतीशचा २१-१६, १६-२१, २१-१९ असा पराभव केला.

पुरुष एकेरीत अव्वल मानांकित थरुन मन्नेपल्लीने मानव चौधरीवर २१-५, २१-८ असा विजय मिळवत उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आणि पुढील फेरीत त्याचा सामना त्याच्याच देशाच्या गोविंद कृष्णाशी होईल. गोविंदने कविन थंगमला २१-१२, १९-२१, २१-१५ असा पराभव केला. दुसऱ्या क्रमांकाच्या किरण जॉर्जनेही राजेश श्रीकरवर २१-१२, २१-१३ असा विजय मिळवला आणि पुढच्या फेरीत त्याचा सामना इंडोनेशियाच्या डेंडी त्रियंस्याशी होईल.

महिला एकेरीत आसामच्या २१ वर्षीय इशाराणी बरुआने दुसऱ्या मानांकित थायलंडच्या पोर्नपिचा चोईकीवोंगचा २१-१५, २१-८ असा पराभव केला आणि नंतर तिला पुढेचाल मिळाली व तिने उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले.

अव्वल मानांकित उन्नती हुडाने युएईच्या प्रकृती भरतचा ३२ मिनिटांत २१-१२, २१-१८ असा पराभव केला. उप-उपांत्यपूर्व फेरीत तिची गाठ थायलंडच्या टिडाप्रोन क्लीबीयेसुनशी पडेल. तिसऱ्या मानांकित तन्वी शर्मानेही जपानच्या ॲना इवाकीवर २१-८, १७-२१, २१-१८ असा विजय मिळवला आणि पुढील फेरीत तिचा सामना भारताच्या आदिती भट्टशी होईल. ॲनाने लियांग का विंगला २१-१९, २४-२२ असा पराभव केला.

तस्निम मीरने चौथ्या मानांकित रक्षिता श्रीचा पराभव करून भारताच्या उलटफेर यादीत भर घातली.

### भारतात मार्चमध्ये होणार राष्ट्रकुल खो-खो स्पर्धा

**नवी दिल्ली, १० डिसेंबर -**

पुढील वर्षी ९ ते १४ मार्च दरम्यान होणाऱ्या पहिल्या राष्ट्रकुल खो-खो स्पर्धेत २४ हून अधिक देश सहभागी होतील. या स्पर्धेसाठी भारतात स्थळ अद्याप निश्चित झालेले नाही. राष्ट्रकुल क्रीडा महासंघाने (सीएस) भारतात या स्पर्धेला मान्यता दिल्यानंतर भारतीय खो-खो महासंघ अनेक राज्यांशी स्थळ निश्चित करण्यासाठी चर्चा करत आहे. या स्पर्धेमध्ये १६ पुरुष आणि तितक्याच महिला संघ सहभागी होतील, या वर्षी जानेवारीमध्ये दिल्ली येथे झालेल्या पहिल्या खो-खो विश्वचषकाच्या धर्तीवर ही स्पर्धा आयोजित केली जाईल, ज्यामध्ये २३ देशांनी भाग घेतला होता. २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी अहमदाबादला अधिकृतपणे यजमान शहर म्हणून मान्यता दिल्यानंतर ही भारतातील पहिलीच राष्ट्रकुल खो-खो स्पर्धा असेल. ही स्पर्धा दोहा आशियाई क्रीडा स्पर्धा (२०३०), राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा (२०३०) आणि ब्रिस्बेन ऑलिम्पिक (२०३२) मध्ये खो-खोचा समावेश करण्याच्या दिशेने एक पाऊल ठरेल, असे भारतीय खो-खो महासंघाचे सरचिटणीस उपकार सिंग विर्क म्हणाले.

# भारत मुल्लानपूरमध्ये आघाडी मिळविण्यास उत्सुक



सराव करताना शुभमन गिल



एडन मार्कराम

### गिलवर दबाव वाढतोय्

**मुल्लानपूर, १० डिसेंबर**

नवीन चंदीगडच्या मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग पीसीए स्टेडियमवर गुरुवारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी मिळविण्यास उत्सुक असेल.

सर्वात लहान फॉर्मेटमध्ये अद्याप आपले वर्चस्व सिद्ध केले नसले तरी शुभमन गिल दक्षिण आफ्रिकेवर आपले वर्चस्व वाढवण्याच्या प्रयत्नात असेल. मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये केवळ एक प्रवास दिवसाचा फरक असला तरीही गिलला गुरुवारी रात्री आपल्या बॅटची चमक दाखवावी लागणार आहे.

भारताने मालिकेच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला जोरदार धक्का दिला, पण सप्टेंबरमध्ये आशिया चषकामध्ये टी-२० पुनरागमन केल्यानंतर गिलने केलेले पुनरागमन चर्चेचा विषय राहिले आहे. इंग्लंडमध्ये कसोटी कर्णधार म्हणून प्रभावी पदार्पणानंतर गिलला पुन्हा टी-२० संघात आणण्यात आले.

संजू सॅमसन व त्याचा पंजाब संघातील सहकारी अभिषेक शर्मा हे वरच्या क्रमांकावर काम करत असले तरी, संघ व्यवस्थापनाने टी-२० सलामीवीर म्हणून गिलच्या क्षमतेवर प्रचंड विश्वास दाखवला. केरळच्या या फलंदाजाला स्थान देण्यात आले व तेव्हापासून तो अंतिम एकादशमध्ये स्थान मिळविण्यासाठी संघर्ष करत आहे.

गत वर्षीच्या टी-२० विश्वचषकापर्यंत विराट कोहलीने भारतासाठी बजावलेली भूमिका कसोटी व वन-डे कर्णधार निर्दोषपणे पार पाडू शकतो. गिल निश्चितच पॉवरप्लेमध्ये अभिषेक शर्मासारखा हातोडा मारू शकत नाही आणि म्हणूनच त्याच्यासाठी काय सर्वोत्तम आहे हे शोधण्याची आवश्यकता आहे. गिलशिवाय गत १२ महिन्यांत सातत्य शोधण्यात अपयशी ठरलेला कर्णधार सूर्यकुमार यादव सुद्धा अतिरिक्त तपासणीला सामोरे जात आहे.

काही महिन्यांनंतर, सूर्यकुमार घरच्या मैदानावर भारताच्या विश्वचषक बचावाचे नेतृत्व करेल, तेव्हा अतिरिक्त जबाबदारी लक्षात घेता, त्याच्या बॅटमधून धावांचा पाऊस पडणे महत्त्वाचे असेल.

नवीन चंदीगडच्या थंड वातावरणात भारतीय संघ विजयाशी तडजोड करण्याची शक्यता कमी आहे. दुखापतीतून राष्ट्रीय कर्तव्यावर परतताना हार्दिक पंड्याने खेळातील आघाडीचा अष्टपैलू खेळाडू म्हणून आपला दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला. त्याच्या २८ चेंडूत ५९ धावांची चिवट खेळी केली.

दुसरीकडे, पहिल्या टी-२० सामन्यात विजयासाठी १७६ धावांचा पाठलाग करताना ७४ धावांत गारद झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ आता दुसऱ्या सामन्यात फलंदाजीत खूपच चांगली कामगिरी करण्यास उत्सुक असेल. आजकाल टी-२० क्रिकेटमध्ये, आजूबाजूला पाहण्यासाठी व आत्मसात करण्यासाठी फारसा वेळ नाही. आमच्या बाजूने काही गती मिळवणे हे स्पष्ट आहे व आम्ही त्यावर थोडक्यात चर्चा करू, असे कर्णधार एडेन मार्कराम म्हणाला.

सप्टेंबरमध्ये दोन महिला एकदिवसीय सामने आयोजित केल्यानंतर हे ठिकाण पहिले टी-२० आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करणार आहे.

**आजचा सामना**

**भारत-दक्षिण आफ्रिका दुसरा टी-२० सामना आज**
**स्थळ :** महाराजा यादविंद्र सिंग पीसीए स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्‌सवर

#### युवराज, हरमनप्रीतच्या नावाच्या स्टॅण्डचे अनावरण

सामन्याच्या वेळी, युवराज सिंग आणि हरमनप्रीत कौर यांच्या नावावर असलेल्या स्टॅण्डचेही अनावरण केले जाईल.

#### प्रतिस्पर्धी संघ असा

**भारत :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, जितेश शर्मा, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, संजू सॅमसन.

**दक्षिण आफ्रिका :** एडन मार्कराम (कर्णधार), क्विंटन डी कॉक (यष्टिरक्षक), ट्रिस्टन स्टब्स, डेवाल्ड ब्रेविस, डेव्हिड मिलर, डोनोव्हन फरेरा, मार्को जॅन्सन, केशव महाराज, लुथो सिपामला, ॲनरिक नॉर्टिज, लुंगी नगिदी, जॉर्ज लिंडे, क्वेना माफाका, रीझा हेंड्रिक्स, झेड बोस्चमन, ओबी बोस्चिन, ओबी बॉन्झिल.

(वृत्तसंस्था)

# दुखापती तुमची मानसिक परीक्षा घेतात : हार्दिक

**कटक, १० डिसेंबर**

दुखापती या खेळाडूंची मानसिक परीक्षा घेतात. दुखापतींमुळे आत्मविश्वास कमी झाल्यानंतर सकारात्मक मानसिकतेमुळे मी मजबूत, मोठा व उत्तमपणे पुनरागमन करू शकलो, असे मत भारताचा स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्याने व्यक्त केले. दुखापतीमुळे सुमारे दोन महिन्यांची विश्रांती घेतल्यानंतर मंगळवारी हार्दिकने पुनरागमन केले व पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेट सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १०१ धावांनी मोठा विजय मिळवला.

३२ वर्षीय अष्टपैलू हार्दिक पांड्याने पुनरागमनात २८ चेंडूत ५९ व १६ धावांत एक बळी टिपला.



माझी मानसिकता खरोखरच मजबूत, उत्तम व मोठ्या खेळीसह पुनरागमन करण्याची होती. सारे काही मनासारखे झाले, याचे श्रेय प्रियजणांना जाते, असे हार्दिक म्हणाला.

मी खंबीरपणे उभा राहिलो आहे, मी बऱ्याच गोष्टी शिष्टाचाराने केल्या आहेत व त्यामुळे मला आत्मविश्वास मिळाला आहे, एक खेळाडू म्हणून मला स्वतःवर खरोखर विश्वास आहे, असेही तो म्हणाला. हार्दिक पांड्या हा दोन महिन्यांत भारताच्या टी-२० विश्वचषक मोहिमेत एक महत्त्वाचा सदस्य असेल.

मला जमिनीवर प्रत्येक सेकंदाचा आनंद घ्यायचा आहे. मला प्रेक्षकांकडून ऊर्जा मिळते, ही ऊर्जा मला अपेक्षा पूर्ण करण्यास मदत करते, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे, असे तो म्हणाला.

२०२४ मध्ये गुजरात टायटन्सकडून मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून आल्यानंतर हार्दिक पांड्याने वेस्ट इंडीजमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकात आपल्या विजयी कामगिरीने मुंबईतील प्रतिकूल प्रेक्षकवर्गाला प्रेमळ चाहत्यांमध्ये रूपांतरित केले.

(वृत्तसंस्था)

### क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे शिष्टमंडळ लाहोरमध्ये

**लाहोर :** जानेवारीमध्ये पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेपूर्वी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे (सीए) एक शिष्टमंडळ लाहोरमध्ये आहे.

या शिष्टमंडळात एक स्वतंत्र सुरक्षा सल्लागार व ऑस्ट्रेलियन क्रिकेटर्स संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याचा समावेश आहे. ऑस्ट्रेलिया पुढील वर्षाच्या सुरुवातीला दोन टप्प्यात खेळवल्या जाणाऱ्या पांढऱ्या चेंडूच्या मालिकेसाठी पाकिस्तानचा दौरा करेल. पहिल्या टप्प्यात जानेवारीमध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) अद्याप ठिकाणे आणि तारखा जाहीर केल्या नसल्या तरी, तिन्ही सामने लाहोरमध्ये होतील असे दिसते. ऑस्ट्रेलिया पुढील वर्षी मार्चमध्ये तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी पुन्हा पाकिस्तानचा दौरा करणार आहे, परंतु २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकापूर्वी ही मालिका दुसऱ्या वेळेत हलवण्याची शक्यता आहे.



### सेंट जोसेफ स्कूल १७ वर्षांखालील गटात विजेता; शालेय क्रिकेट

**सोलापूर, दि.१० डिसेंबर-**

शालेय क्रिकेट स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अंतीम सामन्यात त्यांनी सेंट जोसेफने हरिभाई देवकरण प्रशालेवर तीन गडी राखून विजय मिळवला. मोहम्मद सफा झाकीर हुसेन खतीब याने ३५ केल्या. सिध्दांत म्हंता याने १२ धावात तीन बळी घेतले. खतीब सामानावीराचा पुरस्कार पटकावला. म्हंता याने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक १५ बळी घेतले. १७ वर्षाखालील मुलांचे नेतृत्व सिध्दांत म्हंता तर १४ वर्षाखालील मुलांचे नेतृत्व समर्थ बोबडे याने केले. संघास क्रीडा शिक्षक सनी भोसले, प्रशिक्षक बॅरी ब्रॉन्कस्ट यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड यांनी अभिनंदन केले.

**विजेता १७ वर्षाखालील मुलांचा संघ :** सिद्धांत म्हंता, मोहम्मद सफा, अथर्व खोबण, अथर्व गायकवाड, दक्ष दीदी, सौरभ शिंदे, अमेय वझीरकर, शंकरलिंग दरेकर, विराज लिंगराज, आयुष धवणे, बिनीत बडगु, जॉन पिली, मेलविन नदवी, शौर्य श्रीराम, सार्थ होतवानी, रणबीर सिंग बॉम्बरा.



## अक्कलकोटमध्ये ४ खेळांच्या ९ गटाच्या राज्य स्पर्धेस प्रारंभ

### डॉजबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू, सॉफ्टफुटबॉलचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० डिसेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर जिल्हा सॉफ्टफुटबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू व डॉजबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने सब जुनियर ज्युनियर व सीनियर अशा डॉजबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू व सॉफ्टफुटबॉल अशा ४ खेळांच्या मुले व मुली आणि पुरुष व महिलांच्या नऊ गटाच्या राज्य स्पर्धेत सुरुवात झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष महेश इंगळे, युवा नेते प्रथमेश इंगळे, सॉफ्टफुटबॉलचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे , टेनिस व्हॉलीबॉलचे जिल्हाध्यक्ष कार्तिक चव्हाण, राज्यसचिव शिवछत्रपती पुरस्कार विजेते एकनाथ साळुंके, राज्य सचिव प्रदीप साखरे, टेनिस व्हॉलीबॉल राज्यसचिव गणेश माळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी उपाध्यक्ष रामेश्वर कोरडे, सहसचिव मकरंद कोराळकर, सहसचिव प्रा. राकेश शिंदे , रवींद्र गुडे विविध जिल्ह्याचे सचिव पंच प्रशिक्षक पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन व नियोजन जिल्हा सचिव व सॉफ्ट फुटबॉल खेळाचे जनक प्रा.संतोष खेंडे ,खजिनदार गंगाराम घोडके, उपाध्यक्ष वसीम शेख, इकबाल दलाल, परमेश्वर व्हसुरे संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रबुद्ध चिंचोलीकर, संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड सागर जगझाप हे करीत आहेत.

## राज्य क्रीडा महोत्सवः सोलापूर विद्यापीठाची कामगिरी

### कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

नांदेड येथे झालेल्या २७व्या क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ॲथलेटिक्समध्ये १३ पदकासह पुरूष विभागाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. यात पुरुषांनी ८ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य तर महिलांनी २ सुवर्ण व २ रौप्य पटकाविले. या कामगिरीबद्दल खेळाडू, क्रीडा महोत्सव स्पर्धा समन्वयक, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकांचा कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ.अतुल लकडे, क्रीडा महोत्सव स्पर्धा समन्वयक प्रा.बाळासाहेब वाघचवरे, प्रशिक्षक प्रा. डॉ. अशोक पाटील, प्रा. डॉ. किरण चोकाककर, संघ व्यवस्थापक धनंजय देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.वाघचवरे यांनी केले. शिवानंद मैलारी यांनी आभार मानले.

## एमएसएलटीए एआयटीए महिलांच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत अंजली मेका, लक्ष्मी अरुणकुमार, रेश्मा छल्लारापू यांची आगेकूच कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एसडीएलटीए) यांच्या वतीने आयोजित व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली महिलांच्या १ लाख बक्षीस रकमेच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस (एकेरी व दुहेरी) स्पर्धेत एकेरीत तेलंगणाच्या अंजली मेका, तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमार, आंध्रप्रदेशच्या रेश्मा छल्लारापू यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत आगेकूच केली.

जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत तेलंगणाच्या बिगर मानांकित अंजली मेकाने तिसऱ्या मानांकित थानिया गोगुलामंदाचा ६-१, ६-४ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. आठव्या मानांकित तामिळनाडूच्या लक्ष्मी अरुणकुमारने तेलंगणाच्या दुसऱ्या मानांकित ओमना दावुनाबोइनाचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव करून उपांत्य फेरी गाठली. सातव्या मानांकित आंध्रप्रदेशच्या रेश्मा छल्लारापूने महाराष्ट्राच्या चौथ्या मानांकित श्रुती नानजकरचे आव्हान ६-४, ६-४ असे संपुष्टात आणले. अव्वल मानांकित तेलंगणाच्या हसिनी दावुनाबोइना हिनेआपली राज्य सहकारी सहाव्या मानांकित कीर्थना रागिनेनीचा ६-३, ६-३ असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली.



अंजली मेका



लक्ष्मी अरुणकुमार

दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या श्रुती नानजकरने तेलंगणाच्या थानिया गोगुलामंदाच्या साथीत तामिळनाडूच्या दिया विवेकनंदन व इंदुशा निमकायला यांचा ६-१, ६-२ असा सहज पराभव केला. तमिळनाडूच्या जेनेफर चाको व लक्ष्मी अरुणकुमार या जोडीने दुसऱ्या मानांकित तेलंगणाच्या हसिनी दावुनाबोइना व ओमना दावुनाबोइना यांचा ६-४, ७-५ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला.

दुहेरीः काव्या देशमुख/भक्ती ताजणे (महाराष्ट्र)वि.वि.प्राची सतीश(महाराष्ट्र)/माही त्रिवेदी(गुजरात)३-६, ६-४, १०-३; अंजली मेका(तेलंगणा)/श्रीनिथी पाटोजू(तेलंगणा) वि.वि.ब्युटी वर्मा(उत्तरप्रदेश)/निकिता सोम (उत्तरप्रदेश)६-१, ६-०

## भंडारी स्पोर्ट्‌सची युनायटेडवर मात

### मास्टर्स क्रिकेट अकादमीची १२ वर्षांखालील क्रिकेट : आध्या पाटील सामनावीर, सम्राट बोबडेचे शतक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत भंडारी स्पोर्ट्स अकादमीने युनायटेड क्लबवर ६८ धावांनी मात केली.



आध्या पाटील



सम्राट बोबडे

पुष्प अकादमी डोणगाव येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी भंडारी स्पोर्ट्स् अकादमीच्या आध्या पाटील याने स्पर्धेतील पहिले द्विशतक व सम्राट बोबडेने शतक झळकाविले. भंडारी स्पोर्ट्स अकादमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ४ बाद ३५८ धावा केल्या. यात त्यांच्या आध्या पाटीलने २०५ शानदार द्विशतक झळकाविले. नरेश भोगेने ५८ धावा केल्या. युनायटेड संघाकडून सुमित धामणगावकर ४३ धावांत २ गडी बाद केले. विजयी ३५९ धावांचे लक्ष्य युनायटेड संघास पेलवले नाही. त्यांच्या ४१ षटकांत ९ बाद २९० धावा झाल्या. युनायटेडकडून सम्राट बोबडेने तडफदार (१२४) शतक ठोकले. केयुरेश पवारने ४८ धावा केल्या. भंडारी स्पोर्टसकडून बागवान २४ धावांत ४ बळी टिपले. आध्या पाटील सामन्यातील सामानावीर ठरला. याला देण्यात आला. पंच म्हणून चंद्रकांत मंजेली, शुभम मुत्तुर गुणलेखक वर्धन दळवी यांनी काम पाहिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# समर्थ नगरमध्ये चोरट्यांचा सुळसुळाट; नागरिकांत भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० डिसेंबर-**

अक्कलकोट शहरा लगत असणाऱ्या समर्थ नगर ग्राम पंचायतच्या हद्दीत चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून मध्यरात्री चोरटे फिरत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. या चोरट्यांचा पोलीस प्रशासनाने बंदोबस्त करावा अशी मागणी समर्थ नगर मधील नागरिकांतून केली जात आहे.

समर्थनगर ग्रामपंचायतच्या हद्दीत दि. ६ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास तीन चार चोरटे फिरत असल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये आढळून आले आहे. सदरील चोरटे हे मध्यरात्री दीड वाजण्याचा सुमारास समर्थ नगर मधील बंगल्यांच्या कंपाउंड मधून उडी मारून घरांमध्ये जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले आहे. या चोरट्यांच्या हातामध्ये कोयता असल्याचे दिसून आले आहे. सध्या कडक थंडीचे दिवस असून नागरिक हे थंडीत घराबाहेर पडत नसल्याचा फायदा चोरटे घेत आहेत. थंडीमुळे नागरिक हे लवकर झोपी जात असून चोरटे हे पाळत ठेवून रात्री फिरत असल्याचे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहे. या प्रकारामुळे समर्थ नगर मधील नागरिकात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलीस प्रशासनाने समर्थ नगर भागात रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी केली जात आहे. समर्थ नगर मधील चोरट्यांना पोलीस प्रशासनाने पकडण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे. समर्थ नगर भागात मागील काही दिवसात दिवसाढवळ्या घरफोड्या झाल्या आहेत .यामध्ये लाखो रुपयांचा ऐवज , रोख रक्कम चोरट्याने चोरून नेले आहेत. अद्याप पर्यंत या चोरट्यांचा शोध पोलीस प्रशासनाकडून लागला नाही.

यामुळे नागरिकात नाराजी व्यक्त केली जात आहे. समर्थ नगर व अक्कलकोट शहरात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी अक्कलकोट शहर व समर्थ नगर मधील नागरिकांतून केली जात आहे.

# रस्त्यातच दम सोडतात परिवहनच्या बस; प्रवाशांतून संताप

## बार्शी-वैराग मार्गावरील सेवा व्हेंटिलेटरवर; नवीन बसेसची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१० डिसेंबर-**

बार्शी-वैराग मार्गावरील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बससेवेची दुरवस्था आता प्रवाशांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे. जुनाट आणि रस्त्यातच 'दम' तोडणाऱ्या बसेसमुळे विद्यार्थी, नोकरदार आणि सामान्य नागरिक तासन्तास रस्त्यावर खोळंबून मनस्ताप सहन करत आहेत. ही समस्या केवळ गैरसोयीची नसून, ती प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठीही धोकादायक ठरत असून, एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



### 'खटारा' गाड्यांमुळे रोजचा प्रवास म्हणजे अग्निदिव्य

बार्शी-वैराग आणि सोलापूरच्या दिशेने धावणाऱ्या अनेक बसेसची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. या बसेस दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असतानाही त्या मार्गावर सोडल्या जातात. परिणामी, बसमध्ये वारंवार बिघाड होणे, रस्त्यातच बंद पडणे, दरवाज्यांचे आणि खिडक्यांचे तुटलेले भाग, तसेच सीटची झालेली दुरवस्था हे नित्याचे चित्र बनले आहे.

**शिक्षणाचे मोठे नुकसान :** सकाळी शाळा-कॉलेजसाठी वेळेत निघालेल्या विद्यार्थ्यांच्या बसेस रस्त्यात बंद पडत असल्याने त्यांचा मौल्यवान वेळ वाया जात आहे.

तासन्तास थांबून राहावे लागत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे आणि वेळेवर न पोहोचल्याने त्यांना अनेकदा गैरहजर राहावे लागत आहे.

**नोकरदारांचा खोळंबा :** कामावर वेळेत पोहोचण्यासाठी निघालेल्या नोकरदार वर्गाला मोठा त्रास होत आहे. बस बंद पडल्याने कामाच्या ठिकाणी उशिरा पोहोचणे, त्यामुळे होणारे आर्थिक नुकसान आणि मानसिक तणाव वाढला आहे.

**आरोग्य सेवा ठप्प :** सोलापूर आणि बार्शी येथे उपचारांसाठी जाणाऱ्या रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रस्त्यात अडकून पडल्याने मोठी अडचण येत आहे. एका बसच्या प्रतीक्षेत अनेकांचे महत्त्वाचे उपचार खोळंबले आहेत.

### दुरुस्तीचा देखावा की दुर्लक्ष?

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक बसेस जुनाट झाल्या आहेत आणि त्यांना मोठ्या दुरुस्तीची तातडीची गरज आहे. तरीही, केवळ मलमपट्टी करून या गाड्या मार्गावर ढकलल्या जात आहेत. बसच्या निकृष्ट अवस्थेमुळे बिघाडांचे प्रमाण कमालीचे वाढले असून, यातून एसटी महामंडळाचे कारभार आणि देखभाल-दुरुस्ती विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे आणि त्यांच्या वेळेकडे महामंडळ गांभीर्याने पाहत नसल्याची भावना नागरिकांमध्ये बळावली आहे.

### प्रवाशांचा इशारा : तातडीने तोडगा काढा, अन्यथा आंदोलन

वर्षानुवर्षे ही समस्या तशीच असल्यामुळे नागरिक आणि विद्यार्थी आता आक्रमक झाले आहेत. त्यांनी एसटी महामंडळाच्या सोलापूर/बार्शी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तातडीने आणि ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

**त्वरित नवीन बसेस :** बार्शी-वैराग आणि सोलापूर मार्गावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि वेळेवर प्रवासासाठी तात्काळ चांगल्या स्थितीतील, शक्य असल्यास नवीन कोऱ्या बसेस उपलब्ध करून द्याव्या.

**दुरुस्तीवर भर :** ताफ्यातील जुन्या आणि वारंवार बिघाड होणाऱ्या बसेस तातडीने सेवेतून काढून त्यांची आवश्यक आणि कसून दुरुस्ती पूर्ण करावी.

**पर्यायी व्यवस्था :** कोणतीही बस रस्त्यात बंद पडल्यास प्रवाशांना तासाभराच्या आत पर्यायी बसची व्यवस्था करून द्यावी, जेणेकरून वेळेचा अपव्यय टळेल.

प्रवाशांचा वाढता संताप आणि होणारे हाल लक्षात घेऊन, जर एसटी महामंडळाच्या प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पाऊल उचलले नाही, तर प्रवाशांकडून मोठे जन-आंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे. सोलापूर/बार्शी विभागाचे अधिकारी या गंभीर समस्येवर कोणती भूमिका घेतात आणि कधी कार्यवाही करतात, याकडे आता वैरागसह संपूर्ण मार्गावरील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# 'स्वेरी'त शनिवारी माजी विद्यार्थी मेळावा आणि पदवीप्रदान समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० डिसेंबर-**

येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा 'माजी विद्यार्थी मेळावा' आणि 'पदवीप्रदान सम ारंभ' स्वेरी कॉलेज कॅम्पस मध्ये येत्या शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती स्वेरी इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचा 'माजी विद्यार्थी मेळावा' व 'पदवीप्रदान समारंभ' आयोजित करण्यात आलेला आहे. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके, सचिव डॉ. करण पाटील आणि स्वेरीचे प्राध्यापक वर्ग हे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करत आहेत. प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी विद्यार्थी मेळाव्याची व पदवीप्रदान समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

# चंद्रभागा नदीची अवस्था दिवसेंदिवस भयावह

## पावित्र्य, स्वच्छता आणि प्रदूषणाबाबत प्रशासन उदासीन

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १० डिसेंबर -**

ऐसी चंद्रभागा, ऐसा भीमातीर असे अभंगातून वर्णन असलेल्या चंद्रभागा नदीची अवस्था दिवसेंदिवस भयावह होत आहे. एकीकडे भाविक येथे आल्यावर याच चंद्रभागा नदीच्या पवित्र स्नानाचा आनंद लुटत असतात, ऐवढेच नाही तर गावाकडे परत जाताना हेच चंद्रभागेचे पवित्र जल तिर्थ म्हणून भाविक हौसेने नेत असतात. तर दुसरीकडे याच चंद्रभागा नदी पात्रात शहरातील ड्रेनेजचे मिसळणारे पाणी, सर्रास होणारे अस्थी विसर्जन, मृतदेहाला याच चंद्रभागेच्या पात्रातील पाण्यात स्नान घालणे, जनावरे धुणे असे सर्रास कार्यक्रम येथे सुरु असतात. दूषित पाण्यामुळे भाविकांना वेगवेगळ्या साथीचे आजार केव्हाही उदभवु शकतात. चंद्रभागा नदीचे प्रदूषण आणि स्वच्छते संदर्भात उच्च न्यायालयाच्या निर्देषांची अंमलबजावणी केवळ आषाढी, कार्तिकीसारख्या मोठ्या यात्रांच्या वेळीच प्रशासनाकडून केली जाते. मात्र इतर वेळचे काय ? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



राज्यातील नव्हे तर देशातील प्रमुख तिर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरची ओळख आहे. या ठिकाणी श्री विठ्ठलाच्या दर्शनाच्या अगोदर चंद्रभागा स्नानाला महत्व आहे. चंद्रभागेचे स्नान झाल्यानंतर प्रत्येक भाविक या नदीचे जल तिर्थ म्हणून प्राशन करतो. गंगे समान असलेल्या चंद्रभागेचे तिर्थ अनेक भाविक आपल्या घरी देखील घेऊन जात असतात. मात्र अशा या चंद्रभागा नदीची अवस्था दिवसेंदिवस प्रशासनाच्या उदासीनतेने बकाल होवू लागल्याचे दिसत आहे. या नदीच्या विविध घाटांवर प्रदूषण व् स्वच्छतेबाबत नुसत्या फलकांवर सूचना लिहून कर्तव्य बजाविण्या पलिकडे प्रशासनाकडून काहीही केले जात नाही. बऱ्याच वेळा शहरातील ड्रेनेजचे पाणी चक्क नदी पात्रात मिसळत असते. शहरातील गवळीं बांधवांकडून नदी पात्रातच आपली जनावरे स्वच्छ केली जातात. नदीच्या वाळवंटातच सर्रास दशक्रिया विधी सुरु असल्याचे दिसते. मयत झालेल्या व्यक्तींचा मृतदेह चक्क नदी पात्रात बुडवून शेवटचे पवित्र स्नान घालण्याची परंपरा पाळल्याचे समाधान देखील शहरातील नागरिकांकडून आजही पार पाडले जात आहे. घरातील देवदेवतांच्या पूजेतून साठलेले निर्माल्य देखील सर्रास नदीपात्रातच टाकले जात आहे.

या बरोबरच महिला वर्गाचे पात्रातील पाण्यात मनसोक्त कपडे धुणे, नदीच्या वाळवंटात अस्ताव्यस्त पसरलेल्या कपड्यांच्या चिंध्या, प्लॉस्टिकचे द्रोण, पत्रावळी, नारळाची केसरे, फुलांचे सुकलेले हार, देवदेवतांच्या दुभंगलेल्या मुर्तीचे ढिगारे पालिका केव्हा स्वच्छ करणार. गाढवा वरुन रात्री,अपरात्री नदी पात्रातील वाळू मुळे पात्राची होणारी चाळण महसूल खाते केव्हा थांबविणार असे चंद्रभागा नदीच्या पावित्र्य, प्रदूषण तसेच स्वच्छते संदर्भातील एक ना अनेक सवाल शहरातील सुज्ञ नागरिक, वारकरी भाविक तसेच महाराज मंडळींकडून उपस्थित केले जात आहेत. दुसरीकडे प्रशासनाकडून मात्र कार्यवाही मात्र शून्य आहे.

# लायन्स क्लबच्या शिबिरात ५१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० डिसेंबर**



नॉर्थ पोलीस स्टेशन, अक्कलकोट येथे लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष लायन अभय खोबरे यांच्या प्रयत्नाने आणि म हात्मा बसवेश्वर ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने एक भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन उतर पोलीस पोलीस निरीक्षक दीपक भिताडे, यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या रक्तदान उपक्रमात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजहितासाठी मोलाचे योगदान दिले. सर्व रक्तदात्यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी ला. पंडीत - सचिव एस पंडीत खजिनदार ला विठ्ठल तेली - झोन चेअरमन मल्तीकार्जुन मसुती माजी प्रांत पाल ला. राजशेखर कापसे ला. शिवपूत्र हळगोदे ला. राजेंद्र हत्ते ला. प्रभाकर मजगे ला. गौरीशंकर चनशट्टी ला. महेबुब सलगरकर ला. साखरे सुधीर. माळशट्टी ला. शरीद वळसंगकर ला. शिवशरण खुबा उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सचिन मुद्दे



**लातूर, दि. १० डिसेंबर-**

वडारवाडा, सावेवाडी येथील रहिवाशी सचिन सुभाष मुद्दे (वय ३७) यांचे बुधवारी दि. १० अकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर गुरूवारी सकाळी १०.३० वाजता मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्याच्या मागे पत्नी, आई, भाऊ, बहीण आणि दोन मुले असा परिवार आहे.


### सदाशिव पाटील



**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांचे वडील तसेच भवानी पेठेतील रहिवासी व धनगर समाजाचे ज्येष्ठ व जेमिनी सांस्कृतीक क्रीडा बहुद्देशीय संस्थेचे ट्रस्टी अध्यक्ष सदाशिव लिंगप्पा पाटील (वय ८२) यांचे मंगळवारी (दि.९) रात्री ११ वाजता अल्प आजाराने निधन झाले. बुधवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर रूपा भवानी चौकातील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, बहीण, २ मुले, १ मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

### रुक्मिणी मुढे



**मंगळवेढा, दि. १० डिसेंबर-**

मुढे गल्ली येथील रुक्मिणी बाबा मुढे यांचे मंगळवार दिनांक ९ डिसेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजणेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षेच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. कातेवाडी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी बाबा मुढे व मंगळवेढा नगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी दिलीप उर्फ आप्पा मुढे तसेच संत दामाजी शुगरचे कर्मचारी अशोक मुढे यांच्या त्या मातोश्री होत.


**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि. अर्ज नं. १२२/२०२५
पुढील नेमलेली दि. १५/०१/२०२६
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**
**(श्रीमती आर. पी. बागडे कोर्ट)**

**दशरथ बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे,** - अर्जदार
वय-५२ वर्षे, धंदा- मजूरी, रा. शिवाजी नगर,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**विरुध्द**
**कोणीही नाही** - सा.याला

ज्याअर्थी, यातील अर्जदार हे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील ठिकाणचे रहिवाशी असून, यातील अर्जदार यांची आई मयत शांता उर्फ शांताबाई बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे, हे दि. १०/०६/२०२३ रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदार यांचे वडिल बाळकृष्ण उर्फ बाबुराव मारुती मार दि ०४/०६/२०१२ रोजी मयत झालेले आहेत मयत शांता उर्फ शांताबाई बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे, व मयत बाळकृष्ण उर्फ बाबुराव मारुती मोरे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार यांची आई शांता उर्फ शांताबाई बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे अर्जदार यांचे वडिल बाळकृष्ण उर्फ बाबुराव मारुती मोरे यांच्या मृत्युनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ व इतर शासकीय सवलतीचा लाभ घेण्यासाठी दि. १५/१०/२०२५ रोजी शासकीय कार्यालयात गेले असता यातील शासकीय अधिकारी यांनी त्यांना मयत शांता उर्फ शांताबाई बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे, व मयत बाळकृष्ण उर्फ बाबुराव मारुती मोरे यांचे मे, कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणण्यासाठी सांगितले असता अर्जदारांचा सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शांता उर्फ शांताबाई बाळकृष्ण उर्फ बाबुराव मोरे व बाळकृष्ण उर्फ बाबुराव मारुती मोरे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १५/१/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणण आले नाही, तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे दि. ९/१२/२०२५

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी
शिक्का
सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**विविध विकास**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रॅलवेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत:- त्याच्या परिसरातील कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात विविध वस्तू शेड आणि चेंजिंग रूमच्या विकासासाठी एफओआयएस नेटवर्कसह दूरसंचार सुविधेची तरतूद/स्थलांतर. निविदा क्रमांक: एसयूआर-एन-टी-२०२५-२६-३० कामाची अंदाजे किंमत: रु.१,२२,४५,६६८.६६ निविदा फॉर्मची किंमत: शून्य, बयाणा रक्कम जमा करायची आहे: रु. २,११,२००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: ८ महिने www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ २९.१२.२०२५ रोजी १५.३० वाजल्यानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा/सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मॉल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि ।।। वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. बयाणा रक्कम (EMD) फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारली जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.inला भेट द्या.

**डीआरएम एस अँड टी शाखा, सेंट्रल रेल्वे, सोलापूर**
Apex-084
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**वस्तू, उत्पादन आणि पुरवठा**

विभागीय भांडार कार्यालय मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रॉलवेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. निविदा क्रमांक : 96255645 वर्णन: 60 किलो (UIC)/601 रॅलसाठी 1 मीटर लांब फिश प्लेटचे वस्तू, उत्पादन आणि पुरवठा जे RDSO ड्रॅग. क्रमांक -5916 (Alt-Nil) ला पुष्टीकरण करते. 1 मीटर लांब फिश प्लेटच्या प्रत्येक संचामध्ये (i) ड्रॅग. क्रमांक - 5916-02 क्र. ला 6 छिद्रे असलेली 1 मीटर लांब फिश प्लेट, (ii) ड्रॅग. क्रमांक -1899-06 ला बोल्ट आणि नट असतात. क्रमांक, (iii) सिंगल कॉइल स्प्रिंग वॉशर ते ड्रॅग. क्रमांक -10773-06 क्रमांक तपशील: IRST-1-2021 (पहिली सुधारणा) नवीनतम बदलांसह जर निविदा बंद होण्याच्या तारखेपर्यंत काही असेल तर. वापरला जाईल (टर्म-नवीनतम-जिथेही निविदा बंद होण्याच्या वास्तविक तारखेपर्यंत बदल/सुधारणा). प्रमाण: 3804 सेट. अर्नेस्ट मनी (INR): रु.3,69,240.00 www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ - 22-12-2025 रोजी 11:30 नंतर. संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in

**- Sr.DMM/SUR**
Apex/82
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय**
**सन २०२५ २०२६**

**जाहीरनिविदा नोटीस**

सोलापूर शहरातील झोन अंतर्गत २ ते ८ मधील येणाऱ्या विविध ठिकाणच्या सार्वजनिक शौचालय येथे इलेक्ट्रिक पंप सेट बसवणे तसेच एकूण ४५ ठिकाणी सार्वजनिक शौचालय या ठिकाणी MSEB नवीन वीज कनेक्शन घेणे कामी म.न.पा संकेतस्थळावर निविदा जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात येत आहे.

म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११३२
म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११३१
म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११३०
म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११२९
म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११२८
म.न.पा संकेतस्थळ अनुक्रमांक - ११२७

www.solapurcorporation.gov.in या मनपाच्या संकेतस्थळावर दि. १०/१२/२०२५ पासून जाहीर निविदा पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ (२) नियम ७ व ७ अे वाचावे)

**बदल अहवाल क्रमांक:- १३८१/२०२५**

ज्याअर्थी, श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट, बाळे जि.सोलापूर न्यास नोंदणी क्रमांक ए-२२ (सोलापूर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त श्री. विनय विजय ढेपे, रा. अंबिका नगर, बाळे ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर यांनी वर नमूद बदल अहवालामध्ये किरकोळ अर्ज क्रमांक १५१८/२०२५ हा अर्ज सादर करुन बदल अर्ज क्रमांक १३८१/२०२५ हा तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) बदलाकरिता सादर केलेला आहे व तो मा.धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर, यांनी दिनांक २१.११.२०२५ रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला आहे. त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा.धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजुन सदर बदल अहवाल क्रमांक १३८१/२०२५ मधील कि.अ.क्र. १५१८/२०२५ मध्ये दिनांक २१.११.२०२५ रोजी तात्पुरत्या स्वरुपात (Provisionally) स्विकारण्यात आलेला बदल अहवाल हा अंतिम आदेश म्हणून कायम राहील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९ माहे डिसेंबर सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का
सही/-
(वि.सि.कांबळे)
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

स्पे.मु. नं. १३५/२०२५
नि.नि. ११

**बार्शी येथील सि.ज.सि. डी. साहेब यांचे न्यायालयात**

**अक्षय आनंद कुलकर्णी** - वादी
**विरुद्ध**
**रागिणी साहेबराव देशमुख** - प्रतिवादी

जाहीर प्रसिध्दीकरण सी.पी.सी.आर्डर ५ रूल २० प्रमाणे- यात वादी तर्फे विनंती अर्ज की,

सदर प्रकरणी यातील वादीने प्रतिवादी विरूध्द रक्कम वसुल होवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात आणलेला आहे. परंतु यातील प्रतिवादीला समन्सची नोटीसची बजावणी केली असता यातील प्रतिवादी हे इथे राहत नाही, असा प्रतिवादीचे आईने सांगितले. तद्नंतर वादीने प्रतिवादीस सि.पी. सी. ऑर्डर ५ रूल १७ प्रमाणे डकवुन समन्सची बजावणी केलीसही सदर प्रतिवादी इथे राहत नाही असा शेरा मारून बेलीफ मार्फत रिपोर्ट दिलेला आहे. यातील प्रतिवादी हे सदर दाव्याच्या नोटीस / समन्स मिळू नये म्हणून वारंवार प्रतिवादीची आई हि जाणून बुजुन खोटी माहिती देत आहे. त्यामुळे वादीला यातील प्रतिवादी यांना नमुद दाव्याच्या नोटीस/समन्स अडचण निर्माण होवून सदरचा दावा पुढे चालविणेस कायद्याने बाधा येत आहे. तरी यातील प्रतिवादी यांना सदर प्रकरणाची नोटीस पोहच होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी तुम्ही सामनेवाले हिने सदर अर्जाच्या कामी सदर जाहीर समन्स / नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाच्या कामी स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे या कामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेल्या तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काहीही म्हणणे नाही असे मे. कोर्टाचे तुमच्या विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागुन तक्रार चालणार नाही. कळावे हे जाहिर समन्स/नोटीस मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिले. दि. १०/१२/२०२५


सही/- क.लिपीक
शिक्का
सही/- सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः - मौजे कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर व परीसरातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील स.नं./गट नं. ६६६ वरील गटाचे संपूर्ण क्षेत्र विद्यमान मालक यांनी भाडेकरार व्यवहार ठरविलेली संपूर्ण मिळकत या नोटीसीचा विषय आहे. येथून पुढे सदर 'मिळकत' असा उल्लेख केलेला आहे. सदर मिळकतीबाबत मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांबरोबर सदर मिळकतीचा भाडेकराराचा व्यवहार ठरविलेला आहे व सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. सबब या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की, सदर मिळकतीशी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, बोजा, खरेदी इत्यादी अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत त्याबद्दल आमचे पत्यावर संपर्क साधून योग्य त्या कागदपत्रानिशी खुलासा करावा. त्या प्रमाणे मुदतीत कोणत्याही कसलीही हरकत न आल्यास तसे असलेले सर्व हक्क हितसंबंध संबंधीतांनी सोडून दिलेले आहेत व मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे विद्धमान अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार कायदेशीररित्या चालणार नाही. याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

ता. ०८/१२/२०२५

अशिलातर्फे अँडव्होकेट
सही/-
**अॅड. पृथ्वीराज उत्तम देसाई**
ऑफिस :- मुक्काम पोस्ट कुसुर ता. कराड
जि. सातारा ४१५१०३
मो. ९७३०१५७०७२



सोलापूर : शहरातील भैय्या चौक ते मरीआई चौकातील रेल्वे पुलाचे पाडकाम सुरू झाल्याने वाहतूक वळवण्यात आली. त्यामुळे शेटे परिसरात बुधवारी वाहतुकीची कोंडी झाली होती. (छायाचित्र : पप्पू जमादार)

# झेडपी शाळेतील मुले होणार 'स्मार्ट'

- झेडपी शाळेत तंत्रस्नेही शिक्षक निर्माण होण्यास गती मिळणार
- जिल्ह्यातील ५ हजार ५६७ शिक्षकांकडून विनोबा ॲपची नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

बदलत्या शिक्षण पद्धतीची अंमलबजावणी शिक्षकांनी वर्गात शिक्षकवताना करावी. गुरुजी ही तंत्रस्नेही बनावेत, या माध्यमातून झेडपी शाळेत शिक्षण घेणारे सर्वसामान्यांची मुले ही 'स्मार्ट' व्हावीत. प्राथमिक शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी. यासाठी



मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शिक्षण अधिकारी कादर शेख यांच्या संकल्पनेनुसार सोलापूर जिल्हा परिषदेने पुण्याच्या ओपन लिंक्स फाउंडेशनच्या मदतीने जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांसाठी आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत 'विनोबा' हे मोबाईल ॲप विकसित केले आहे.

जिल्हा परिषदेच्या २ हजार ७८८ शाळेत ८ हजार ८३४ शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी ५ हजार ५६७ शिक्षक नोंदणी करून या ॲपचा भाग झाले आहेत. उर्वरित शिक्षकांना या ॲपच्या वापरा संदर्भात प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणानंतर त्या शिक्षकांना या ॲपमध्ये सामावून घेण्यात येणार आहे. ॲपमध्ये नोंदणी झालेले शिक्षकांची टक्केवारी ६६ इतकी आहे.

हे ॲप हाताळणीचे प्रशिक्षण प्रत्येक तालुक्यातून पाच शिक्षक, एक केंद्रप्रमुख, एक विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले. प्रशिक्षित शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या माध्यमातून तालुका पातळीवर कार्यशाळा घेऊन ॲप हाताळणी संदर्भात इतर शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. एका क्लिकवर शिक्षकांना एकमेकांशी अध्यापन विषयी ऑनलाइन संवाद साधणे, नवे अध्यापन कौशल्य विकसित करणे, अध्यापन पद्धतीत सुधारणा करणे, विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठीचे साहित्याबाबत चर्चा, अध्यापन व अध्यापन विषयक व्हिडओ अपलोड करणे, राज्यासह परराज्यातील शिक्षकांनाही माहितीचे आदान प्रदान करणे, यातून विद्यार्थ्यांना आनंदही शिक्षण देणे. हा या ॲपचा उद्देश आहे.

**शिक्षकाच्या प्रश्नांची होणार सोडवणूक :** 'विनोबा'च्या माध्यमातून शिक्षकांना अध्यापनातील बदलाबरोबरच जिल्हा परिषद मुख्यालय पातळीवरील प्रश्नही अपलोड करता येणार आहेत. यातून वैद्यकीय बिले, निवृत्ती वेतन यासह इतर प्रश्नही निकाली निघणार आहेत. शिक्षकाच्या प्रश्नावर प्राथमिक शिक्षण प्रशासनाने कोणती कार्यवाही केली. सर्व बाबी मुख्य कार्यकारी अधिकारीसह शिक्षणाधिकारी यांना एका क्लिकवर कळणार. शिक्षकाच्या प्रश्न आता ऑनलाइन पद्धतीने सीईओ व शिक्षणाधिकारी यांचा कटाक्ष असणारा असल्याने शिक्षकांचे प्रश्नही सुटण्यास मदत होणार आहे.

**विनोबा ॲप शिक्षकांसाठी लाभदायक :** विनोबा ॲपच्या माध्यमातून तंत्रस्नेही शिक्षक निमाण होण्यास मदत होणार आहे. तसेच सर्वसामान्यांच्या मुलांनाही तंत्रज्ञानाच्या नवीन गोष्टी शिकण्यास मिळणार आहेत. त्यामुळे झेडपी शाळेतील मुले स्मार्ट होणार आहेत. शिक्षकांचे प्रश्नही सोडविण्यात येणार आहेत.

**- वागेश शास्त्री, मुख्याध्यापपक, उध्दवराज प्राथमिक शाळा**

# अंगणवाडी ताईंच्या शिफारसीवरून लाडक्या बहिणींना ई-केवायसीमधून सूट

**३१ डिसेंबरपर्यंत अंतिम मुदत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या अनेक लाभार्थी महिलांचे पती किंवा वडिलांचे निधन झाले आहे. पतीपासून घटस्फोट झाला आहे. अशा लाभार्थ्यांना ई केवायसी करतांना आधार कार्ड ओटीपी प्राप्त होण्यास मोठी अडचण निर्माण झाली होती. म्हणून अशा लाभार्थ्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी मधून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे वडील - पती ह्यात नसणाऱ्या लाडक्या बहिणींना ई-केवायसी मधून मार्ग काढण्यात आल्याने दिलासा मिळाला आहे. मात्र उर्वरीत लाभार्थ्यांनी ३१ डिसेंबरपर्यात ई केवायसी करून घेणे बंधनकारक आहे.

अशा लाभार्थ्यांच्या वडील पती यांच्या मृत्यू दाखल्याची, घटस्फोटीत लाभार्थ्यांच्या न्यायालयीन कागदपत्राची अंगणवाडी सेविकेकडून पडताळणी



करण्यात येणार आहे. या पडताळणीनंतर अंगणवाडी सेविकांकडून सदर लाभार्थ्यांबाबत शिफारस पत्र महिला व बालविकास आयुक्तालय यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात सीडीपीओ यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर अंगणवाडी सेविकेकडून प्राप्त झालेले शिफारस पत्र सीडीपीओ मार्फत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर महिला व बालविकास अधिकारी यांच्या मार्फत स्वयं स्पष्ट शिफारशीसह सदर शिफारस पत्रे महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांच्याकडे सोपविले जाणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ई-केवायसी करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ज्या लाभार्थी महिलांचे वडील, पती हयात नाहीत. आशा लाभार्थ्यांना मृत्यू दाखल्याची पडताळणी करून अंगणवाडी सेविका मार्फत जिल्हा पातळीवर शिफारस पत्र सादर करण्याची मुदत ही ३१ डिसेंबर पर्यंत देण्यात आली आहे.

**अंगणवाडी ताईंचे शिफारस बंधनकारक**

ज्या लाडक्या बहीणींचे वडील, पती निधन पावले आहेत, घटस्फोटीत आहेत.अशा लाभार्थ्यांनी वडील, पतीच्या मृत्यू दाखल्याच्या प्रतीसह तर घटस्फोटीत महिलांनी न्यायालयीन कागदपत्रासह अंगणवाडी सेविकांकडे कागदपत्राची छायांकित प्रत सादर करावे लागणार आहे. अशा लाभार्थ्यांना ई केवायसीमधून सूट मिळण्यासाठी अंगणवाडी ताईचे शिफारस पत्र बंधनकारक आहे.

**ई-केवायसी करून घ्यावे**

घटस्फोटीत महिला, वडील किंवा पतीचे निधन झालेल्या महिलांना ई केवायसी मधून सूट देण्यात आली आहे. त्यांच्या कागदपत्राची पडताळणी करून शिफारस पत्र सीडीपीओ मार्फत महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे ३१ डिसेंबर पर्यंत सादर करण्याच्या सूचना अंगणवाडी सेविकांना सीडीपीओ मार्फत देण्यात आले आहेत.

**- प्रसाद मिरकले,**
कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग

**लाडक्या बहिणींची सुटका**

घटस्फोटीत महिला तसेच वडील किंवा पतीचे निधन झालेल्या लाडक्या बहिणींना शासनाकडून ई केवायसी मधून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे ओटीपीचा त्रास असणाऱ्या महिलांना दिलासा मिळाले असून त्यांची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. अंगणवाडी सेविकांनी लाडक्या बहिणींना शिफारस पत्र देऊन सहकार्य करावे.

**- सोनाली कडते,**
माजी सभापती, पंचायत समिती दक्षिण सोलापूर



## जुळे सोलापुरात सत्संग महोत्सव शनिवारपासून

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथील ओंकार आश्रम, श्री सिद्धारूढ मठ येथे १३ ते १७ डिसेंबर दरम्यान सत्संग महोत्सव होईल. याप्रसंगी बिदर येथील प.पू. डॉ. शिवकुमार म हास्वामी, डॉ. शिवानंद भारती स्वामी हे उपस्थित राहणार आहे. दररोज सायंकाळी ६ ते ८.३० पर्यंत विविध विषयांवर प्रवचन होणार आहे. या कार्यक्रमास प. पू. मातोश्री लक्ष्मीदेवी (कलबुर्गी), जडीसिद्ध स्वामी (सोलापूर), सुशांतादेवी (सोलापूर), शंकरानंद स्वामी (आलूर), पूर्णानंद स्वामी (बिदर), स्वामी शिवप्रकाश नंदगिरी (बिदर), शिवपुत्र स्वामी (सोलापूर), विनायकस्वामी (बिदर) उपस्थित राहणार आहेत. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सिद्धारुढ म ठातील संयोजकांनी केले आहे.

## महत्वाचे...

### दादा लाड यांचा डॉक्टर ऑफ सायन्स पदवीने आज सन्मान

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**



दादा लाड यांचा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीकडून डॉक्टर ऑफ सायन्स (मानद) पदवीने आज सन्मान होणार आहे. दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता २७ वा पदवीदान सोहळा परभणी येथील दीक्षांत सभागृह वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात हा सोहळा पार पडणार आहे. दादा लाड कापूस तंत्रज्ञानाचे जनक, शेतकरी-केंद्रीत कृषी नवप्रवर्तनाचे प्रेरक, स्वदेशी पशुधन संवर्धनाचे आदर्श मार्गदर्शक, ग्रामीण विकास, शाश्वत शेती आणि सामाजिक कार्यातील या अपूर्व योगदानासाठी त्यांचा सन्मान होणार आहे.



### सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात सोलापूर जिल्हा विभागात अव्वल

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

**राज्यपालांकडून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा सत्कार**

सैनिकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या निधी संकलनात सोलापूर जिल्ह्याने राज्यात सर्वोच्च कामगिरी केली आहे. राज्य शासनाच्या दि. १० डिसेंबर २०२४ च्या निर्णयानुसार सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४ साठी सोलापूर जिल्ह्यासाठी रूपये १ कोटी ७२ लाख इतका इष्टांक निश्चित करण्यात आला होता. मात्र जिल्ह्याने रूपये २ कोटी १७ लाख १५ हजार ४७० इतकी रक्कम संकलित करून १२६.२५ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली व पुणे महसूल विभागात अव्वल स्थान प्राप्त केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज राजभवन, मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, ध्वजदिन निधी कल्याण समिती कुमार आशीर्वाद आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (निवृत्त) यांचा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. ही बाब सोलापूर जिल्ह्यासाठी अत्यंत गौरवाची व अभिमानास्पद असून, सैनिक कल्याणासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांचे हे राज्यस्तरीय मान्यतेचे प्रतीक ठरत आहे.

### फॉर्च्यून ५०० इंडियाच्या यादीत पु. ना. गाडगीळला बहुमान

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

भारताच्या रिटेल क्षेत्रातील एक प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक ब्रँड म्हणून नावाजलेल्या पु. ना. गाडगीळ आणि सन्सने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता, विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रगती सिद्ध केली आहे. देशातील सर्वात मानाच्या यादींपैकी एक असलेल्या फॉर्च्यून ५०० खपवळर यादीत तिसऱ्यांदा स्थान मिळवण्याचा बहुमान कंपनीने प्राप्त केला आहे. २०२१, २०२४ आणि आता २०२५- या तिन्ही वर्षांत सलग मिळालेल्या मानांकनांनी पु. ना. गाडगीळ आणि सन्सची आर्थिक बळकटी, व्यवस्थापनाची दूरदृष्टी आणि ग्राहकांचा अबाधित विश्वास यांची पुष्टी केली आहे. २०२५ मधील ठरपज्ञ २८९ हा क्रमांक केवळ एक आकडा नाही तर हा ग्राहकांनी दाखवलेल्या प्रेमाचा, आमच्या टीमने दिलेल्या अथक सेवेचा आणि ब्रँडच्या १९३ वर्षांच्या सुवर्णवारशाचा गौरव आहे. सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या क्षेत्रात पु. ना. गाडगीळ आणि सन्स ने सातत्याने नवनवीन संकल्पना, प्रामाणिकता आणि अद्वितीय ग्राहक अनुभव यांच्या आधारे देशभरात स्वतःची एक विशिष्ट ओळख निर्माण केली आहे. पु.ना.गाडगीळ आणि सन्सचे मुख्य प्रवर्तक अजित गाडगीळ यांनी आम्ही हा ऐतिहासिक यशाचा क्षण आमच्या सर्व ग्राहक, कर्मचारी, पुरवठादार, भागीदार आणि समर्थक यांना समर्पित करतो. तुमच्या विश्वासामुळेच आज पु. ना. गाडगीळ आणि सन्स भारतातील सर्वात प्रभावी आणि प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये गणली जाते. ही कामगिरी आमची नाही. ती आपल्या सर्वांची आहे, अशा भावना व्यक्त केल्या.




# जिल्ह्यात ४ वाळू घाटांचा लिलाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

बऱ्याच वर्षापासून अनेक कारणांनी सातत्याने रखडत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील वाळू लिलावाला आता मुहुर्त सापडला असून, जिल्ह्यातील विविध तालुक्यातील जवळपास ४ वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

जालन्यातील मंगेश इंटरप्रायझेस कंपनीने जवळपास साडेचार कोटी रुपयांना हा लिलाव घेतला असून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष वाळू उपशाला सुरुवात होणार आहे. त्यानंतर गरीबांच्या घरकुलासह इतरांना ही वाळू स्वतात उपलब्ध होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील वाळू



**घरकुलांना मिळणार आता वाळू**

लिलाव प्रक्रिया अनेक कारणापासून सातत्याने रखडत होती. अनेक वर्षापासून जिल्ह्यातील वाळू लिलावच झाले नाहीत. तर दुसरीकडे अवैधरित्या वाळू वाहतुक सुरु होती. त्यामुळे शासनाचा महसुल बुडत होता. यावर जिल्हा प्रशासनाने अनेकवेळा कारवाया ही केल्या होत्या. तसेच कोट्यवधीचा दंड ही वसुल केला होता. मात्र अवैध वाळू उपसा सुरुच होता. त्यावर आता प्रशासनाने रितसर वाळू लिलाव प्रक्रिया पूर्ण केली असून, अक्कलकोट तालुक्यतील खानापूर, देवीकवटा आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे आणि लवंगी या ठिकाणच्या वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यामध्ये जवळपास विविध भागातील पाच ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये सर्वाधिक बोली लावून मंगेश इंटरप्रायझेस या कंपनीने जवळपास साडे चार कोटी रुपयांना हे चार ही वाळू घाट घेतले आहेत. यामध्ये काही कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात वाळू उपसा सुरु होणार असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

## डॉ. कोटणीस यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये थोर मानवतावादी डॉ. कै. द्वारकानाथ कोटणीस यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंढे, सुरेश कासार, तरंगिणी कोंडा, महेश वालावकर, सारंग अंजीखाने, अविनाश शिंदे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, ताहीर बिराजदार, भालचंद्र साखरे उपस्थित होते.

# जलजीवन मिशन योजनेचे ५६६ कामे ठप्प

**बिले प्रलंबित असल्याने कामबंद ठेवण्याचा ठेकेदारांचा निर्धार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत एक हजार नऊ कामे मंजूर आहेत. त्यातील ४४३ कामे पूर्ण झाली आहेत. तर उर्वरित ५६६ कामे निधीअभावी ठप्प आहेत. ती कामे सुरु करावे, असे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकरी कुलदीप जंगम यांनी ठेकेदारांना दिले.

मात्र, शंभर टक्के बिले दिल्याशिवाय जलजीवनची कामे सुरु न करण्याचा इशारा ठेकेदारांनी दिला आहे. त्यामुळे जलजीवनची ५६६ कामे सध्या ठप्प आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जलजीवन मिशनच्या ठेकेदारांची बुधवारी १० डिसेंबर रोजी बैठक घेऊन जलजीवनची बंद कामे सुरु करावीत, असे सूचना केल्या. मात्र, त्यावेळी ठेकेदारांनी कामांची बिले पूर्ण दिल्याशिवाय काम सुरु करणार नसल्याचे सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंद तोडकरी, उपाध्यक्ष हेमंत जाधव, सचिव विवेक राठोड, खजिनदार श्रीकांत सोनी आदी ठेकेदार उपस्थित होते. जलजीवन मिशन योजनच्या कामासाठी दिवाळीत २० कोटी १३ लाखांचा निधी प्राप्त झाला होता. त्या निधीतून प्रत्येक ठेकेदारांना २५ टक्क्याप्रमाणे निधीचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व ठेकेदारांनी बंद असलेली कामे तात्काळ सुरु करावे. शासनाकडे आणखी ६५ कोटी रुपयांची मागणी केली आहे. निधी आल्यानंतर तातडीने खात्यावर निधी जमा करण्यात येणार असल्याचे सीईओ जंगम यांनी ठेकेदारांना सांगितले. मात्र, बिले दिल्याशिवाय काम सुरु करणार नसल्याचे जलजीवन मिशनच्या ठेकेदारांनी सांगितले. त्यामुळे जलजीवनची कामे ठप्पच राहणार असल्याचे दिसत आहे.

# ५४ मीटर रस्ता उद्या सकाळी ६ वाजता वाहतुकीसाठी होणार खुला

- पर्यायी रस्त्यांचे काम अंतिम टप्प्यात : महापालिकेची युद्ध पातळीवर कार्यवाही
- नागरिकांच्या सुकर वाहतुकीसाठी महापालिका प्रयत्नशील : डॉ.ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते दमानी नगर रोडवरील रेल्वे ब्रिज पाडकाम सुरू करण्यात येत असल्याने नागरिकांच्या वाहतुकीची अडचण लक्षात घेऊन महानगरपालिकेतर्फे मार्ग असलेल्या ५४ मीटर रस्त्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. नागरिकांसाठी हा रस्ता येत्या शुक्रवारी सकाळी ६ वाजल्यापासून वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज ५४ मीटर



रस्त्याला भेट देऊन चालू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी संबंधित मक्तेदार व विभागीय अधिकाऱ्यांना निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

यावेळी नगर अभियंता सारिका अकुलवार, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवाणजी तसेच संबंधित मक्तेदार व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याचबरोबर रेल्वे गोदाम नागोबा मंदिर मार्गावरील रस्त्याचे काम देखील वेगात सुरू असून, लवकरच हा मार्गही नागरिकांसाठी खुला केला जाणार आहे. नागरिकांचे सहकार्य मिळाल्यास अधिक सुरळीत आणि वेगाने पूर्ण होतील. शहराच्या प्रगतीसाठी प्रशासन आणि नागरिक यांचे एकत्रित सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. प्रशासन नागरिकांच्या सुरक्षित आणि सुकर वाहतुकीसाठी सातत्याने प्रयत्नशील असून पर्यायी मार्ग वेळेत सुरू करण्यासाठी सर्व विभाग युद्धपातळीवर काम करत आहेत. या काळात नागरिकांनी सहकार्य करावे व वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**कामात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नाही : आयुक्त**

आयुक्तांनी रस्त्याची गुणवत्ता, सुरक्षा उपाययोजना, लेव्हलिंग, साईड डेव्हलपमेंट इत्यादींची तपशीलवार पाहणी केली. तसेच कामात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट आदेश आयुक्तांनी मक्तेदारांना दिले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा आज शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
दर वर्षीप्रमाणे ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ कार्यक्रम ११ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट संकलनाबाबत मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असून वीरपत्नी, वीरमाता,वीरपिता यांचा सत्कार, तसेच माजी सैनिकांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप केले जाणार आहे. त्याचबरोबर विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे.




माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### भोसले हायस्कूलमध्ये नवनीत चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूल येथे राष्ट्रीय स्तरावरील नवनीत चित्रकला स्पर्धा २०२५ (मास्टर स्ट्रोक) या चित्रकला स्पर्धेमध्ये इ.५ वी व ६ वीच्या एकूण १०६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवा होता त्यापैकी पहिली फेरी जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक स्वरा संतोष डोलारे ६ वी क, द्वितीय माहेश्वरी नवनाथ सराव ६ वी ड, प्रेमदेव बालाजी खोगरे ६ वी क तसेच मार्गदर्शक कलाध्यापक शेषनाथ वाघ यांना मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या प्रसंगी उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, बी.बी. गुंड, सुनिल कोरडे, राजेंद्र जाधव, बालाजी गोरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक कुणाल लोंढे, हणमंत ठेले, सुनिल मोहिते यांनी परिश्रम घेतले. बक्षीस प्राप्त विद्यार्थाचे संस्थाध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमा पाटील, मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, कलाविभाग प्रमुख कलाध्यापक शिवाजी भोसले, धनंजय देशमुख शिक्षक-शिक्षिका यांनी अभिनंदन केले.



### मंगरूळचे सुपुत्र महेश गुरव यांना रसायनशास्त्रातील डॉक्टरेट पदवी

**तुळजापूर, दि.१० डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ गावचे सुपुत्र महेश गुरव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत रसायनशास्त्रातील नॅनो टेक्नॉलॉजी सायन्स या विषयात प्रबंध सादर करून डॉक्टरेट (Ph.D.) पदवी संपादन केली आहे. डॉ. महेश गुरव यांनी आपले संशोधनकार्य प्रोफेसर डॉ. अप्पासाहेब वामनराव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम येथे पूर्ण केले. संशोधनाच्या कालावधीत त्यांनी चार आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये संशोधन लेख प्रकाशित करून उल्लेखनीय कामगिरी साधली. डॉ. गुरव यांना मार्गदर्शक डॉ. सूर्यवंशी, डॉ. टिगोटे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य सपाटे तसेच सर्व कर्मचारीवृंद यांनीही कौतुक व्यक्त केले आहे.

### संदीप चौगुले यांची तालुकाध्यक्षपदी निवड

**उमरगा, दि.१० डिसेंबर -**
उमरगा येथे वीरशैव काकय्या ढोर समाजाची बैठक शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या बैठकीत सर्वानुमते संदीप चौगुले यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीत समाजातील विविध प्रश्न, समस्यांचे निराकरण, संघटन विस्तार आणि संघटनात्मक बांधणी याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी नव्या कार्यकारिणीचीही एकमताने घोषणा करण्यात आली. बैठकीस जितेंद्र चौगुले, अंबादास सोनकवडे, प्रताप कटके, प्रभाकर चौगुले, राजेंद्र चौगुले, अमोल व्हटकर, बयाजी साबणे आदी मान्यवर उपस्थित होते.





### धिरज जाधव यांची युवक तालुका उपाध्यक्षपदी निवड

**तुळजापूर, दि.१० डिसेंबर -**
तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील धिरज धनंजय जाधव यांची युवक कॉंग्रेसच्या तुळजापूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे नियुक्ती पत्र कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यापसंगी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील युवक तालुकाध्यक्ष क्षितीज नरवडे, रणजित इंगळे, आनंद जगताप, ॲड. मोहसीन पठाण, डॉ. विश्वजित शित्रे, संदीपान निकम, बब्रुवान मोरे, किरण मोरे, विजय शित्रे, महादेव मोरे, वैभव पाटील, नवनाथ क्षीरसागर, सुरज जाधव, जावेद शेख, बाळासाहेब सोमासे, वसंत सगट, किरण कांबळे, जयवंत कांबळे, सुरज जाधव, धनंजय जाधव, श्रीमंत जाधव, अण्णासाहेब मोरे, दादा मोरे, रवी पुरी, बालविर गुरव, अजिंक्य सोमासे, शशीकांत मोरे आदी उपस्थित होते.

### जनावरांच्या हत्याप्रकरणी गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
परंडा तालुक्यातील गौस अलिशेर कुरेशी (रा. कुरेशी गल्ली, परंडा) यांच्यावर गोवंशीय जनावरांचा बळी आणि त्याचे कातडे सोलण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी गोवंशीय जनावरांचे कातडे सोलत असताना एकूण २,३१,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल परंडा पोलीसांना मिळून आला.

# ग्रामराजकारणात भाजपचा दबदबा वाढला; कॉंग्रेस-राष्ट्रवादी समोर कठीण आव्हान

**तभा वृत्तसेवा/ विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१० डिसेंबर -**
नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तुळजापूर तालुक्यातील नऊही जिल्हा परिषद गटांमध्ये आ. राणाजगजितसिंह पाटील यांना मिळालेल्या अभूतपूर्व मताधिक्यामुळे, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये महायुतीला मोठे यश मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तुळजापूर तालुक्यात एकूण ९ जिल्हा परिषद गट व १८ पंचायत समिती गण असून, या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये कॉंग्रेसने ५ जिल्हा परिषद गट व १० पंचायत समिती गणांवर विजय मिळवला होता. राष्ट्रवादी कॉंग्रेसने ४ जिल्हा परिषद गट व ७ पंचायत समिती गणांवर बाजी मारली होती. तर भाजप फक्त एका पंचायत समिती



गणापुरता मर्यादित राहिला होता.

मात्र सध्याच्या राजकीय घडामोडींनुसार भाजप तालुक्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून उदयास येत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे विधानसभा निवडणुकीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ, मंगरूळ, काक्रंबा, काटी, काटगाव, अणदूर, शहापुर, नंदगाव व जळकोट या नऊही जि.प. गटांतून मोठे मताधिक्य मिळवले आहे. यामध्ये नंदगाव गटातून तब्बल ४,१३० मतांचे तर मंगरूळ गटातून किमान ११८ मतांचे आघाडी मिळाली.

आमदार राणा पाटील यांनी गेल्या वर्षभरात या सर्व गटांत केलेल्या विकासकामांचा फायदा महायुतीला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसारखेच वातावरण जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही दिसण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, महाविकास आघाडीसाठी मात्र ही निवडणूक कठीण ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नळदुर्ग येथील अशोक जगदाळे यांनी नुकताच कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून तालुक्यात कॉंग्रेसला बळ दिले असले तरी, या परिनामाचा किती फायदा होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. यापूर्वी तालुक्यात महाविकास आघाडीचे नेतृत्व कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील यांनी प्रभावीपणे सांभाळले होते.

आगामी निवडणुकांमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होणार की भाजप व कॉंग्रेस स्वतंत्रपणे रिंगणात उतरणार, याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सर्वच पक्षांकडून निवडणुकांच्या तयारीला वेग आला असून, विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील पुनर्वसन सावरगाव येथे राहणाऱ्या श्रद्धा मारुती माने (रा. देवधानोरा, ता. कळंब) या विवाहित महिलेने २९ नोव्हेंबर २०२५ रोजी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राष्ट्रमाता जिजाऊ पतसंस्था, कळंब येथील बाथरूममध्ये श्रद्धा यांनी गळफास घेऊन जीवन संपविले.


या प्रकरणी पती मारुती उत्रेश्वर माने, सासरे उत्रेश्वर माने आणि सासू भगीरथी उत्रेश्वर माने (सर्व रा. देवधानोरा, ह.मु. पुनर्वसन सावरगाव) यांच्याविरुद्ध चारित्र्यावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या छळाला कंटाळून श्रद्धा यांनी आत्महत्या केली असल्याचा आरोप फिर्यादी बळीराम श्रीपाती गोरे (वय ५४ वर्षे, रा. धनेगाव ता. केज, जि. बीड) यांनी कळंब पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत केला आहे.

फिर्यादीच्या निवेदनावरून कळंब पोलिसांनी दि.९ डिसेंबर रोजी भा.दं.वि. कलम १०८ तसेच कलम ३(५) अन्वये तिघा आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## तुळजापूर बसस्थानकातून सोन्याचे लाकेट लंपास

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील निखील गौतम हावळे (वय २९, रा. प्लॉट नं १० अ, बिलाल नगर, सोलापूर) यांच्यावर चोरीची घटना घडली आहे. दि.४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वा. तुळजापूर बसस्थानकात बसमध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लाकेट अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेऊन चोरी केले. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्धगुन्हा नोंदवला आहे.



## जूनियर वकिलांना स्टायपेंड द्या खाजगी विधेयक लोकसभेत मांडले : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
देशाच्या न्यायव्यवस्थेची खरी ताकद म्हणजे न्यायासाठी झगडणाऱ्या तरुण वकिलांची पिढी. परंतु वास्तविकता अशी आहे की, न्यायालयात कारकीर्द सुरू करणाऱ्या अनेक ज्युनियर वकिलांना सुरुवातीच्या काही वर्षांत कोणताही आर्थिक आधार मिळत नाही. त्यामुळे अनेकजण आर्थिक अडचणींमुळे हा व्यवसाय सोडतात आणि सक्षम न्यायव्यवस्थेचे स्वप्न अधुरं राहते.

याच परिस्थितीला बदलण्यासाठी अधिवक्ता अधिनियम १९६१ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी खाजगी विधेयक संसदेत मांडण्यात आले आहे. हे फक्त एक विधेयक नाही, तर देशभरातील संघर्ष करणाऱ्या नवख्या वकिलांचा आवाज मानला जातो.

ज्युनियर वकिलांना मासिक स्टायपेंड मिळावा., यासाठी स्वतंत्र निधी तयार करावा., ग्रामीण, महिला आणि वंचित घटकातील वकिलांना प्राधान्य द्यावे., हा निर्णय का महत्त्वाचा आहे?, न्यायव्यवस्थेत नवीन पिढी सक्षम आणि आत्मनिर्भर बनेल. कायदा शिकणाऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल.सक्षम, प्रशिक्षित आणि न्यायसंवेदनशील वकील देशाला मिळतील.

या विधेयकामुळे न्यायव्यवस्थेत एक सकारात्मक बदल होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे नव्या वकिलांना आर्थिक आधार मिळेल आणि ते त्यांच्या कारकीर्दीत पूर्ण मनोभावाने काम करू शकतील.

## लोहारा खुर्दमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित सभामंडपाचे काम अखेर पूर्ण

### आ. प्रवीण स्वामी यांच्या हस्तक्षेपाने कामाला वेग

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१० डिसेंबर -**
लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द गावातील श्री राम मंदिरासमोरील आमदार निधी २०२२-२३ मधून मंजूर झालेले परंतु दीर्घकाळापासून अर्धवट राहिलेले सभामंडपाचे काम अखेर पूर्णत्वास गेले आहे. अनेक वर्षांपासून काम रखडल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांनी वेळोवेळी लेखी तसेच मौखिक तक्रारी करूनही काम पूर्ण होत नव्हते.

या गंभीर समस्येबाबत सरपंच शेखर रावसाहेब पाटील (लोहारा खु.) यांनी सविस्तर माहिती आ. प्रवीण स्वामी यांना दिली. तक्रार मिळताच आ. स्वामी यांनी बांधकाम विभागाचे उपअभियंता घोडके (लोहारा) व शाखा अभियंता यांना अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

आ. स्वामी यांनी दिलेल्या सूचनांनंतर बांधकाम विभागाने तत्काळ कारवाई करत संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावली आणि काम पूर्ण करण्यास भाग पाडले. परिणामी, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले सभामंडपाचे काम आता पूर्ण झाले असून ग्रामस्थांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. गावातील सर्व ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच शेखर पाटील यांनी आ. प्रवीण स्वामी, उपअभियंता घोडके, शाखा



अभियंता, तसेच विभागीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

नव्याने पूर्ण झालेला सभामंडप आता ग्रामविकासाला चालना देणार असून सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी महत्वाचे केंद्र ठरणार आहे.

## भूम तालुक्यात गाळाने भरलेल्या विहिरींचे पंचनामे करा

### सरपंच परिषदेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
भूम तालुक्यात पुरामूळे गाळ भरलेल्या विहिरींचे पंचनामे त्वरित करावेत, अन्यथा सरपंच परिषद व शेतकरी यांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा सरपंच परिषदेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सरपंच परिषद व शेतकरी यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सप्टेंबर व ऑक्टोबर महिण्यात झालेल्या अतिवृष्टीमूळे नदीला महापूर येऊन गेला. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. नदीकाठच्या व ओढयाकाटच्या विहिरीत पुरामुळे गाळ जावून विहिरीचे व विद्युत पंपाचे प्रचंड नुकसान झालेले आहे. शासनाने तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय व कृषी कार्यालय यांना पंचनामे करण्याचे आदेशीत केलेले असताना विहिरींचे पंचनामे तलाठी, ग्रामसेवक, तांत्रिक अधिकारी व कृषि सहाय्यक



यांना आदेशीत केलेले असताना त्यांनी पंचनामे केलेले नाहीत.

तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय व कृषि कार्यालयाचा भोंगळ कारभार असल्याचे दिसून येते. ऐनवेळी शेतकऱ्यांना सदरील कार्यालयाने प्रस्ताव सादर करावयाचे सांगीतले. जे काम तहसील, पंचायत समिती, कृषि कार्यालय यांचे आहे, ते काम शेतकऱ्यांना करावयास सांगतात. त्यामुळे शेतकरी दिशाहिन झालेले आहेत. संबंधीत कार्यालयास आदेशीत करुन गाळ गेलेल्या विहिरींचे पंचनामे करावयास आवगत करावे. अन्यथा सरपंच परिषद व शेतकऱ्यांसाठी आपल्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना सरपंच परिषद प्रदेश संघटक कोहिनूर सय्यद, सरपंच प्रशांत जाधवराजे ग्राम पंचायत सदस्य गजानन चव्हाण, बाळासाहेब पवार, दत्तात्रय घोगरे, लक्ष्मण मोरे, तानाजी पाटील, अतुल शेळके, योगेश ढगे, बाळासाहेब कोकाटे आदी उपस्थित होते.

## वाशी तालुक्यात घरफोडी; सोन्याचे दागिणे लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**
वाशी तालुक्यातील सविता खंडू ढोपे (वय ५०, रा. ईट, ता. भुम, जि. धाराशिव) यांच्या राहत्या घरात चोरीची घटना घडली आहे.

फिर्यादीच्या मते, दि.२९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता ते ८ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत, अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील ७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि चांदीचे दागिने असा एकूण ५ लाख रुपये किंमतीचा माल चोरी करून नेला. पीडितेच्या प्रथम खबऱ्यानुसार, वाशी पोलीस ठाण्यात आरोपी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस सध्या आरोपींचा शोध घेत आहेत.

# कळंब ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था; दुरुस्तीअभावी नागरिक त्रस्त

### प्रशासनाचा उदासीन कारभार...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१० डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. नूतनीकरणाचे काम करण्यासाठी अनेक गुत्तेदार पुढे सरसावतात; मात्र रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती मात्र कोणीच करीत नसल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे. मनुष्यबळ योजना (मोहा फाटा) ते गोजवडा हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत येतो. हे काम पूर्ण होऊन दोन ते तीन वर्षे उलटली असतानाही सध्या या रस्त्याची अवस्था खड्डेमय झाली असून, प्रवास करताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच कळंब शहरात ये-जा करणाऱ्यांना या रस्त्यावरील खड्डे, तुटलेली गिट्टी, रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडे-झुडपे यांचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

बससेवा असली तरी खराब रस्त्यांमुळे वाहन चालवताना अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि गुत्तेदार यांच्या दुर्लक्षामुळे अनेकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

कळंब तालुक्यातील शेकडो गावे जोडणारे रस्ते पूर्णपणे उध्वस्त झाले आहेत. काही ठिकाणी दोन्ही बाजूंची झुडपे एवढी वाढली आहेत की पायदळ चालणेही अवघड झाले



आहे. तालुक्यात अपघातांची संख्या वाढल्याने 'याला जबाबदार कोण?' असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात अधिकारीच नसतात, तक्रार करायची कोणाकडे? असे नागरिक संतप्तपणे विचारत आहेत. संबंधित कार्यालयात गेल्यावर बैठक आहे, दौरा आहे. अशा कारणांनी अधिकारी अनुपस्थित असल्याने तक्रारीच ऐकल्या जात नाहीत, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

करणवाडी-पेंढरी, आठ किमी रस्ता, नवरगाव-अर्जुनी (३ किमी), कुंभा-मार्डी (१० किमी), गौराळा-नेत, वरुड-चिंचाळा, आकापूर, कोलगाव, वेगाव, मार्डी, हिवरा, मुक्टा, करणवाडी-कुंभा आदी अनेक गावांना जोडणारे मार्ग पूर्णपणे खचले आहेत.

अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी तर गिट्टीसुद्धा उखडून गेली आहे. नागरिकांनी निवेदने दिली तरीही त्यावर कोणतीच कारवाई न झाल्याने लोक त्रस्त झाले आहेत.

नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने या रस्त्यांची पाहणी करून दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी केली आहे.

अन्यथा येत्या काळात आंदोलनाचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

### जलजीवन मिशनमुळे रस्त्यांची चाळण...

हर घर नल, हर घर जल या उद्दिष्टाने जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यातील १०४ ठिकाणी पाणीपुरवठा योजनांचे काम सुरू आहे. काही कामे पूर्ण झाली, तर अनेक ठिकाणी अजूनही कामे अपूर्ण आहेत. पाइपलाइनसाठी गावभर रस्ते खोदण्यात आले, परंतु करारातील अटीप्रमाणे खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याचे काम कंत्राटदारांनी केलेच नाही. परिणामी अनेक गावांतील रस्ते चिखलमय होत असून ते नाल्यासारखे दिसत आहेत.

### नागरिकांचा वाढता रोष...


गाव तेथे रस्ता हा शासनाचा मुख्य मंत्र असला, तरी रस्त्यानंतरची देखभाल पूर्णपणे शून्य असल्याने ग्रामीण भागातील जनतेचे हाल सुरूच आहेत. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, व्यापारी या सर्वांचा दैनंदिन प्रवास धोकादायक झाला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पालकमंत्री ईश्वर खंडरेंच्या निधीतून बिरदेव मंदिर जीर्णोद्धारासाठी पाच लाख

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १० डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कर्नाटक राज्याचे कॅबिनेट जैव वन मंत्री यांच्या निधीतून मेहकर येथील



मेहकर येथील बिरदेव मंदिर येथे ९ डिसेंबर रोजी मंगळवारी सकाळी बिरदेव मंदिर येथे बिरदेव महाराज प्रतिमेचे पूजन भालकी तालुक्याचे भारत पब्लिक स्कूल चे संस्था अध्यक्ष सन्माननीय प्रवीण हनमशट्टे यांच्या हस्ते मेहकर येथील बिरदेव मंदिर जीर्णोद्धारासाठी बिदर बिरदेव मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ५ लाख रुपये युवा नेते प्रवीण हनमशट्टे यांच्या हस्ते मेहकर येथील बिरदेव मंदिर कमेटीस देण्यात आले.

यावेळी बिरदेव मंदिर कमिटीच्या वतीने प्रवीण हनमशट्टे व गॅरंटी सदस्य दिलीप पोलीस पाटील यांना घोंगडी व पुष्पहार प्रतिमा देऊन सात्विक सत्कार करण्यात आला.

यावेळी समाज बांधव आकाश हिलालपुरे, भानुदास हालसे, शिवराज तोरणे, शिवाजी हिलाल-पुरे, गोविंद ढोले, ज्ञानोबा हा-लसे, राजाराम हिलालपुरे, अनिल हिलालपुरे, पीकेपीएस सोसायटीचे चेअरमन हरीचंद्र मोरे, डायरेक्टर शिवाजीराव पाटील, राघवेंद्र कुलकर्णी, मुरलीधर जाधव, कृष्णा उबाळे, बलभीम भालके, दस्तगीर शेख, श्रावण कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, विनोद वानखेडे, जगन्नाथ पाटील, एमडी लोणे, गुरबस अप्पा मोळकिरे, गजानन मोळकिरे, राम जाधव, अक्षय मोरे यांच्यासह समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आकाश हिलालपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन गोविंद म्हेत्रे यांनी मानले.

# 'नवभारत ग्लोबल एक्सलन्स'ने पंडितराव धुमाळ यांना सन्मानित

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १० डिसेंबर :** कझाकिस्तान अलमाटी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय वॉर्ड समिट सोहळ्यात निलंगा येथील लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांना महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रतिष्ठेचा नवभारत ग्लोबल एक्सेलन्स अवॉर्ड २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

नवभारत व नवराष्ट्रच्या ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आंतरराष्ट्रीय समिट वार्ड सोहळ्यात विविध देशांतील समाजकारण, शिक्षण, कला, वैद्यकीय आणि उद्योजकता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिग्गजांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी समाजसेविका अमृता फडणवीस यांच्या हस्ते नवभारत ग्लोबल एक्सलन्स पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी देश-विदेशातून अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ञ, उद्योजक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई येथे तेरणा चॅरिटेबल ट्रस्ट व महात्मा गांधी मिशन या शैक्षणिक संस्थेत प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत असताना पंडितराव धुमाळ यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक व सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने एलबीएस मिशन ची स्थापना केली. या एलबीएस मिशन संस्थेमार्फत आज राज्यात विविध ठिकाणी अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.




पंडितराव धुमाळ यांनी

लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी ग्रामीण भागात अनेक विकास कामे केली आहेत. ग्रामीण भागा-तील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सुरक्षित शैक्षणिक भविष्य देण्याचे कार्य ते अनेक वर्षांपासून सतत निष्ठेने करीत आहेत. राजकारणात उच्चशिक्षित व्यक्तिमत्व म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करताना त्यांनी समाजकारणाला जोडून शिक्षण, ग्रामीण विकासात योगदान दिले आहे. विविध समाजातील उपेक्षित, वंचित, गरीब सामान्य युवकांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी त्यांनी सहकार्य केले आहे. पंडितराव धुमाळ यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आल्याने विविध क्षेत्रातील मान्यवर व मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# आचारसंहिता भंग करणाऱ्यावर तातडीने कारवाई करा : साळुंके



**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १० डिसेंबर :** निलंगा शहरात नगरपरिषद निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असतानाही काही अधिकाऱ्यांनी आणि गुत्तेदाराने संगणमत करून अनधिकृत नाली बांधकाम व रस्त्याचे डांबरीकरण सुरू केले आहे. हा प्रकार मतदारांना प्रभावित करण्याच्या उद्देशाने आणि शासकीय आदेशांचा उघडपणे भंग करण्यात आला असल्याचे गंभीर आरोप काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहेत.

शहरातील अशूर खाना, खाटिक गल्ली येथे अच-ानक नाली खोदकाम सुरू करण्यात आले. देवी मंदिर शिवाजीनगर येथे डांबरीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे साळुंके कॉम्प्लेक्स समोर नव्याने नाली बांधकाम करण्यात येत आहे. याबाबत काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला असून, संबंधित अधिकारी, व्यक्तींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, शासकीय निधीचा अपव्यय, मतदारांवर दबाव आणि आदेशाचा भंग हा गंभीर गुन्हा आहे. निवडणूक दरम्यान प्रशासनाने आचारसंहिता भंग रोखण्यासाठी त्वरित पावले उचलणे अत्यंत आवश्यक असल्याचीही मागणी केली आहे.

# पन्नालाल सुराणा, विनायक टोम्पे यांना श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १० डिसेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा व सेवानिवृत्त कर्मचारी विनायक टोम्पे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी बोलताना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचेव सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया म्हणा-ले, पन्नालाल सुराणा यांची ज्येष्ठ समाजवादी विचारवंत म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला ओळख होती. नळदुर्ग येथील 'आपलं घर' च्या माध्यमातून त्यांनी अनेक अनाथांना आश्रय दिला. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के म्हणाले, शांत, संयमी व सेवाभाव जोप-ासणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे पन्नालाल सुराणा हे होत. त्यांच्या जाण्याने फार मोठी सामाजिक पोकळी निर्माण झाली आहे. प्रा. प्रवीण जाहूरे म्हणाले, पन्नालाल सुराणा अनेक सामाजिक चळवळींशी जोडले गेलेले हो-ते. संपूर्ण आयुष्य समजासाठी देणाऱ्या साथी पन्नालाल सुराणा यांच्या निधनानंतर त्यांचे पार्थिव शरीर शासकीय रुग्णालयाला दे-हदान करण्याचा निर्णय त्यांची सामाजिक बांधिलकी दाखविणारा आहे. आपण सर्वांनी पन्नालाल सुराणा यांच्याकडून प्रेरणा घेऊन कार्य करावे, असे आवाहन केले. विनायक टोम्पे यांच्याबद्दल देखील संस्था पदाधिकारी व प्राचार्य यांनी भावांजली अर्पण केली.

यावेळी संस्था सहसचिव प्रशांत पेन्सलवार, उपप्राचार्य प्रा. एस. एन. कोडचे, पर्यवेक्षक प्रा. टी. एन. सगर पर्यवेक्षक प्रा. संजय मूडपे यांची विशेष उपस्थिती होती.

# किनगावमध्ये पीर गैबीबाबांचा ७ जानेवारीपासून उरूसास प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**
**किनगाव, १० डिसेंबर :** किनगाव येथील जाजवले दैवत सुपी संत हजरत पीर गैबी बाबा यांचा उरूस ७ जानेवारीपासून भरणार असून ही यात्रा उत्सव चार दिवस चालणार आहे.

या उरूस (यात्रे) निमित्त ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले, ही बैठक प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली असून, ७ जानेवारीप-ासून उरूसाची सुरुवात होणार आहे ७ जानेवारी रोजी संदल , ८ जानेवारी रोजी कव्वाली, ९ जानेवारी रोजी जियारत, १० जानेवारी रोजी जंगी कुस्ती स्पर्धा असे कार्यक्रम होणार आहेत.



या बैठकीस प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके, ग्रामपंचायत अधिकारी आर. जि. कांबळे साहेब, सपोनी मानीकराव डोके, ग्रामपंचायत सदस्य निजाम शेख, चंद्रप्रकाश हंगे, धनराज बोडके, निजाम कुरेशी, श्रीहरी चाटे, बाबुभाई गुत्त-ेदार, बालाजी कांबळे, रफिक शेख, जमीर पठाण, अन्वर पठाण, बाळू किनकर , समीर मोमीन, अमीन पाशा मोमीन, अजम भाई मोमीन, ग्रामपंचायत कर्मचारी मेघराज चावरे, प्रीतम कांबळे, अदी उपस्थित होते.

# मेलार मल्लण्णा देवस्थानात जनसागर

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १० डिसेंबर :** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री मेलार मल्लण्णा देवस्थानात



भंडारा महोत्सवानिमित्त हजार-ो भाविकांची प्रचंड गर्दी झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तांनी मोठ्या भक्तिभावाने उपस्थित राहून उत्सवात सहभाग घेतला.

सकाळपासूनच देवस्थान परिसरात मोठ्या प्रमाणात भक्तांची रिघ दिसून आली. महिलांसह सर्व वयोगटांतील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेऊन भंडारा समारंभात सहभाग घेतला. मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले हो-ते. देवस्थान ट्रस्टने भक्तांसाठी विशेष व्यवस्था केली होती. पाणी, प्रसाद, दर्शन व्यवस्थापन यासाठी स्वयंसेवक प्रयत्नशील होते. पोलिस प्रशासनानेही वाहतूक नियंत्रणासाठी प्रयत्न केले.

बळीराम मल्लिगे पाटील म्हणाले: प्रजा वाणीच्या माध्यमातून मेलार मल्लण्णा यात्रेच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोच-तात हे आनंददायी आहे. यात्रेत भाविकांची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. संजिव बोळेकर, मल्लार मल्लण्णा सेवा मंडळ: भक्तांची सेवा करण्याचा आम्हाला अभिमान आहे.

यात्रेदरम्यान सर्व भक्तांना सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी समिती व स्वयंसेवक काम करत आ-हेत. मंदिरात सजवलेली रथरचना, फुलांनी सजवलेला देवांचा मंडप, तसेच भंडारा कार्यक्रमाची पारंपरिक मिरवणूक यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# दवणहिप्परगा जिल्हा परिषद शाळेत पालक मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**
**देवणी, १० डिसेंबर :** ९ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दवणहिप्परगा शाळेत पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सद-रील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र मुळखेडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वडमुरंबी केंद्राचे केंद्रप्रमुख सदाशिव साबणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पद्माकर कांबळे, प्रशांत पाटील, निळकंठ टिळे, शिवपुत्र पाटील, प्रताप कोयले, बालाजी कवठाळे होते.

सदरील पालक सभेची सुरुवात सुमधूर आवाजातील सुस्वागतम या गीताच्या नृत्याने झाली.

पालक सभेला केंद्रप्रमुख सदाशिव साबणे शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परी-क्षा, अनुपस्थित विद्यार्थी , शालेय पो-षण आहार व शालेय गुणवत्ता वाढीसाठी शिक्षक व पालकांनी प्रयत्न करावे, त्याच बरोबर निपुण अंतर्गत माता पालक संघाचे कर्तव्य याविषयी सखोल मार्गदर्शन केले.



शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा शिक्षणप्रेमी प्रशांत पाटील यांनी पालक, विद्यार्थी व शिक्षकाकडून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अपेक्षा व्यक्त केल्या व पालक सभेत मनोगत व्यक्त केले.

सदरील पालक सभेत शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष माननीय पद्माकर कांबळे यांच्या हस्ते विद्यार्थी बचत बँकेचे उदघाटन करण्यात आले. खाऊसाठी दिलेल्या पैशांची मुलांना लहान वयातच बचतीची सवय लागावी यासाठी आपल्या शाळेने हा घेतलेला उपक्रम चांगला आहे असे सांगीतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा आमच्या शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र मुळखेडे शाळेच्या वाढीसाठी शिक्षकांनी केलेले प्रयत्न, पुढील काळात शाळेच्या प्रगतीसाठी शाळेचे नियोजन सांगितले त्याचबरोबर पालक म्हणून आपली कोणती जबाबदारी आहे याविषयी माहिती दिली.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झालेल्या आपल्या दवणहिप्परगा शाळेचा गणित गिरणी मॉडेलाचे सादरीकरण पालक मेळाव्यात करण्यात आले या गणित गिरणीच्या शैक्षणिक खे-ळात स्वतः पालकांनी सहभाग नोंदविला. पालक मेळावा कार्यक्रमाची सांगता आमच्या सहकारी भगिनी पाचांळ यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता चौथी वर्गातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत वंदे भारती या गीताने झाले.

पालक मेळाव्यासाठी पालक, गाव-ातील शिक्षण प्रेमी नागरिक व परीसरा-तील सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर पाचांळ यांनी केले तर कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र मुळखेडे, विठ्ठल बावगे, राजपाल येणगे, सुचिता पाचांळ, रंगनाथ सगर यांनी प्रयत्न केले.

# उदगीर नगर परिषद मतदानानंतर आकडेमोड सुरु!

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १० डिसेंबर :** दि. २ डिसेंबर रोजी उदगीर नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाले. ३ तारखेला मतमोजणी होणार होती. मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यात पार पडलेल्या मतदानाची मतमोजणी दि. २१ डिसेंबर रोजी होणार आहे. मतमोजणी १८ दिवस लांबणीवर पडली असून इकडे सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून नगराध्यक्ष पदाची व प्रभागातील उमेदवारांच्या विजयाची गणिते घालून आकडेमोड सुरु आहे. तर अनेक कार्यकर्ते सोशल माध्यमातून आपणच जिंकणार असल्याचा दावा करीत आहेत.

मात्र सर्वच उमेदवारांना, कार्यकर्त्यांना दि. २१ तारखेला होणाऱ्या मतमोजणीची प्रतीक्षा आहे. मतमोजणीनंतरच कोणता राजकीय पक्ष, किती जागा जिंकणार हे स्पष्ट होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जा-हीर सभा झाल्या. स्थानिक पुढारीही या निवडणुकीत सक्रिय झाले होते.

६८.१२ टक्के मतदान झाले. आणखी ३ जागांचे मतदान येत्या दि. २० डिसेंबर रोजी होणार आहे. तर मतदान झालेल्या सर्व जागांची मतमोजणी दि. २१ डिसेंबर रोजी होणार आहे. शासकीय आयटीआय कॉलेज येथील स्ट्रॉंग रूम मध्ये ईव्हीएम मशीन असून तेथे पोलीस व एसआरपीच्या कडेकोट दुहेरी सुरक्षा व्यवस्था तैनात आहे.

## कार्यकर्त्यांकडून सोशल माध्यमांवर विजयाचा दावा

लातूर जिल्ह्यात उदगीरची नगरपालिका महत्त्वाची आहे. थेट जन-तेतून नगराध्यक्षपदाची निवड होणार आहे. ५६६६३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजा-वला आहे. यामध्ये ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतील तोच उदगीरचा नगराध्यक्ष होणार आहे. नगराध्यक्षपदासाठी ७ जणांनी निवडणूक लढवली असून भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस युतीचा उमेदवार व काँग्रेसच्या उमेदवार यांच्यातच मुख्य लढत दिसून येत आहे. तर नगराध्यक्षपदाची लढाई कोण जिंकणार ? याची सर्वाधिक उत्सुकता राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांमध्ये दिसून येत आहे.


उदगीर नगरपालिका लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठी 'अ' दर्जाची आहे. २० प्रभाग व ४० जागा असून एकूण ८३१७९ इतके मतदार आहेत. मंगळवारी (दि. २) थेट नगराध्यक्षपद व ३७ जागांसाठी ५६६६३



मतदारांनी मतदानाचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांना बळ असतात. उदगीर नगरपालिकेची निवडणूक तब्बल ९ वर्षानंतर झाली आहे. सर्वच राजकीय पक्षाचे अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात लढत देऊन आपले नशीब आजमावत आहेत. नगराध्यक्षपदासाठी ७ तर ३७ जागांसाठी १५८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. उदगीरच्या नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती तर शिवसेना (एकनाथ शिंदे), काँग्रेस व एमआयएम पक्षांनी स्वतंत्र निवडणूक १८ दिवस मतमोजणी लांबणीवर पडली असून इकडे सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून निवडणुकीत सर्वच प्रभागात झालेल्या मतदानाची आकडेमोड सुरू आहे. मतदारांची जातनिहाय आकडेवारी काढून, कोणत्या समाजाचे कोणाला किती मतदान झाले असेल ? याबाबत वेगवेगळे अंदाज बांधत विजयाची गणिते मांडली जात आ-हेत.

कुठल्या प्रभागात कुठला उमेदवार प्रबळ ठरला याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आले आहे. अनेक प्रभागात दुहेरी तर काही प्रभागात तिहेरी लढत झाली आहे. तर थेट नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत कुठल्या प्रभागात कोणाला किती मते मिळाली असतील, कोणता उमेदवार कोणाला घातक ठरणार याबाबत वेगवेगळे अंदाज कार्यकर्त्यातून वर्तविण्यात येत आहेत.

# महाराष्ट्र महाविद्यालयात बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली




**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १० डिसेंबर :** महाराष्ट्रातील श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ, सत्यशोधकी विचारांचे निष्ठावंत अनुयायी बाबा आढाव यांचे दीर्घ आज-ाराने निधन झाले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र महाविद्यालयात मराठी भाषा व साहित्य विभागाच्या वतीने श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बाबा आढाव यांच्या जीवन व कार्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य डॉ.भास्कर गायकवाड यांनी केले.

बाबा आढाव यांनी वंचित,कष्टकरी, असंघटित लोकांना एकत्र करून त्यांच्या न्याय, सुरक्षा व सन्मानासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. 'हमाल पंचायत' आणि 'एक गाव एक पाणवठा' या दोन क्रांतिकारी चळवळी त्यांनी सुरू केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम उपस्थित होते. विचार मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. गोपाळ मोघे यांचीही उपस्थिती होती. उपस्थितांचे आभार डॉ. हंसराज भोसले यांनी मानले. या श्रद्धांजलीपर कार्यक्रमाप्रसंगी शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात संघरत्न नगदेला द्वितीय क्रमांक

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग आणि पंचायत समितीच्या गटशिक्षण कार्यालयाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन मध्ये छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्याने संघरत्न सुभाष नगदे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. धाराशिव शहरातील यशवंतराव चव्हाण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे ८ डिसेंबर रोजी झालेल्या या प्रदर्शनामध्ये विकसित आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर आधारित विज्ञान प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. संघरत्न नगदेंनी कचरा व्यवस्थापन या विषयावर सादर केलेल्या प्रयोगास द्वितीय क्रमांक मिळविला. गटविकास अधिकारी एस.एस. नलावडे, गटशिक्षणाधिकारी ए.जी. सय्यद, तसेच विस्तार अधिकारी डी.आर. हाके यांच्या हस्ते संघरत्न नगदेंना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार शनिवारी वितरण सोहळा

**वाशी, दि.१० डिसेंबर -**

ज्येष्ठ नागरिक महासंघ तालुका वाशी यांच्या वतीने वाशी येथील त्या महिलांना सन्मानित केले जाणार आहे, ज्यांनी आपल्या पाल्यांना योग्य संस्कार देऊन उच्च पदापर्यंत पोहचवले. या उपक्रमात ५१ महिला सन्मानित होणार असून राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार धाराशिव जिल्ह्याचे कर्तबगार पोलीस अध्यक्ष रिथु खोकर यांच्या हस्ते दिले जाणार आहे. हा सोहळा दि.१३ डिसेंबर रोजी अजिंक्य विद्या मंदिर, वाशी येथे आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष तानाजी मोळवणे आणि सचिव बळीराम जगताप यांनी सर्व नागरिकांना उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविण्याचे आवाहन केले आहे.



### जागतिक मानवतादिनानिमित्त किशोर-किशोरी बाल आनंद मेळावा

**वाशी, दि.१० डिसेंबर -**

जाणीव संघटना वंचित विकास संस्थेच्या वतीने वाशी येथील छत्रपती शिवाजी विद्यालय मध्ये जागतिक मानवतादिनानिमित्त किशोर-किशोरी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना पर्यवेक्षक बापू सावंत यांनी केली. यानंतर जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी किशोर-किशोरी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व कौशल्य, वक्तृत्व कौशल्य आणि संवाद कौशल्य यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आधारित सध्याची मानसिकता यावरही मार्गदर्शन करण्यात आले. मेळाव्यात अभिनव अभिरुची वर्ग घेऊन विद्यार्थ्यांना खेळ, गाणी आणि गोष्टींच्या माध्यमातून शिक्षण दिले गेले. या कार्यक्रमात तब्बल ९०० ते १००० किशोर-किशोरींनी मनसोक्त आनंद लुटला. कार्यक्रमाच्या यशासाठी थोरबोले एस.आर. मुख्याध्यापक, सावंत बी.एम. पर्यवेक्षक, क्षीरसागर एस.व्ही., रिपोर्ट एच.एम., डोके एस.बी., धारकर एस.एस., वाघोरे एस.बी., पवार बी.एम., पन्हाळे बी.वी. आदींनी महत्वाचे परिश्रम घेतले.

# तहसीलदार आणि मंडळ अधिकारी एकमेकांच्या विरोधात तक्रारी

**पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल! महसूल प्रशासनात खळबळ...**

**तहसीलदारांनी केली मंडळ अधिकाऱ्याला शिवीगाळ...**

## तहसीलदारांना मागितली १५ लाखाची खंडणी

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.१० डिसेंबर -**

शहरात महसूल विभागातील स्वतःच्या वरिष्ठांना खोट्या प्रकरणात अडकवण्याची धमकी देत तब्बल १५ लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी मंडळ अधिकारी दिनेश बहिरमल आणि त्यांचे वकील बालाजी बोडके यांच्याविरोधात तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी याबाबत दिलेल्या फिर्यादीनंतर महसूल खात्यात मोठी खळबळ उडाली आहे.

तहसीलदार अरविंद बोळंगे त्यांच्या अंतर्गत आरळी बु. येथील मंडळ अधिकारी म्हणून दिनेश बहिरमल प्रतिनियुक्तीवर काम पाहत होते. बहिरमल यांनी घेतलेल्या SBI क्रेडिट कार्डची तब्बल ४ लाखांची थकबाकी होती.

वसुलीकरिता बँकेकडून येणाऱ्या फोनसाठी त्यांनी 'कार्यालय प्रमुख' म्हणून थेट तहसीलदार बोळंगे यांचा नंबर दिला. त्यानंतर निवडणुकीच्या कामाच्या काळात तहसीलदारांना बँकेतून सतत फोन येऊ लागले.

यासंदर्भात बोळंगे यांनी बहिरमल यांना जाब विचारल्यावर बहिरमल यांनी उलट धाराशिवच्या आनंदनगर पोलीस ठाण्यात तहसीलदार बोळंगे यांच्या विरोधात शिवीगाळ केल्याची तक्रार दाखल केली. तक्रार मागे घ्यायची असेल तर खंडणी द्या! या तक्रारीची दहशत दाखवत मंडळ अधिकारी बहिरमल आणि त्यांचे वकील बालाजी बोडके यांनी तहसीलदारांकडे तडजोडीच्या नावाखाली प्रचंड रकमेची मागणी सुरू केली.

सुरुवातीला १५ लाख रुपये, नंतर तडजोड म्हणून १० लाख रुपये माफीनामा शेवटी माफीनामा नाही दिला तरी चालेल, पण २ लाख रुपये द्यावे लागतील अशी मागणी व्हाटसअप कॉलवरून करण्यात आली.

६ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता बहिरमल आणि बोडके तहसीलदारांच्या घरी गेले. तिथेच त्यांनी शहाजी अभिमान कांबळे यांच्या नावाचे बँक खाते क्रमांक व्हाटस अपवर पाठवत, पैसे दिले तर प्रकरण मिटेल, नाहीतर त्रास वाढेल असा दबाव आणला.

या सततच्या मानसिक छळाला कंटाळून तहसीलदार बोळंगे यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

तहसीलदारांच्या फिर्यादीवरून मंडळ अधिकारी दिनेश बहिरमल आणि वकील बालाजी बोडके यांच्यावर BNS कलम ३०८(३) (खंडणी) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक हनुमंत कांबळे यांच्याकडे आहे.

या घटनेमुळे महसूल खात्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान, आनंदनगर पोलीस ठाण्यातल्या शिवीगाळ तक्रारीनंतर मंडळ अधिकारी बहिरमल यांची तडकाफडकी जिल्हाधिकारी कार्यालयात बदलीही करण्यात आली आहे.

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात वृक्षारोपणाचे आयोजन : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १२ डिसेंबर रोजी जिल्ह्यात भव्य वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येणार आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पक्षाचे कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांच्या सहभागातून तब्बल एक हजार वडाच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी दिली.

जिल्ह्यात विविध ठिकाणी होणाऱ्या वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये पवार साहेबांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनातील योगदानाची आठवण करून देणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेणे हीच खरी वाढदिवसाची भेट असेल, असे सांगण्यात आले. वडाचे झाड आयुष्याचे प्रतीक मानले जाते; दीर्घायुष्य, सावली आणि ऑक्सिजनसंपन्न वातावरण प्रदान करणारे वडाचे झाड यामुळे या वृक्षारोपणाला विशेष महत्त्व आहे.

याशिवाय, अनेक स्थानिकांना या रोपांची देखभाल करण्याची जबाबदारी देण्यात येणार आहे. वडाला जगवलं तर पिढ्या जगतात, या भावनेने वृक्षारोपण उपक्रम जिल्ह्यात हरित वातावरण निर्मितीस चालना देईल, असा विश्वास डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

## जखमी व्यक्तीचे मृत्यूनंतर नेत्रदान यशस्वी; कुटुंबाच्या सामाजिक पुढाकाराचे कौतुक



**तभा वृत्तसेवा**

**मुरूम, दि.१० डिसेंबर -**

आलूर येथील विजय गोपाल सुरवसे (वय ३३) यांना बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजता जखमी अवस्थेत मुरूम शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दुर्दैवाने उपचारादरम्यान विजय सुरवसे यांचा मृत्यू झाला.

या दुःखद प्रसंगी मयत विजय यांच्या पत्नी अंबिका आणि बंधू दशरथ यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा पुढाकार घेतला. जिल्हा शल्य चिकित्सक धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक महेश अर्दाळे आणि नेत्र चिकित्सक एस.बी. शिंदे यांनी मयताच्या नातेवाईकांना योग्य मार्गदर्शन केले. सर्व नातेवाईकांची सहमती मिळाल्यानंतर नेत्रदानाची प्रक्रिया यशस्वी झाली. याप्रसंगी उमरगा उपजिल्हा रुग्णालयाचे नेत्र शल्यचिकित्सक डॉ. एस. आर. सूर्यवंशी, नेत्र चिकित्सा अधिकारी ए. पी. चव्हाण, तसेच नेत्र चिकित्सा अधिकारी शिंदे यांनी मयताचे नेत्र वैज्ञानिक पद्धतीने काढून धाराशिव जिल्हा रुग्णालयाकडे पाठवले. रुग्णालयातील इतर कर्मचारी दिवसभर याकामी पुढाकार घेत होते.

दुःखद प्रसंगी मयत विजय यांच्या पत्नी अंबिका, बंधू दशरथ आणि इतर नातेवाईकांनी घेतलेल्या सामाजिक आणि मानवी मूल्यांनी भरलेल्या या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## तक्रार मागे घेण्याच्या प्रकरणी जबरदस्ती आणि आर्थिक मागणीची तक्रार

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील अरविंद शंकरराव बोळंगे (वय ४३, रा. गवते प्लॉटींग, ता. तुळजापूर) यांनी गंभीर तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, दि.६ डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते १.४० वाजेच्या दरम्यान, आरोपी दिनेश बहिरमल, मंडळ अधिकारी आरळी बु. (प्रतिनियुक्ती) आणि बालाजी बोडके (रा. ढोकी, ता. धाराशिव) यांनी तुळजापूर येथे फिर्यादीला दबाव आणला. आरोपींनी तक्रार मागे घेण्याच्या बदल्यात १५ लाख रुपये, त्यानंतर १० लाख रुपये आणि फोनवरून २ लाख रुपये असा वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये आर्थिक मागणी केली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या दि.९ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबऱ्यानुसार, पोलीस ठाणे तुळजापूर यांनी आरोपींविरुद्ध भारतीय दंडसंहिता कलम ३०८ (३), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सध्या सखोल चौकशी करत आहेत.

## जागतिक एड्स निर्मूलन सप्ताहानिमित्त एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**वाशी, दि.१० डिसेंबर -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी आणि ग्रामीण रुग्णालय वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स निर्मूलन सप्ताहानिमित्त एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. शामसुंदर डोके, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दयानंद कवडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. अनंत पाटील, तसेच प्रा.डॉ. दैवशाला रसाळ, नेताजी देसाई, मिलिंद शिंदे, अजितकुमार तिकटे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ संतोष बुधोडकर, एड्स समुपदेशक परमेश्वर तुंदारे आणि आरोग्य कर्मचारी बाबासाहेब नितळ उपस्थित होते.

सर्वप्रथम रेड रिबन क्लबचे सदस्य सोहेल शेख यांनी एड्स आजाराविषयी माहिती दिली

यावेळी प्रा. महादेव उंदरे यांनी उपस्थितांना शपथ दिली, तर प्रा.डॉ. दैवशाला रसाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महामार्गावरील वाढत्या गुन्ह्यांबाबत ॲड. व्यंकट गुंड यांचे पोलीस प्रशासनास निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१० डिसेंबर -**

धाराशिव-बीड (सोलापूर-धुळे) राष्ट्रीय महामार्गावर अलीकडील काळात लुटमारी, चोरी, जबरी मारहाण, चेन स्नॅचिंग आणि वाहनचालकांना अडवून दहशत निर्माण करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर ॲड. व्यंकट गुंड (संस्थापक रुपामाता उद्योग समूह व प्रदेश कार्यकारिणी सदस्य, भाजप) यांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले.

येरमाळा ते वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही ब्लॅकस्पॉटवर गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असल्याने सामान्य नागरिक, प्रवासी आणि व्यावसायिक वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: तुळजाभवानी माता आणि येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह इतर राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक या मार्गाने प्रवास करतात. अशा गुन्ह्यांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून, स्थानिक व्यवसाय, हॉटेल, लॉज, वाहतूक आणि पर्यटन सेवा यांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

निवेदनात ॲड. गुंड यांनी यावर भर देत स्पष्ट केले की, धाराशिव जिल्हा पोलीस प्रशासन सक्षम आणि अनुभवी आहे आणि जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी तत्पर आहे.

त्यामुळे महामार्गावरील सुरक्षेसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असा पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे.

महामार्ग प्रवासी, स्थानिक नागरिक आणि भाविकांसाठी सुरक्षितता सुनिश्चित करणे तसेच जिल्ह्याचे पर्यटन, अर्थकारण आणि सामाजिक जीवन सुरळीत चालू राहावे, यासाठी हे निवेदन सादर करण्यात आले आहे.

## जिल्हास्तरीय ५३ वे विज्ञान : गणित व पर्यावरण प्रदर्शन यशस्वी



**तभा वृत्तसेवा**

**कळंब, दि.१० डिसेंबर -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाटशिरपुरा येथे ९ डिसेंबर २०२५ रोजी ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान, गणित व पर्यावरण प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदचे शिक्षणाधिकारी प्राथमिक नागेश मापारी, गटविकास अधिकारी सोपान अकेले, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे, उपशिक्षणाधिकारी संतोष माळी, विस्ताराधिकारी सुशील फुलारी, तसेच संभाजी जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांनी केले, तर स्वागतपर मनोगत मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे यांनी व्यक्त केले. या प्रदर्शनामध्ये कळंब तालुक्यातील बहुसंख्य शाळांनी भाग घेतला. प्राथमिक विद्यार्थ्यांनी ७९ शाळांमधील प्रयोग सादर केले, तर चार शिक्षकांनी शैक्षणिक साहित्याचे योगदान दिले. माध्यमिक विद्यार्थ्यांनी ३५ शाळांमधील प्रयोग सादर केले, तर चार माध्यमिक शिक्षकांनी शैक्षणिक साहित्यात सहभाग घेतला. एकूण ११४ विद्यार्थ्यांनी प्रयोग सादर केले, तर आठ शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य सादर केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये सरपंच सुनीता वाघमारे, उपसरपंच सूर्यकांत खापे, तसेच भक्तराज दिवाने, प्रशांत घुटे, महादेव मेनकुदळे यांचा समावेश होता. विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी भाटशिरपुरा येथील सचिन तामाने, अमोल बाभले, नागेंद्र होसाळे, राजाभाऊ शिंदे, लिंबराज सुरवसे, कालींदा मुंडे, राजकन्या तोडकर आणि गणपत तपिसे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत तांबारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी संतोष माळी यांनी व्यक्त केले. प्रदर्शनात शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पसंख्यांक समाजाच्या नावाखाली शैक्षणिक संस्थांत भ्रष्टाचार?

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१० डिसेंबर -**

नळदुर्ग शहरात अल्पसंख्यांक समाजाच्या नावाखाली सुरू असलेल्या काही शैक्षणिक संस्थांनी मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप एमआयएम पक्षाचे नळदुर्ग येथील नेते शहेबाज काझी यांनी केला आहे. या संस्थांच्या सखोल चौकशीसह संबंधित संस्थाचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

**शहेबाज काझी यांची चौकशी व कारवाईची मागणी**

काझी यांनी माहिती देताना सांगितले की, नळदुर्ग शहरातील काही मंडळींनी गेल्या अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांकांच्या नावाखाली शाळा आणि शैक्षणिक संस्था सुरू केल्या आहेत. मात्र शिक्षण देण्याच्या उद्देशापेक्षा, शासनाकडून मिळणारा निधी बोगस खर्च दाखवून हडप करणे हाच त्यामागील उद्देश दिसून येत असल्याचा दावा त्यांनी केला.

शैक्षणिक संस्थांना शासनाकडून दरवर्षी अंदाजे २ लाख रुपये निधी मिळतो. तथापि, अनेक संस्था दरवर्षी एकच काम दाखवून तोच निधी मिळवत असल्याचा आरोप काझी यांनी केला. याचबरोबर शाळेत प्रत्यक्षात पटसंख्या नसतानाही बोगस शिक्षकांची भरती, अकरावी-बारावीचे वर्ग प्रत्यक्षात न चालवूनही शासनाकडे ते वर्ग सुरू असल्याचे दाखवून निधी मिळवणे, विद्यार्थ्यांची फसवणूक आणि शासनाची दिशाभूल करणे अशा पद्धतीने अनेक अनियमितता केल्याचा गंभीर आरोप त्यांनी संस्थाचालकांवर ठेवला आहे. या सर्व प्रकारामागे मोठा आर्थिक गैरव्यवहार दडलेला असून, शासनाची अब्जावधींची फसवणूक होत असल्याचा आरोप काझी यांनी करत, अशा शैक्षणिक संस्थांची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

त्यांच्या या निवेदनामुळे नळदुर्ग शहरातील शैक्षणिक वर्तुळात चांगलीच चर्चा सुरू झाली असून, प्रशासन याबाबत पुढील पावले काय उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पंढरपूरकर गल्लीतील दुचाकी वाहनांची समस्या सुटेना

**स्थानिक रहिवाशांना घरी जाण्यासाठी पायी रस्ता उपलब्ध नसल्याने रहिवासी नागरिक त्रस्त...**



**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.१० डिसेंबर -**

येथील श्री तुळजाभवानी मंदिरा जवळ पंढरपूरकर गल्लीतील रस्त्यावर अनधिकृतरित्या २४ तास दुचाकी गाड्यांचा विळखा घातला असून त्यामुळे स्थानिक रहिवाशांना घरी ये-जा करण्यासाठी पायी रस्ता उपलब्ध नाही. याबाबत पंढरपूरकर गल्लीतील रहिवासाने वारंवार प्रशासनाकडे लिखित तोंडी पाठपुरावा केला. परंतु अद्याप यावर कुठलाही तोडगा निघत नसल्याचे दिसून येते.

याप्रकरणी तुळजापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ यावर या परिसरातील ३०८ नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. तसेच हे समस्या दूर न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. सहाय्यक निवडणूक अधिकारी त्यांच्या लेखी आश्वासनानंतर मतदानावरील बहिष्कार पाठीमागे घेण्यात आला.

२८ नोव्हेंबरच्या पोलीस निरीक्षक यांना देण्यात आलेल्या पत्रामध्ये वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रस्ता मिळवण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षापासून या भागातती विकासाकडे व बहुतेक बहुतेक मूलभूत व भौतिक सुविधाकडे प्रशासनाचे व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष झाले आहे.

याबद्दल स्थानिकांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. लोकशाही मार्गाने न्याय मागूनही न्याय मिळत नसल्याबाबत स्थानिकाने खंत व्यक्त केली. तरी संबंधित विभाग प्रमुखांनी प्रशासनाने याकडे लक्ष देऊन किमान स्थानिक रहिवाशांना त्यांच्या घरी ये-जा करण्यासाठी पायी रस्ता तरी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पंढरपूरकर गल्लीतील रहिवाशाकून होत आहे. याबाबत योग्य ती कारवाई न झाल्यास पुन्हा आत्मदहन करावे लागेल असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

सुवर्णेश्वर गणपतीपासून मेन रोड येथील शहापूर यांच्या घरापर्यंत जवळपास ४०० हून अधिक दुचाकी वाहनांचे अतिक्रमण गर्दी पंढरपूरकर गल्लीत होते.

यामध्ये श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे कर्मचारी, भवानी रोड येथील व्यापारी व भाविक यांचे दुचाकी वाहन लागतात. ही वाहने २४ तास लागलेली असतात. यामुळे येथील ज्येष्ठ नागरिकांना रुग्णालयात जाण्यासाठी वाहन उपलब्ध होत नाही. वेळेवर उपचार न मिळाल्यास एखाद्या रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो.

## जि.प. हायस्कूलच्या वतीने मानवी हक्क दिनानिमित्त प्रभात फेरी




**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.१० डिसेंबर -**

उमरगा शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल यांच्या वतीने १० डिसेंबर, मानवी हक्क दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, गटविकास अधिकारी प्रशांत सिंग मरोड, तसेच केंद्र प्रमुख शीला मुदगडे उपस्थित होते.

प्रभात फेरी उमरगा शहरातील मुख्य रस्त्यांमार्गे बाळासाहेब ठाकरे चौक, इंदिरा चौक, शिवाजी कॉलेज, पंचायत समिती, गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांमधून निघून जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे रॅलीचे विसर्जन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी हातात मानवी हक्क दिनाचे बॅनर व फ्लेक्स धरून समाज प्रबोधन करण्याचा संदेश दिला.

रॅलीमध्ये जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक सदानंद कुंभार, विद्यानंद सुत्रावे, बशीर शेख, भाग्यश्री पंडित, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील, नागेश स्वामी, प्रवीण शिंदे आणि इतर शिक्षकांनी महत्वाचे परिश्रम घेतले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ऊस तोडणी कामगारांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणेतील कामगार, मजूर, चालक यांच्यासाठी नुकतेच मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. त्याचप्रमाणे ऊस तोडणीसाठी आलेल्या बैलगाडीतील पशुधनाची तपासणीहीयावेळी करण्यात आली.

कारखान्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरात एकूण २१५ मजुरांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. य शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पलंगे, डॉ. बालाजी बिराजदार, डॉ. रचना शिंदे, डॉ. नंदकिशोर निकते, एस.बी. मोरे, व्ही.एस. कुलकर्णी, किश पुंड, राजू लोमटे, सोनाली बिराजदार, शकील तांबोळी, विशाल सूर्यवंशी, ऐश्वर्या टिळक यांनी प्रयत्न केले. पशुधन तपासणी व उपचार शिबिरामध्येहीपशूंवर उपचार करण्यात आले. पशुधनाच्या तपासणीसाठी पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. साळवे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत शिंदे, पशुधन विकासाधिकारीडॉ. चव्हाण, डॉ. वाघमारे, डॉ. बोरोळे व त्यांची टीम सहभागी झाली होती.



# जिल्हास्तरीय साहित्य संमेलन अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय, शिरूर अनंतपाळ यांच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून होत असलेल्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची एकमताने निवड करण्यात आली.

महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानातून प्रत्येक जिल्ह्याला एक मराठी साहित्य संमेलन या वर्षीपासून होत आहे. लातूर जिल्ह्यात शिरूर अनंतपाळ येथे दि. २७ व २८ डिसेंबर २०२५ रोजी हे संमेलन होत असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीचे पत्र श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष श्री एल.बी.आवाळे यांनी दिले.

ज्येष्ठ विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि विचारशलाकाचे संपादक म्हणून प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांचा लौकिक आहे. डॉ. कुंभार यांनी लातूर येथे १९८७ ला विचारशलाका त्रैमासिक स्थापना केली. सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांची सैद्धांतिक उकल करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक दृष्टीचा समाज निर्माण करण्यासाठी विचारशलाका त्रैमासिक प्रयत्नशील आहे. समाजातील दलित, वंचित, शोषित, आदिवासी व विमुक्त वर्गांच्या हक्कासाठी ते प्रयत्नशील असतात. मराठवाड्यातील सामाजिक विचारांची चळवळ अधिक विस्तारित



करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. मराठी वैचारिक, परिवर्तनशील व प्रबोधन वाङ्मयात मौलिक योगदान डॉ. कुंभार यांचे आहे. मराठी वैचारिक साहित्याला त्यांचे मौलिक योगदान आहे.

'न्याय संकल्पना' हा विचारशलाकाचा पहिला अंक होता. चाळीस वर्षांपासून विचारशलाकाचे संपादक म्हणून डॉ. कुंभार यांनी सामाजिक प्रबोधन कार्यात स्वतःला वाहून घेतले आहे. घटनात्मक मूल्याधिष्ठित समाज निर्मितीसाठी सतत कार्यरत आहेत. धर्मनिरपेक्षता विशेषांक, लोकशाही, समता, ग्रामीण विकास, मंडल आयोग, तत्त्वज्ञान, उदारमतवादी, सामाजिक चळवळी, विचारवंत व समाज, भारतीय समाजासमोर आव्हाने, प्रबोधन विशेषांक, भारतीय राज्यघटना, दहशतवाद विशेषांक, संत साहित्य विशेषांक, गुलामगिरी आणि विचार अभिव्यक्ती विशेषांक, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी विशेषांक, बौद्ध तत्त्वज्ञान विशेषांक तर महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला वाहून घेणाऱ्या सामाजिक विचारवंतावर विचारशलाकाचे अत्यंत महत्त्वपूर्ण विशेषांक त्यांनी प्रकाशित केलेले आहेत.

यामध्ये गं. बा. सरदार, पंडित जवाहरलाल नेहरू, म. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे, आचार्य शं. द. जावडेकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण, जे. कृष्णमूर्ती विशेषांक, अमर्त सेन, धनंजयराव गाडगीळ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना.य. डोळे, प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी, ग.प्र. प्रधान गौरवांक, वसंतराव काळे, रा.ना. चव्हाण यांच्या कार्यावर विशेषांक प्रकाशित आहेत. अनेक विशेषांकातून प्रबोधनाची पायवाट अधिक विस्तारित केलेली आहे.

याशिवाय भ्रष्टाचार स्वरूप आणि समस्या, सामाजिक कार्याच्या दिशा, आरक्षण का व कसे?, समता स्वरूप व समस्या, न्याय म्हणजे काय?, लोकशाही स्वरूप व समस्या, डॉ. राधाकृष्णन व्यक्ती व विचार आदी पंचवीस ग्रंथांचे लेखन त्यांनी केलेले आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, महाराष्ट्र शासन दर्शनिका संपादक मंडळ मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक मंडळ सदस्य होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ते पहिले सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य होते. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या कार्याला महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार, अखिल भारतीय समाजनिष्ठ शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा शं. वा. किर्लोस्कर श्रेष्ठता पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ. आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, वर्धा येथील दाते संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार, सातारा येथील संस्थेचा म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आरसीसी स्कॉलरशिप परीक्षा रविवारी : प्रा. मोटेगावकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** लातूर येथील प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसच्या वाटणे अकरावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी



येत्या रविवारी स्कॉलरशिप परीक्षा घेण्यात येणारसाळ्याचीमाहिती प्रा. मोटेगावकर यांनी दिली. अकरावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ९० टक्क्यांपर्यंत स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. त्यासाठी रविवारी ही परीक्षा घेतली जाणार आहे. रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता ही परीक्षा होणार आहे.

राज्यातील एकूण ५० पेक्षा अधिक शहरात ही परीक्षा एकाच वेळी घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. या परीक्षेसाठीचीनोंदणी आरसीसी च्या वेबसाईटवर विनामूल्य करता येणार आहे.आरसीसीच्यावतीने मागच्या २४ वर्षांपासून गुणवत्तापूर्ण अध्यापनाच्या बळावर विश्वास संपादन करण्याचे काम आरसीसने केले आहे.

निकालातकायम सातत्य राखणाऱ्या प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसच्या वतीने दरवर्षी केवळ राज्यातीलच नव्हे तर अन्य राज्यातीलही गुणवंत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पालकांच्या मुलांसाठी अशा प्रकारच्या स्कॉलरशिप पैशांचे आयोजन केले जाते. या परीक्षेसाठी राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना पीसीबी ग्रुपसाठी व इंजिनिअरिंग ग्रुपसाठी १० वी विज्ञान व गणित हे अभ्यासक्रमाचे विषय आहेत. ही परीक्षा ४०० गुणांची व ९० मिनिटांची असणार आहे. या परीक्षेसाठी नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे ठिकाण एसएमएसद्वारे तसेच हॉल तिकिट्सद्वारेकळविण्यात येईल, असेही प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी सांगितले.

## न्याय मागण्यांसाठी विधानभवनवर मोर्चा : ॲड. वाघमारे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर विधानभवनवर शासन मान्य विविध पुरस्कार विजेत्यांच्या न्याय मागण्यांसाठी भव्य मोसाई काढण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे पुरस्कार, संत रोहिदास पुरस्कार, दादासाहेब गायकवाड पुरस्कार यांसह विविध पुरस्कार विजेत्यांना मागच्या ३०-४० वर्षांपासून शासनाकडून पुरस्काराच्या सन्मानाशिवाय आतापर्यंत काहीही मिळालेले नाही.

विविध महापुरुषांच्या नावाने देण्यात आलेल्या या पुरस्काराने त्या त्या महापुरुषांचे



विचार जागृत ठेवण्याचे, ते समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम ही पुरस्कार विजेती मंडळी अव्याहतपणे करत आहेत. मात्र, ते अनेक सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे सांगून ॲड. वैजनाथ वाघमारे पुढे म्हणाले की, या पुरस्कार विजेत्यांना शासनाच्या वतीने दरमहा १५ ते २० हजार रुपये मानधन देण्यात यावे, मंत्रालयात प्रवेशासाठी स्वतंत्र पास उपलब्ध करून द्यावेत, एसटी महामंडळाच्या सर्वच बसेससाठी पुरस्कार विजेता आणि त्यांच्या धर्मपत्नीसाठी मोफत पास देण्यात यावा, पुरस्कार विजेत्यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदाचे ओळखपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडिअमनगापूर ते मॉरिस कॉलेजपर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

मोर्चा काढून पुरस्कार विजेत्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविल्या जाणार आहेत. मोर्च्याच्या हत्यारानंतरही शासनाकडून या मागण्या मान्य नाही झाल्यास सर्व पुस्र्कार विजेते शासनाला आपआपले पुरस्कार परत करणार असल्याचेही ॲड. वाघमारे यांनी सांगितले. पुरस्कार विजेत्यांच्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी लवकरच वाशीम येथे राज्यस्तरीय मेळावाही घेण्यात येणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातूनही आपण पुरस्कार विजेत्यांच्या मागण्यांची पूर्तता शासनाकडून करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी व्यंकटराव शिंदे, बालाजी गोटमुकले, शेषेराव करकेलीकर, प्रकाश घादगिने, रमेश जोंधळे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## १० टन गोमांस भरलेला ट्रक पकडला

**अ.भा. कृषी गोसेवा महासंघाची कारवाई । चाकूर पोलीसांच्या ताब्यात सुपूर्द**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** अखिल भारतीय कृषी गोसेवा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी मोठी धडक कारवाई करत जवळपास १० टन गोमांसाने भरलेला ट्रक ताब्यात घेत चाकूर पोलिसांच्या हवाली केला. महाराष्ट्रात गोमातेचा राज्यमाता म्हणून सन्मान असताना आणि राज्यात गोहत्याबंदी कायदा लागू असतानाही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल होत असल्याचा गंभीर मुद्दा या कारवाईतून पुन्हा एकदा समोर आला आहे.

या कारवाईत संघटनेचे आदर्श जैन, जोतिराम क्षिरसागर, विजय भिसे, इटकर यांच्यासह एकूण चार गोरक्षक सहभागी होते. गोरक्षकांनी



मिळालेल्या माहितीच्या आधारे ही संयुक्त कारवाई करून ट्रक पकडत पोलिसांच्या ताब्यात दिला. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यात अनधिकृत गोवंश वाहतूक आणि कत्तलीचे प्रकार वाढत असून, अशा बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी गोरक्षक सतत कार्यरत आहेत. पोलीस प्रशासनानेही या प्रकरणाचा तपास सुरू केला असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## २० डिसेंबर रोजी मद्यविक्री बंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणार आहे. त्यामुळे २० डिसेंबर रोजी निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे. तसेच २१ डिसेंबर रोजी उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीची मतमोजणी होणाऱ्या ठिकाणची सर्व प्रकारची मद्यविक्री बंद राहणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा, १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, मद्यविक्री नोंदवही इ.) नियम १९६९ च्या संबंधित कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

## अभाविप स्थायी कार्यकर्त्यांचे लातूरमध्ये एकत्रीकरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** लातूर शाखेच्या वतीने ७ डिसेंबर रोजी स्वर्गीय प्रा. यशवंतराव केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्ष व पुण्यस्मरणाच्या निमित्ताने स्थायी कार्यकर्त्यांचे दिवसभराचे एकत्रीकरण उत्साहात पार पडले. लातूर, उदगीर, धाराशिव आणि अंबाजोगाई येथील शेकडो स्थायी कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती दर्शवून संघटनात्मक कामात सातत्याने योगदान देण्याची तयारी दर्शवली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संजय पाचपोर उपस्थित होते. तसेच देवदत्त जोशी यांनी प्रमुख उपस्थिती नोंदवत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.दिवसभर चाललेल्या या एकत्रीकरणात संघटन बळकटीकरण, युवा सहभाग, सामाजिक उपक्रम, भविष्यातील नियोजन या विषयांवर विविध सत्रांद्वारे चर्चासत्रे




झाली. प्रा. यशवंतराव केळकर यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवत, कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अधिक प्रभावी पद्धतीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांच्या योगदानाचे कौतुक करत संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा देण्याचे आवाहन केले.


## समाजवादी विचाराचा नेता गमावला : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** महाराष्ट्राच्या समाजेसवा आणि श्रमिक चळवळीचे प्रणेते असलेले समाजवादी नेते मानवतावादी विचारवंत, रिक्षाचालक, हमाल, मोलमजुरी करणारे असंघटीत कामगार यांच्या हक्कासाठी आयुष्यभर लढा देणारे बाबा आढाव यांचे वयाच्या ९६ व्यावर्षी पुना हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. ही दुःखद घटना आहे. साधेपणा, तत्त्वानिष्ठा आणि न्यायासाठीच्या संघर्षासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरलेले आहे. त्यांच्या कार्यातून सहकार आणि श्रमिक चळवळ ही आपल्या समाजाची अमुल्य संपदा आहे. त्यांच्या निधनाने श्रमिक चळवळीचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे खर्या अर्थाने कष्टकर्यांसाठी लढणारा समाजवादी विचाराचा नेता महाराष्ट्राने गमावला असल्याची खंत भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.

डॉ.बाबासाहेब पांडुरंग आढाव हे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे एक खंदे योध्दे आणि श्रमिक कष्टकर्यांचे खरे कैवारी होते. पुण्यात जन्मलेले बाबा आढाव १९७० च्या दशकामध्ये पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते.

लातूरसह महाराष्ट्रातील हमाल, मापाडीसाठी माथाडी



बोर्ड लागू करण्याचे काम बाबा आढाव यांच्या प्रेरणेने केले असून त्यांच्या खात्यावर कोट्यवधीचा निधी जमा करण्याच्या प्रक्रियेतही त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.

अस्पृश्यता, जातीय भेदभाव यांच्याविरूध्द आयुष्यभर लढणारे बाबा आढाव हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे कट्टर अनुयायी होते. त्यांच्या निधनामुळे श्रमिक चळवळीचे एक मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरवले आहे.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी भावनिक प्रतिक्रियाही माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केली.

# 'आपत्ती व्यवस्थापन'वर परिचारिकांसाठी कार्यशाळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० डिसेंबर :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन या विषयावर परिचारिकांसाठी निशुल्क निरंतर व्यावसायिक शिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच मा. न्यायालयाच्या आदेशानुसार नोंदणी नूतनीकरणासाठी आवश्यक असलेल्या १५० क्रेडिट तास मिळविण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव, अध्यक्षपदी महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे उपाध्यक्ष व संघटनेचे राज्यकार्याध्यक्ष अरुण कदम, अधिसेविका श्रीमती लक्ष्मीबाई आपटे, प्राचार्या श्रीमती अश्रि्वनी बेले, महाराष्ट्र राज्य परिचारिका




संघटनेच्या राज्याध्यक्षा डॉ. मनीषा शिंदे, राज्यउपाध्यक्ष भीमराव चक्रे, अंबाजोगाई शाखाध्यक्षा श्रीमती आशा यादव, कार्यशाळा निरीक्षक अझर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमा पूजनाने करण्यात आली. प्रास्ताविक राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे यांनी केले. वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव यांनी मार्गदर्शन करताना नर्सिंग ऑफिसरचे रुग्णसेवेत महत्त्व अधोरेखित केले व अशा शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. राज्य उपाध्यक्ष भीमराव चक्रे यांनी निरंतर शिक्षणाबरोबरच परिचारिकांमध्ये परस्पर संवाद आणि मानसिक आरोग्य वृद्धीचे महत्त्व सांगितले.

डॉ. मनीषा शिंदे, अधिसेविका अपाटे यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यशाळा निरीक्षकांनी दिवसभरातील विषय आत्मसात करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात अरुण कदम यांनी ज्ञानार्जनाची गरज अधोरेखित करत आयोजकांचे अभिनंदन केले.

या कार्यशाळेत डॉ. मनीषा शिंदे, अनंत पवार, डॉ. आदिम सय्यद, शुभम वानखेडे, विवेकानंद कोडगिरे, विरेश महाजनी यांसारख्या तज्ञांनी आपत्ती व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रुपाली दिघे व अश्रि्वनी विपत यांनी केले तर आभारप्रदर्शन राज्य खजिनदार राम सूर्यवंशी यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी राज्य कार्यकारिणी सदस्य पांडुरंग गव्हाणे, अध्यक्ष छाया चव्हाण, उपाध्यक्ष संजीव लहाने, मार्गदर्शक योगेश वाघ, सचिव भाग्यश्री जोगदंड, खजिनदार रंजना भताने, सहसचिव भगवान केंद्रे, संघटक बालिका सावंत, सहखजिनदार दीपक शिंदे, तसेच संभाजी केंद्रे, भागवत मुंडे, शुभम वानखेडे, सुधाकर केदार, अमित मालिशे, निशा जाधव, कृष्णा नागरगोजे, विक्रांत हुलसुरे, संतोष केंद्रे, भाग्येश्वर वागलगावे, सतीश माळकरी आणि इतर सर्व पदाधिकारी व सभासदांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.